# शब्द रुची

जुलै २०१६
मूल्य १० रु.
पृष्ठे ४४



असत्याचे प्रयोग!



शांतता, कोर्ट उठलं आहे...



स्नेहमयी
अण्णा



# ऑफबीट भटकंतीचा १३ वर्षांचा प्रवास

## विंटर लडाख



७ ते १३ जानेवारी, २५ ते ३१ जानेवारी,
३ ते ९ फेब्रुवारी, १७ ते २३ फेब्रुवारी

## भूतान



८ ते १५ नोव्हेंबर

## आसाम-मेघालय नागालँड



२८ नोव्हेंबर ते ७ डिसेंबर
हॉर्नबील फेस्टीव्हल

## अंदमान



२५ फेब्रुवारी ते ३ मार्च

## केनिया-टांझानिया



मायग्रेशन स्पेशल : ५ ते ११ ऑगस्ट,
२ ते ८ नोव्हेंबर

## स्कॅन्डीनेव्हिया
फिनलँड - नॉर्वे



नॉर्थन लाईट्स : १४ ते २१ डिसेंबर

## किन्नौर स्पिती
हिमाचल



२१ ते ३० ऑगस्ट,
१६ ते २५ सप्टेंबर

## न्यूझिलंड



३ ते १३ नोव्हेंबर

## श्रीलंका
व्हेल वॉचिंग सह



२ ते १० नोव्हेंबर

## टर्की



३० सप्टेंबर ते ७ ऑक्टोबर

वाईल्ड लाईफ व बर्डींग : ग्रेटर आणि लिटील रण ऑफ कच्छ, ताडोबा, सातताल पँगोट, रणथंबोर, भरतपूर
फॅमिली टूर्स : अंदमान, केरळ, काश्मिर, उत्तरांचल, हिमाचल, सिक्कीम, राजस्थान, ओरिसा

isha tours®
Lets explore the world...

मुख्य कार्यालय : १/ए, मुरलीधर को-ऑप. सोसायटी, ब्राह्मण सोसायटी, गोखले हॉस्पिटलच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ०२२-२५४३७४१७
दादर : ९३२००३११९० बोरिवली : ९३२४५३११९० पुणे : ९३२०१३११९० लेह : ९३२०२३११९०
Email : info @ishatours.net 8080144000 Website: www.ishatours.net

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

जुलै २०१६, वर्ष तिसरे
अंक तिसरा, मूल्य १० रु.

संपादक : सुदेश हिंगलासपूरकर
मुखपृष्ठ : ग्रंथाली संगणक विभाग

**कार्यालयीन संपर्क**

**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com

**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com

**वितरक – विलास जोशी**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी १५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ.'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali02@gmail.com/
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**ऑफिस वेळ : सकाळी ११ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठसमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## संपादकीय...

जगात कितीही उलथापालथी झाल्या / होत असल्या तरी जगाचे भवितव्य अजूनही अमेरिकन अध्यक्षाच्या भूमिकेवर अवलंबून असते, हे मान्य करावेच लागते. साहजिकच अमेरिकेच्या अध्यक्षपदाची निवडणूक जगाचे लक्ष वेधून घेणारी ठरते. यावेळी ती रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प आणि डेमोक्रॅटिक पक्षाच्या हिलरी क्लिंटन यांच्यातच होणार, हे आता स्पष्ट झाले आहे. त्यांच्यापैकी कोण निवडून येणार, ते आणखी पुढील चार महिन्यांतील प्रचाराच्या रणधुमाळीनंतर स्पष्ट होईल. पण सध्यातरी या दोघांचा 'खोटारडेपणा' हा अमेरिकन मतदारांच्या चर्चेचा विषय बनल्यामुळे ही निवडणूक म्हणजे 'असत्याचे प्रयोग' ठरेल, असे तेथील विश्लेषक म्हणू लागले आहेत. डॉ. मोहन द्रविड यांनी त्यामागची कारणे या अंकात आपल्या लेखात उलगडून सांगितली आहेत. अमेरिकेचे मावळते अध्यक्ष बराक ओबामा आणि आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यातील खुद्द अमेरिकेतील चौथ्या भेटीतून मोदींना कोणते 'मोदक' मिळाले, ते डॉ. अनंत लाभसेटवार यांनी मांडले आहे, तर युरोपीय समुदायातून बाहेर पडण्याचा कौल ब्रिटिश जनतेने दिल्यानंतर सार्वमत हे अशा नाजूक प्रश्नावरचे निर्णायक आणि अंतिम उत्तर असू शकते काय, असे प्रश्नचिन्ह आल्हाद गोडबोले यांनी उपस्थित केले आहे.

नामवंत संगीतकार स्नेहल भाटकर यांचे हे शताब्दी वर्ष. या 'स्नेहमयी' माणसाच्या आठवणी त्यांच्या कुटुंबीयांनी, विशेषतः त्यांचे चिरंजीव, प्रसिद्ध अभिनेते रमेश भाटकर आणि स्नुषा, उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांनी जागवल्या आहेत. तर मराठी रंगभूमीवरून 'एक्झिट' घेतलेल्या ज्येष्ठ अभिनेत्री सुलभा देशपांडे यांच्या जाण्याने 'कोर्ट उठल्याची' रसिकांच्या मनांतील भावना श्रद्धांजलीपर शब्दांतून व्यक्त करण्यात आली आहे.

'शब्द रुची'चा अंक छपाईला जात असतानाच मराठी साहित्यविश्वाला आणखी एक धक्का देणारी – लोकसाहित्य अभ्यासक, संशोधक, समीक्षक डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या निधनाची – बातमी आली. या थोर सारस्वताचे मूल्यमापन घाईघाईत चार ओळीत किंवा एखाद्या लेखांत होऊ शकणार नाही. म्हणूनच 'शब्द रुची'च्या पुढील अंकापर्यंत आमच्या वाचकांना प्रतीक्षा करावी लागेल.

**– संपादक**

## अनुक्रमणिका

**असत्याचे प्रयोग** / मोहन द्रविड / ४
**मोदींना अमेरिकेत मिळालेले मोदक** / डॉ. अनंत पां. लाभसेटवार / १०
**सार्वमताची कुऱ्हाड** / आल्हाद गोडबोले / १४
**स्नेहमयी अण्णा** / अपर्णा पाटील / १८
**शांतता, कोर्ट उठलं आहे...** / प्रतिनिधी / २६
**कोल्ड डेझर्ट** / आत्माराम परब, नरेंद्र प्रभू / २८
**ग्रंथाली प्रकाशन वृत्तांत** / ३४
**रोहन प्रकाशन, पद्मगंधा प्रकाशन, साधना प्रकाशन** / ३५
**'ग्रंथाली' परीक्षणे** – चांगदेव काळे / ३९





# असत्याचे प्रयोग

**डॉ. मोहन द्रविड**

**अमेरिकन अध्यक्षपदाची यावेळची निवडणूक ही असत्याचे प्रयोग म्हणून गाजेल, आणि हिलरी व ट्रॅम्प यांच्यात अधिक खोटं कोण बोलतं यावरून निवडणुकीचा निकाल लागणार आहे असं काही व्रात्य निरीक्षकांचं म्हणणं आहे.**

अमेरिकेतील २०१६ ची अध्यक्षीय निवडणूक ही ऐतिहासिक ठरणार यात आता शंकाच नाही. अमेरिका स्वतंत्र झाल्यापासून अपवादात्मक अशी काही वर्ष सोडल्यास या देशातील राजकारण द्विपक्षीयच राहिले आहे. १८६० साली त्या वेळचा तिसरा पक्ष म्हणून उदय पावलेल्या रिपब्लिकन पक्षाचा अब्राहाम लिंकन राष्ट्राध्यक्ष झाल्यापासून गेली दीडशे वर्ष डेमोक्रॅटिक आणि रिपब्लिकन हे दोन पक्षच सर्व पातळ्यांवर आलटून पालटून राज्य करीत आले आहेत. कोणत्याही तिसऱ्या पक्षाला कधी मूळ धरता आलेले नाही.

डझनावारी पक्ष असलेल्या भारताच्या दृष्टीतून हे चित्र फारच वेगळं आहे. समाजवादी विचारसरणीचे अमेरिकेला वावडे असल्याने डाव्या पक्षांची रेलचेल येथे नाही. अल्पसंख्यांकांनी स्वत:चे असे वेगळे पक्ष कधी काढले नाहीत. जे काही राजकारण करायचं ते ते डेमोक्रॅटिक पक्षात राहून करतात. देशातील दाक्षिणात्य प्रदेश सोडला तर इतरत्र प्रांतीय भावना नाही. दाक्षिणात्य वंशवादी पक्ष अधूनमधून डोकं वर काढतात, नाही असं नाही. पण त्यांनीही स्वत:ला गेली अनेक वर्षं गोऱ्या लोकांचं वर्चस्व असलेल्या रिपब्लिकन पक्षात सामावून घेतलं आहे. एरवी प्रांतीय पक्ष नाहीत. असं हे सामोपचाराचं द्विपक्षीय राजकारण वर्षानुवर्ष चालत आलं आहे.

अशा या सनातन राजकीय पद्धतीस सुरूंग लागायची परिस्थिती आली आहे, असा अंदाज मी सहा महिन्यांपूर्वी लिहिलेल्या एका लेखात व्यक्त केला होता. त्यात बदल झालेला नाही. किंबहुना परिस्थिती अधिकच चिघळलेली आहे. दोन्ही पक्षांतील दुफळी इतकी उफाळून वर आली आहे की ते दुभंगून जायच्या मार्गावर आहेत.

राजकीय पक्षात मतमतांतरे असतात हे काही नवीन नाही. निवडणुकीच्या काळात काही प्रमाणात बंडखोरी होते हाही आपला अनुभव आहे. पण आज दोन्ही पक्षांत झालेल्या बंडखोरीचा स्फोट हा अभूतपूर्व आणि धक्कादायक आहे. रिपब्लिकन पक्षातलं बंड आहे प्रामुख्याने मध्यमवर्गीय गोऱ्या पुरुषांचे. अल्पसंख्यांकांचे फार लाड होतात, कायदे स्त्रियांच्या बाजूने नको तितके झुकले आहेत, उपऱ्या लोकांचं आक्रमण होत आहे, प्रामाणिक मध्यमवर्गाकडे त्यांच्या पक्षाचंसुद्धा दुर्लक्ष होत आहे या त्यांच्या लाडक्या तक्रारी. डेमोक्रॅटिक पक्षातलं बंड आहे ते राजकीय आणि सामाजिक परिवर्तन करू पाहणाऱ्या तरुण मंडळीचे.

हा बंडखोरीचा स्फोट बाहेर पडायला निमित्त झालं देशातील

राष्ट्राध्यक्षासाठी होत असलेल्या प्राथमिक निवडणुका. अमेरिकेतील राज्यपद्धतीत पक्षाचे उमेदवार पक्षश्रेष्ठी ठरवत नाहीत. पक्षानं तिकिट देणं असला प्रकार इथे नाही. त्याऐवजी उमेदवार नक्की करण्यासाठी पक्षांतर्गत वेगळ्या निवडणुका घेतल्या जातात. त्यांना प्राथमिक निवडणुका म्हणतात. त्यात पक्षाचे सभासद मतदान करतात.

इथे हे लक्षात ठेवले पाहिजे की अमेरिकेत प्रत्येक मतदाराला मतदारांच्या यादीत आपल्या पक्षाची नोंद करावी लागते. मतदाराला कोणताच पक्ष नसेल तर तो अपक्ष धरला जातो. सार्वत्रिक निवडणुकीत आपल्याच पक्षाला मत दिले पाहिजे हे बंधन नसते. पण प्राथमिक निवडणुकांत पक्षाचे सभासदत्व महत्त्वाचे ठरते.

अमेरिकेत राष्ट्राध्यक्षपदासाठी उमेदवार ठरवणाऱ्या दोन्ही पक्षातील प्राथमिक निवडणुका मुख्य निवडणुकीइतक्याच चुरशीच्या आणि अनेक वेळा अधिक रंगतशीर असतात. भारतीयांना त्याबद्दलची फारशी माहिती नसल्याने त्यांचं विस्तृत वर्णन करणं गरजेचं आहे. राष्ट्राध्यक्ष हा दर चार वर्षांनी नोव्हेंबर महिन्यात निवडला जातो. त्या पदासाठी होणाऱ्या प्राथमिक निवडणुका मात्र सर्व देशात एकाच वेळी होत नाहीत तर त्या त्या वर्षाच्या फेब्रुवारी महिन्यापासून जूनपर्यंत वेगवेगळ्या राज्यात होतात. त्या संपल्यानंतर महिन्याभरात पक्षाचे संमेलन भरते आणि त्यात त्या पक्षाचा उमेदवार ठरतो.

प्रत्येक राज्य तिथल्या लोकसंख्येच्या प्रमाणात संमेलनास प्रतिनिधी पाठवते. ते प्राथमिक निवडणुकीत उभ्या असलेल्यांमध्ये त्यांना मिळालेल्या मताच्या प्रमाणात विभागले जातात. ते कसे विभागले जातात याबाबतीत मात्र प्रत्येक राज्याचे नियम वेगळे आहेत. कॅलिफोर्नियात तर सर्व प्रतिनिधी एकालाच मिळतात (winner-take-all). प्रत्येक उमेदवाराच्या वाट्याला आलेल्या प्रतिनिधींची निवड त्या राज्यात राहणाऱ्या लोकांतून होते.

हे सर्व राज्यातले प्रतिनिधी पक्षाच्या संमेलनात अध्यक्षीय उमेदवार ठरवण्यासाठी एकत्र येतात. (रिपब्लिकन पक्षाच्या संमेलनात २४७२ तर डेमोक्रॅटिक पक्षाच्या संमेलनात ४७६५.) जमलेल्या प्रतिनिधींमधून ज्याला निम्म्यापेक्षा अधिक जणांचा पाठिंबा मिळेल तो त्या पक्षाचा उमेदवार. जर पहिल्या फेरीत बहुमत कुणालाच नसेल तर संमेलनात काही जण आपली उमेदवारी मागे घेतात. काही जण नव्याने रिंगणात उतरतात. पुन्हा एकदा मतदान घेतले जाते. दुसऱ्या फेरीपासून ज्या उमेदवारासाठी आपली नेमणूक केली आहे त्यालाच मत दिले पाहिजे हे बंधन प्रतिनिधींवर न राहिल्याने बंडखोरी होऊ शकते. कोणा एकाला बहुमत मिळेपर्यंत हा घोडाबाजार चालू राहतो.

गंमत म्हणजे प्राथमिक निवडणुकीत उभी राहणारी व्यक्ती त्या पक्षाचीच असली पाहिजे असे बंधन नाही! पण सहसा असे होत नाही. कारण पक्षाचे सभासद पक्षाबाहेरील व्यक्तीला निवडून देण्याची शक्यता फार कमी असते. २०१६च्या निवडणुका या नियमाला मोठ्या प्रमाणात अपवाद ठरत आहेत.

या वेळचा रिपब्लिकन पक्षाचा आघाडीवरील असलेला उमेदवार डॉनल्ड (डॉन) ट्रंप हा त्या पक्षाचा सभासदच आहे की नाही हीच शंका आहे. तो स्वत: कधी आहे म्हणून सांगतो, तर कधी नाही म्हणून! कुटुंबनियोजन, गर्भपात, धर्माचं राजकारणातलं महत्त्व, अश्लीलता वगैरे प्रश्नांवरील त्याची मतं रिपब्लिकन पक्षापेक्षा डेमोक्रॅटिक पक्षाला जवळची आहेत. तो कुणाच्या ध्यानीमनी नसताना निवडणुकीच्या रिंगणात उतरला आणि बघताबघता सर्वांच्या पुढे गेला. त्याच्याकडे पक्षसंमेलनात निवडून येण्यासाठी लागणाऱ्या प्रतिनिधींपेक्षा अधिक प्रतिनिधी जमा झाले. गेली अनेक दशके या पक्षाची धुरा संभाळणाऱ्या जुन्या आणि जाणत्या अनेक नेत्यांना हे अजिबात पसंत नसून ते पक्षांतर करायच्या विचारात आहेत.

डेमोक्रॅटिक पक्षातील प्राथमिक निवडणुकीत त्या पक्षाच्या लाडक्या हिलरी क्लिंटनला हैराण करणारा बर्नार्ड (बर्नी) सँडर्स हाही त्या पक्षाचा सभासद नाही. (या गोष्टीचं भांडवल करण्याचा प्रयत्न हिलरीनं केला पण त्यात तिला पाहिजे तितके यश मिळाले नाही.) हा ७२ वर्षांचा एका छोट्या राज्यातला अपक्ष सिनेटर आतापर्यंत मोठ्या राजकारणात कधी पडला नाही याचे कारण तो समाजवादी आहे. आणि गेली सत्तर वर्षे तरी समाजवादी माणसाला अमेरिकेत महारोग्यासारखे दूर ठेवले जात असे. हा म्हातारा अचानक अज्ञातवासातून धूमकेतूसारखा उगवला आणि तरुणांच्या गळ्यातला ताईत होऊन बसला.

अशी दोन्ही पक्षांना हादरवणारी परिस्थिती यायची कारणे अनेक आहेत. मुख्य कारण म्हणजे अमेरिकेचा वैभवाचा रथ चिखलात अडकून पडला आहे अशी भावना सर्वत्र निर्माण झाली आहे. मध्यम वर्गाचा होत असलेला ऱ्हास डोळ्यांना तर दिसत आहेच पण वेळोवेळी प्रसिद्ध होणाऱ्या आकडेवारीनेही सिद्ध होत आहे. सामान्य लोकांचे पगार ठप्प झाले आहेत तर वरच्या वर्गातल्या लोकांचं उत्पन्न आकाशाला भिडत आहे. थोडक्यात म्हणजे आर्थिक विषमता वाढत आहे.

दुसरे म्हणजे मुसलमानी जगतात वर्षानुवर्षे चाललेली युद्धं संपायची चिन्हं दिसत नाहीत. व्हिएटनाम युद्धात अमेरिकन जसे हजारांनी मृत्युमुखी पडत होते तसे या युद्धांत पडत नाहीत ही जरी जमेची बाजू असली, तरी युद्धांचा खर्च काही हजार अब्ज डॉलर्स झाला आहे. आणि अमेरिकेसारख्या महासत्तेला इतका खर्च करून म्हणावे तसं यश येत नाही याबद्दल लोकांमध्ये क्षोभ आहे.

तिसरे कारण म्हणजे म्हणजे पारंपरिक प्रसारमाध्यमांचा झालेला ऱ्हास आणि इंटरनेटचा उदय. पूर्वीसुद्धा प्रसारमाध्यमे स्फटिकासारखी स्वच्छ होती किंवा सरकारधार्जिणी नव्हती अशातला भाग नाही. पण त्यांच्यात बऱ्याच प्रमाणात विश्वासार्हता होती. ती त्यांनी आता संपूर्णपणे गमावली आहे. त्यामुळे म्हणा किंवा इंटरनेट हे बातम्या मिळवण्याचे दुसरे माध्यम लोकांना मिळाल्यामुळे म्हणा, वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्या यांची आर्थिक परिस्थिती गंभीर झाली आहे. बहुतेकांनी जागोजागी वार्ताहर पाठवणं बंद केलं आहे आणि सरकारच्या ओंजळीनं पाणी पिणं

हा मार्ग स्वीकारला आहे. प्रसारमाध्यमं पद्धतशीर खोटं बोलतात असा जवळजवळ ९० टक्के लोकांचा समज झालेला आहे.

चौथं कारण म्हणजे लोकांचा राजकारण आणि राजकारणी यांच्यावरचा विश्वास पार ढळून गेला आहे. अमेरिकन संसदेवर (Congress) विश्वास ठेवणाऱ्या लोकांची संख्या आज दहा टक्क्यांपर्यंत घसरत आली आहे. हे अर्थातच नवीन नाही आणि अमेरिकेपुरते मर्यादितही नाही. भारतात सुद्धा हे थोड्या फार प्रमाणात आहेच. आपल्याला राजकारणाबद्दल तिरस्कार आहे असं प्रतिपादन करून शेवटी राजकारणच करणारे वीर आपल्याकडे काही कमी नाहीत.

अमेरिकेत हा प्रकार कार्टरने सुरू केला. आपण वॉशिंग्टनच्या पटवापटवीच्या राजकारणापासून हजारो कोस दूर आहोत म्हणजे जनताजनार्दनाचे खरेखुरे प्रतिनिधी आहोत या घोषणेवर तो निवडून आला. रेगन आणि ओबामा त्याच पंथातले. एक सिनेमा क्षेत्रातला बी-ग्रेडचा नट, तर दुसरा कृष्णवर्णीय ज्याचं नाव बराक हुसेन! असं असूनही लोकांनी त्यांना भरघोस मतांनी निवडून दिले. कारण त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ते राजकारणाच्या गलिच्छ स्पर्शापासून लांब होते. पण एकदा अध्यक्ष म्हणून निवडून आल्यानंतर त्यांनी 'ये रे माझ्या मागल्या' यापेक्षा वेगळं काही केलं असं म्हणणं धाडसाचं ठरेल.

लोकशाहीतले कटु सत्य म्हणजे राज्यकर्त्यांनी आपण जनतेचे कल्याण करण्याचा कितीही आव आणला तरी त्यांना धनिकांच्या अंमलाखाली काम करावे लागते. निवडणुका लढवायला अफाट पैसा लागतो आणि तो देणारे काही अपेक्षा ठेवूनच पैसे ओततात. त्यामुळे राजकारणात चांगल्या हेतूने प्रवेश केलेल्या लोकांनाही शेवटी हार मानावी लागते आणि प्रस्थापित व्यवस्थेचे मिंधे होणे भाग पडते. निदान आज तरी अमेरिकन लोकांचा असा समज झाला आहे की देशाचे राज्यकर्ते देशाच्या कल्याणाऐवजी काही खास दबाव गटांच्या फायद्याकरताच काम करतात.

ट्रंप आणि सँडर्स या दोघांबद्दल एक मात्र मान्य करावं लागेल, त्या दोन्ही बंडखोरांनी धनिकांचा पैसा घेतला नाही. त्यांच्या लोकप्रियतेचा तो एक मोठा भाग आहे. ट्रंप हा अब्जाधीश आहे आणि निवडणुकीचा खर्च स्वत:च्या खिशातून करतो. सँडर्स हा कफल्लक आहे. निवडणुकीचा खर्च तो लोकांच्या वर्गणीतून करतो आणि वर्गणीची कमाल मर्यादा दर माणशी २७ डालर्स एवढी ठेवली आहे.

लोकशाहीची दुसरी गंमत म्हणजे चार-पाच वर्षे मुसक्या बांधून बसलेली प्रजा निवडणुकीच्या काळात बेफाम होते. भावनांच्या आहारी जाते. या गोष्टीचा प्रत्यय अमेरिकेतच नाही तर युरोपमधल्या देशातही येत आहे. टोकाची भूमिका घेणाऱ्या व्यक्तींची किंवा पक्षांची चलती आणि प्रस्थापित पक्षांची पिछेहाट होताना सर्वत्र दिसत आहे. सँडर्सने अमेरिकेतील संपूर्ण आर्थिक व्यवस्था बदलण्याचं आवाहन केलं तर ट्रंपची मुख्य ताकद आजचे सामाजिक आणि राजकीय संकेत झिडकारून टाकण्यामध्ये आहे.

आता ट्रंप या प्राण्याविषयी थोडी माहिती. त्याच्यात आणि आपल्या विजय मल्ल्यात बऱ्यापैकी साम्य आहे. वडिलांकडून वारसा हक्कानं आलेलं प्रचंड वैभव आणि उद्योगधंदे. त्यात मोठ्या प्रमाणात वाढ आणि तितक्याच प्रमाणात गोलमाल. सर्व राजकीय पक्षांना प्यारा. सर्वांना आर्थिक मदत केलेली. असंख्य सुंदरींशी संबंध. आपला मल्ल्या पळाला. ट्रंपने उद्योगधंद्यात कुलंगडे केली असली तरी तो कायद्याच्या कचाट्यात (अद्यापी तरी) सापडलेला नाही.

ट्रंप हा जिभेचा अत्यंत सैल. ते तर त्याचं एक मोठं भांडवलच आहे. स्त्रियांविषयी इतर पुरुष मंडळी जे खाजगीत बोलायलासुद्धा कचरतील ते हा जाहीर बोलतो. आपल्या दुसऱ्या बायकोचं वर्णन त्याने 'वक्ष:स्थळे मोठी पण मेंदू छोटा' असा केला आहे. आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवारांबद्दल त्याने जी वक्तव्यं केली ती एखाद्या वाह्यात शालेय मुलाला शोभतील अशी आहेत. एकाचा उल्लेख 'खोटारडा', तर दुसऱ्याचा 'बायल्या'. एक स्त्री उमेदवार होती ती बाकडतोंडी. त्याने एका स्त्री वार्ताहराची तिच्या मासिक पाळीवरून टिंगल केली. आपल्या लिंगाच्या आकारावरून त्याने एकदा प्रतिस्पर्धी उमेदवाराबरोबर जाहीर वाद घातला.

त्याच्या आंतरराष्ट्रीय राजकारणातील भूमिकाही दोन्ही पक्षांच्या प्रस्थापित राजकारण्यांना विक्षिप्त वाटतात. त्यापैकी काही म्हणजे मुसलमानी जगातील युद्धे बंद करावीत, व्यापाराचे जागतिकीकरण (globalization) थोपवावे, रशियाशी मैत्री करावी, NATO संघटना मोडकळीत काढावी. (ट्रंपने आणि पुतिनने एकमेकाविषयी चांगले उद्गार काढले म्हणून अनेकांचे पित्त खवळले!) गंमत म्हणजे सँडर्ससुद्धा या भूमिकांचं समर्थन करतो. दोन टोकं एकत्र येतात ती अशी! America First हे दोघांचंही धोरण.

ट्रंपची आणखी विशेष सनसनाटी मतं म्हणजे अमेरिका आणि मेक्सिकोमध्ये भिंत बांधणे आणि मुसलमानांना काही काळ तरी अमेरिकेत यायला बंदी घालणे. भिंत बांधायचा खर्च तो मेक्सिकोकडून वसूल करणार आहे. समाजातल्या एका मोठ्या घटकाला या भूमिका भावतात. (अर्थात या घटकाचा- याला xenophobic अशी संज्ञा आहे- सर्वच बिगर-अमेरिकन लोकांवर राग आहे. त्यात आपणही आलो.)

असा हा ट्रंप रिपब्लिकन पक्षाला कसा काय पचणार आहे हे कोडंच आहे. जवळजवळ सर्व पक्षधुरीणांनी त्याला विरोध केला. बुश कुटुंबाने पक्षाच्या संमेलनावर बहिष्कार टाकण्याची घोषणा केली. ट्रंपला जर पहिल्या फेरीत बहुमत मिळाले नाही तर संमेलनात हेराफेरी करायची असा एक बेत होता. पण ती शक्यता मावळली. तिसरा पक्ष काढून वेगळा उमेदवार उभा करायचीही काहींची योजना होती.

वेगळा उमेदवार उभा करायला रिपब्लिकन पक्षात फारसा हुरूप नव्हता, याचे कारण या भांडणातून हिलरी निवडून यायची भीती होती. तेव्हा त्या पक्षाचे सगळे लक्ष डेमोक्रॅटिक पक्ष

**ट्रंप हा नॉनस्टिक तव्यासारखा आहे. सगळं करून-सवरून त्याला आतापर्यंत तरी काही चिकटलेलं नाही. हिलरी velcro सारखी आहे. तिला आयुष्यभरचा कचरा चिकटून राहिलेला आहे. ते दोघे त्यांच्या पक्षाचे जाहीर उमेदवार झाले आहेत, पण दोघांच्या मागे जर कायद्याचं शुक्लकाष्ट लागलं तर सर्व जगात अमेरिकेची चेष्टा होणार आहे यात बिलकुल शंका नाही.**

फुटण्याकडे लागले. सँडर्स गटाला हिलरीचा अतिशय तिरस्कार वाटतो. इतका की त्यातील बरेचसे एक वेळ ट्रंपला मत देतील पण हिलरीला नाही. Nevada या राज्याच्या संमेलनात सँडर्स आणि हिलरी यांच्या दोन गटांमध्ये मजबूत हाणामारी झाली. तेव्हा माघार घ्यायची असं सँडर्सने जरी ठरवलं तरी त्याचे कार्यकर्ते त्याचं कितपत ऐकतील याची शंकाच होती. एकाने म्हटल्याप्रमाणे ती काही सँडर्सची फौज नाही की थांब म्हटलं तर थांबेल. तो आहे एक डिवचलेल्या मधमाशांचा थवा!

तेव्हा अशा परिस्थितीत निवडणुकीचा बग कसा रंगणार आहे हे सांगणे कठीण आहे. ट्रंप आणि हिलरी यांच्यातल्या सामन्यात कोण जिंकेल याबर जे चाचणीमत घेतले जात आहे ते या क्षणी तरी अपरिपक्व आहे. एक म्हणजे प्रत्यक्ष निवडणुकीच्या पाच महिने आधी केलेले अंदाज डब्यात जातात असा पूर्वीच्या अनेक निवडणुकींचा अनुभव आहे.

निवडणुकीत उभ्या असलेल्या उमेदवाराबद्दल चांगलं मत असणाऱ्यांची टक्केवारी यातून खराब मत असणाऱ्यांची टक्केवारी वजा करून एक निर्देशांक काढला जातो. तो अपवादात्मकच वजा असतो. ट्रंप आणि हिलरी या दोघांचाही निर्देशांक वजा २५ टक्क्यांच्या घरात होता! यांच्या विरुद्ध 'क्ष' माणूसही अपक्ष म्हणून उभा राहिला तर तो वीस टक्क्यांपेक्षा अधिक मते घेतो आणि या दोघांची मतसंख्या ३३ टक्क्यांच्या आसपास ढकलतो! तेव्हा दोन्ही पक्षातील बंडखोरी जरी संपली तरी अपक्ष उमेदवाराची शक्यता नाकारता येत नव्हती, पण तसे घडले नाही. आता प्रश्न असा की, ट्रंप आणि हिलरी यांच्यातील निवडणूक कशी असेल?

२००० सालच्या गोर विरुद्ध बुश या अध्यक्षीय निवडणुकीत गोरने आपण सर्वज्ञ असल्याची भूमिका घेतली होती तर बुशने खुशालचेंडू असल्याची. तरीही बुश निवडून आला. ट्रंप-हिलरी या दोघांमध्येच निवडणुकीमुळे तसाच थोडासा प्रकार होईल. आपण एक अभ्यासू आणि अनुभवी उमेदवार आहोत असा हिलरीचा आविर्भाव आहे. आतापासूनच तिने आपल्या (दुसऱ्याने लिहून दिलेल्या) भविष्यकालीन योजना वॉशिंग्टन पोस्ट सारख्या तिला अनुकूल असलेल्या वृत्तपत्रातून छापायला सुरुवात केली आहे.

ट्रंप तसल्या भानगडीत काही पडणार नाही. प्रतिस्पर्ध्यावर जीवघेणा हल्ला हे त्याचे प्रमुख अस्त्र. हिलरीवरील त्याची टीका अतिशय हीन पातळीवरून होणार हे उघड आहे. तिच्या खऱ्याखोट्या भानगडी, नवऱ्याच्या शंभर टक्के खऱ्या भानगडी यावर तो तुटून पडणार. त्याचं स्वत:चं चारित्र्य धुतल्या तांदळासारखे स्वच्छ नाही हे जगाला माहीत आहे. (आणि त्यालाही!) पण त्याची त्याला फिकिर नाही. उलट घमेंडच आहे. त्यामुळे त्याच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवणे हे हिलरीला कितपत फायद्याचं ठरणार आहे हा वादाचाच प्रश्न आहे. (निवडणूक संपेपर्यंत मुलांना टीव्हीपासून लांब ठेवा असा सल्ला एका पत्रकाराने दिला आहे!)

ट्रंप हा तोंडाला येईल ते बोलतो. तेव्हा तो काल जे बोलला ते आज बोलेल असं नाही आणि आज बोलतो ते उद्या बोलेल याची शाश्वती नाही. त्याची सर्व वाक्ये गोळा करून त्याच्या तोंडावर फेकणे हा एक हिलरीचा डावपेच होऊ शकतो. पण भूमिकेतलं

सातत्य हा तिच्याही खास ताकदीचा मुद्दा नाही. ती दर दिवशी भूमिका बदलत नसेल, पण तिच्या सोयीस्करपणे बदलत्या मतांची नेहमी टिंगल होत असते. व्यापाराचे जागतिकीकरण, समलिंगी विवाह, इराकमधील युद्ध इत्यादी विषयांवरील तिच्या कोलांट्या उड्या या चर्चेचा कायम विषय असतो.

हिलरीचा राष्ट्रीय राजकारणातील २५ वर्षांचा अनुभव हे दुधारी शस्त्र आहे. तिला कायम आपल्या कामगिरीचे समर्थन करावे लागेल तर तिचे विरोधक नेहमी आक्रमक पवित्र्यात राहणार. धर्मांध मुसलमानांना हाताशी धरून लिबियाच्या गदाफीचा खून करण्यात तिचा मुख्य वाटा आहे. तिला तो मोठा पराक्रम वाटतो. पण गदाफी गेल्यानंतर याच धर्मांधांनी अराजक माजवून अमेरिकेच्या अँबॅसडरला ठार मारले. या गोष्टीचे निवडणुकीत भांडवल होणार आहे.

आणखी एक फार महत्त्वाचा आणि हिलरीला डोकेदुखी ठरणारा प्रश्न म्हणजे तिने सरकारी ई-मेलकरिता स्वत:च्या वैयक्तिक कम्प्युटरचा केलेला वापर. वैयक्तिक कम्प्युटरमध्ये चोरून प्रवेश करणे हे त्यातल्या त्यात सोपे जाते. रुमेनियामधल्या एका गावठी Hacker ने तिचा हा कम्प्युटर तोडून आतली ई-मेल लंपास केल्याचा दावा केला आहे. ते किती खरे आणि किती खोटे हे सांगणे कठीण आहे कारण त्याला अमेरिकेतल्या एका तुरुंगात बंदिस्त केले आहे. पण सर्वसाधारण अंदाज असा आहे की अमेरिकेमधील गुप्त सरकारी पत्रव्यवहार मोठ्या प्रमाणात आज रशियन आणि चिनी सरकारच्या हातात पडला असणार.

कोणत्याही गुप्त सरकारी ई-मेलकरता वैयक्तिक कम्प्युटरचा वापर करणं हा मोठा गुन्हा आहे. पण आपण तो केला नाही असं हिलरीचं म्हणणं आहे. काही कागदपत्रे तिच्या परराष्ट्रखात्याने नंतर classified केल्याचा तिचा दावा आहे. यावर कायदेशीर कारवाईची चक्रं सुरू झाली आहेत. त्यात जर ती सापडली तर उमेदवार म्हणून ती संपली. हे सर्व माहीत असताना स्वत:चा कम्प्युटर वापरून हिलरीनं नक्की काय मिळवलं हे गूढच आहे.

बिल आणि हिलरी क्लिंटन हे मानसशास्त्राच्या अभ्यासासाठी दोन उत्तम नमुने आहेत. कामातुराणाम् न भयम् न लज्जा या न्यायानुसार डोळ्यांसमोर सरळसरळ आत्मघात दिसत असताना बिल क्लिंटनने अनेक स्त्रियांशी अतिप्रसंग केले. त्यातून तो जेमतेम बचावला. पण ती सर्व भुतावळ आता हिलरीच्या मागे लागणार आहे.

हिलरीची खासियत म्हणजे कसलाही लाभ नसताना पद्धतशीर खोटं बोलणं, किंवा स्वत:चं महत्त्व फुगवून सांगणं. असे अनेक प्रसंग आहेत की जिथे तिचे बिंग ताबडतोबच फुटले आणि तिच्या वाट्याला आली ती अवहेलना आणि कुचेष्टा. आपलं नाव आपल्या आईवडिलांनी एव्हरेस्ट शिखर चढणाऱ्या एडमंड हिलरीवरून ठेवलं असं तिने एकदा विधान केलं. आता तिचा जन्म आहे १९४७चा आणि एडमंड हिलरी प्रसिद्धीस आला १९५३ मध्ये! ही सनावळी लोकांच्या लक्षात येणार नाही का? आपलं नुकसान डोळ्यांसमोर दिसत असतानाही खोटं बोलावं असं काही लोकांना का वाटतं हे मानसशास्त्राला मोठं आव्हान आहे.

एका अर्थी ट्रंप हा बिल आणि हिलरी एकत्र करून झालेला नमुना आहे. फरक एवढाच की ट्रंप चोरून लफडी करत नाही आणि कारणाशिवाय खोटं बोलत नाही. पण खोटं बोलतो. तो खोटं बोलताना दिवसागणिक कमीत कमी तीन-चार वेळा सापडतो असं उदाहरणादाखल काही वर्तमानपत्रातून छापून येतं. तेव्हा अमेरिकन अध्यक्षपदाची यावेळची निवडणूक ही असत्याचे प्रयोग म्हणून गाजेल, आणि हिलरी व ट्रम्प यांच्यात अधिक खोटं कोण बोलतं यावरून निवडणुकीचा निकाल लागणार आहे असं काही व्रात्य निरीक्षकांचं म्हणणं आहे.

एक शक्यता अशी आहे की ट्रंपच्या बिनधास्त आणि बढाईखोर वक्तव्याला आणि कृतीला लोक शेवटी कंटाळतील. तसा तर्क त्याच्या प्राथमिक निवडणुकीतील विरोधकांनी केला होता. पण तसं काही घडलं नाही. ट्रंप हा नॉनस्टिक तव्यासारखा आहे. सगळं करून-सवरून त्याला आतापर्यंत तरी काही चिकटलेलं नाही. हिलरी velcro सारखी आहे. तिला आयुष्यभरचा कचरा चिकटून राहिलेला आहे. ते दोघे त्यांच्या पक्षाचे जाहीर उमेदवार झाले आहेत. पण दोघांच्या मागे जर कायद्याचं शुक्लकाष्ट लागलं तर सर्व जगात अमेरिकेची चेष्टा होणार आहे यात बिलकुल शंका नाही.

**– मोहन द्रविड Ph.D.**

mohan.drawid@gmail.com

(मोहन द्रविड हे 'मुक्काम पोस्ट अमेरिका' या पुस्तकाचे लेखक आहेत.)


**ग्रंथाली**

काटेसावर - उषा मेहता



मूल्य १२५ रु.
सवलतीत ७५ रु.

'उषा मेहता यांच्या 'काटेसावर'मधील कवितांची भूमी म्हणजे प्रखर वास्तव, या वास्तवात होरपळणारी माणसं, विशेषत: स्त्रिया.

कोणतीही वास्तववादी किंवा स्त्रीवादी भूमिका न घेता कवयित्री ठामपणे या भूमीवर उभी आहे, या वास्तवाचे काटेरी स्वरूप न्याहाळते आहे आणि तेही काहीशा अलिप्तपणे. अंतर्हृदयात करुणा आहे, भय आहे, चिंता आहे आणि चीडही आहे. पण या भावनांना तोलून धरणारा, हे चित्र कधीतरी बदलेल असा दिलासाही आहे. 'जग स्वच्छ, सुंदर होईल' अशा विश्वासाने, 'ही चिमुकली वळतीलही त्या दिशेकडे' हा तो दिलासा.'

**– विजया राजाध्यक्ष**

**‘प्रतिभा आणि सर्जनशीलता’ ह्यांची सैद्धांतिक चर्चा व मांडणी करणारा तात्त्विक ग्रंथ.**

**मराठीत प्रथमच**

प्रतिभा ही उपजत असते का, ती सुदैवी व्यक्तींनाच प्राप्त होते का किंवा ती कष्टसाध्य आहे का,
असे प्रश्न अनेकांना पडतात. ह्या व अशा अनेक प्रश्नांचा शोध घेणारा हा ग्रंथ.
प्रतिभा म्हणजे काय, प्रतिभेची वैशिष्ट्ये, प्रतिभेचे स्पष्टीकरण, प्रतिभेचे स्वरूप आणि प्रतिभेची विविध रूपे
ह्यांची चर्चा भारतीय व पाश्चिमात्य तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, मेंदूविज्ञान, जैविक उत्क्रांती
अशा विविध ज्ञानशाखांना स्पर्श करत विविध अंगांनी केली आहे.

मूळ किंमत ₹ ४५०
सवलतीत ₹ ३६०
(ट.ख. ₹ ५०)

# प्रतिभा आणि सर्जनशीलता

डॉ. सुधाकर देशमुख



**स्त्री-वाङ्मयाचा त्रिखंडात्मक प्रकल्प**

स्वातंत्र्योत्तर साठ वर्षांच्या कालखंडातल्या निवडक लेखिकांच्या साहित्याची चर्चा



## स्त्री-लिखित मराठी कविता

(१९५० ते २०१०)


मूळ किंमत ₹ ६००
सवलतीत ₹ ४८०
(ट.ख. ₹ ५०)



## स्त्री-लिखित मराठी कथा

(१९५० ते २०१०)

मूळ किंमत ₹ ७००
सवलतीत ₹ ५६०
(ट.ख. ₹ ५०)



## स्त्री-लिखित मराठी कादंबरी

(१९५० ते २०१०)

मूळ किंमत ₹ ३२०
सवलतीत ₹ २५५
(ट.ख. ₹ ५०)

संपादन : **अरुणा ढेरे**

**पद्मगंधा प्रकाशन** १९६६, तारा-भुवन, माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे-४११०३०
फोन : (०२०) २४४५०२६० मो. : ७३५०८३९१७६

**www.padmagandha.com** वेबसाईटवर ऑर्डर पाठवा.
पद्मगंधाच्या सर्व पुस्तकांवर २०% सूट मिळवा.



# मोदींना अमेरिकेत मिळालेले मोदक

डॉ. अनंत पां. लाभसेटवार

अमेरिकेच्या संसदगृहात लोकसभापती पॉल रायान व उपाध्यक्ष जो बायडन यांच्याबरोबर

**अमेरिकेनं चीनला आटोक्यात ठेवण्यासाठी चीनभोवती दोस्त राष्ट्रांची माळ तयार केली. पण तिच्यात एक मोठं भोक होतं. आता भारताशी जवळीक साधून ही माळ पूर्ण केली. जर वेळ आली तर अमेरिका या माळेचं गळफासात रूपांतर करू शकते.**

नेहरूंपासून मोदींपर्यंत अमेरिका व भारत यांच्या देशप्रमुखांच्या अनेकदा भेटी झाल्या. त्यात भारताच्या विद्यमान पंतप्रधानांएवढ्या वॉशिंग्टनच्या वाऱ्या कुणीच केल्या नाहीत. गेल्या दोन वर्षांत मोदी ओबामांना भेटायला चारदा आले. अमेरिकेचे जीवश्चकंठश्च मित्र म्हणजे ग्रेट ब्रिटन व इस्राईल. त्यांचे देशप्रमुख ओबामांना भेटायला एवढ्यांदा आले नाहीत. म्हणून एका व्यंगचित्रकारानं सुचवलं की मोदींना व्हाईट हाऊसमध्ये कायमची खोली दिलेली बरी. याशिवाय आपले पंतप्रधान अमेरिकेच्या अध्यक्षांना जागतिक सभांच्या संदर्भात इतर देशात भेटतील. आपण आपल्या नातेवाईकांना देखील एवढं भेटत नाही.

यावेळी मोदींनी वॉशिंग्टनला जी भेट दिली तिची पार्श्वभूमी वेगळी होती. आतापर्यंत अशा बैठकींचा श्रीगणेशा ''जगातल्या दोन मोठ्या लोकशाहीमुळे जोडलेले देश एकत्र येऊन...'' अशा शब्दात केला जाई. अशी सुरुवात प्रशासकीय सेवा अधिकाऱ्यांच्या (IAS) परीक्षेसाठी निबंध लिहिण्यास ठीक असली तरी वास्तवात ती निरर्थक ठरे. याचं कारण असं की ठेवणीतलं हास्य चेहऱ्यावर पांघरून हस्तांदोलन करणाऱ्या दोन ठोकळ्यासारखे उभे असलेल्या नेत्यांचे छायाचित्र व त्याबरोबर सह्या केलेल्या ठरावांची यादी बघून जग नाक मुरडे. त्यात भावनेपेक्षा औपचारिकता जास्त असे. त्यामुळे वारी संपताच उभय देशांना त्या भेटीचं विस्मरण पडे आणि ते ठराव? ते वाश्यापेक्षा जास्त पोकळ. त्यात कबूल केलेल्या तंत्रज्ञानाचं भारतात संक्रमण झालं असतं तर आज आपला देश पहिल्या वर्गात ढकलला गेला असता. पण तसं न झाल्यामुळे ते करार किती वांझोटे होते याची कल्पना येईल.

यावेळीही अशा अनेक ठरावांवर रीतसर सह्या झाल्या आणि जगानं मोठी जांभई दिली. यातला लक्षवेधक करार म्हणजे अमेरिकेची वेस्टिंगहाऊस (Westinghouse) ही नावाजलेली कंपनी भारतात अणुविजेसाठी सहा भट्ट्या बांधणार. भारनियमामुळे रडकुंडीला आलेल्या भारतीय जनतेला ते वाचून तहानलेल्या वाटसरूला वाळ्याचं थंड पाणी मिळावं असं वाटेल. पण ग्राहकांनी आपल्या उतू जाणाऱ्या उत्साहाला लगाम लावलेला बरा. कारण त्यांच्या हयातीत व मोदींच्या कारकिर्दीत ही योजना फलित होण्याची शक्यता मंत्र्यांना प्रामाणिकपणाचा रोग जडण्याएवढीच दुरापास्त. यातील अण्वदायित्वाच्या प्रश्नावर सोयिस्करपणे पांघरूण ओढण्यात आलं. म्हणजे एखादा अपघात झाला तर किरणोत्सर्जनामुळे झालेली हानी कोण भरणार हा प्रश्न अजून सुटलेला नाही. दुसरं म्हणजे अशा योजना काळाच्या अंतापर्यंत चघळण्याची आपल्या बाबूशाहीला सवय आहे. चीननं काही अणुभट्ट्या पाकिस्तानमध्ये बांधल्यादेखील. चीनची कृती आणि भारताची वाणी हा काही दोन भिन्न राज्यप्रणालीतला फरक नाही. साम्यवादामध्ये लवकर

निर्णय घेता येतात तर लोकशाहीत निर्णयप्रक्रिया मारुतीच्या शेपटीसारखी लांबत राहते असं समर्थन आपल्या बाबूंना शोभतं. पण वास्तवात ते बिनबुडाचं वाटतं. आपण मुळातच कृतीप्रवण नाही.

पण याच वेळी ॲमेझॉन या महाजालावर वस्तू व सेवा विकणाऱ्या कंपनीच्या मुख्याधिकाऱ्यानं (जेफ बेझोस) केलेली घोषणा खरी वाटते. कंपनीनं भारतात तीन अब्ज डॉलर गुंतवणूक करणार म्हणून मोदींना सांगितलं. ॲमेझॉननं यापूर्वी आपल्या देशात दोन अब्ज डॉलर आणले होते. कंपनी या पैशातून उद्योगविस्तारच करणार नाही तर संगणकीय प्रयोगशाळा भारतात उघडून देशात पेव फुटलेल्या यंत्रणालेखन (software) ज्ञानाचा उपयोग करून घेणार. त्यामुळे नोकऱ्यानिर्मिती तर होईलच पण अर्थकारणात भर पडेल. हे पाहून देशभक्तीनं भारलेल्या अनेक अमेरिकन पंडितांनी विरोध दर्शवला. भारतासारख्या दूरस्थ देशात एवढी गुंतवणूक करण्याऐवजी अमेरिकेत केली तर काय बिघडलं असा सवाल त्यांनी टाकला.

यामुळे भेटीचं महत्त्व कमी होत नाही. उलट दोन देशांत सौहार्दाचे जे संबंध निर्माण झाले ते ऐतिहासिक ठरणार आहेत. सदिच्छेचं वातावरण निर्माण करण्यासाठी दोन महत्त्वाच्या गोष्टी घडल्या. एक म्हणजे पहिल्याच दिवशी (जून ६, २०१६) मोदी युद्धात बळी गेलेल्या अज्ञात सैनिकांच्या थडग्याला श्रद्धांजली वाहण्यास गेले. त्यामुळे अमेरिकन बाजू युयुत्सुपूर्व झाली. त्यात एक विरोधाभास होता. भारतानं व्हिएटनाम युद्धाला कडाडून विरोध केला होता. त्या युद्धात शहीद झालेले जवान तिथे होते. अमेरिका जशी मोदींवर लादलेली प्रवेशबंदी विसरली तसंच भारताला आपल्या विरोधी भूमिकेचं विस्मरण पडलं झालं.

ओबामांनी मोदींच्या दातृत्वाला योग्य प्रतिसाद दिला. त्यांनी अमेरिकेत चोरून विकलेल्या व सांस्कृतिक महत्त्व असलेल्या अनेक पुरातन कलावस्तू मोदींना परत केल्या. त्यातल्या काहींना २००० पेक्षा जास्त वर्षांचा इतिहास. भारताची चोरलेली संस्कृती याप्रमाणे परत केली म्हणून पंतप्रधानांचं मन सुखावलं. त्यांनी ओबामांचे मन:पूर्वक आभार मानले.

दुसऱ्या दिवशी मोदी दुपारच्या जेवणासाठी व वाटाघाटी करण्यास बरोबर ११ वाजता व्हाईट हाऊसमध्ये गेले. या द्विपक्षीय चर्चेतून बरंच काही निष्पन्न झालं. त्यानंतर त्यांनी शाकाहारी जेवण घेतलं. मागच्या वेळी ते ओबामांना भेटले तेव्हा यजमान संभ्रमात पडले होते. कारण मोदींना त्या दिवशी उपवास होता. त्यांनी फक्त पाणी पिऊन वेळ निभावून नेली. ओबामांनाही काही शाकाहारी पदार्थ खाऊन अर्धपोटीच उठावं लागलं. पण यावेळी उपवासाचा प्रश्नच नव्हता. त्यामुळे जेवणात काही अडथळे आले नाहीत.

पण जेवणापेक्षा वाटाघाटींचं फळ महत्त्वाचं होतं. न्युक्लिअर सप्लायर्स ग्रुप (Nuclear Supplier Group, NSG) नावाचा एकूण ४८ देशांचा एक खास गट आहे. अण्वतंत्रज्ञान असलेल्या देशांचा हा क्लब भारतानं १९७५ मध्ये यशस्वी चाचणी केल्यावर स्थापन करण्यात आला होता. पण आपल्या देशाजवळ अण्वतंत्रज्ञान असूनही सदस्यत्व नाकारण्यात आलं. याचं एक कारण म्हणजे भारतानं अण्वस्त्र प्रसारबंदी करारनाम्यावर कधीच सही केली नाही. पण आपल्या देशानं गेल्या ३५ वर्षांत कुठल्याच प्रकारे अण्वप्रसार केला नाही. ही शिस्त बघून अमेरिकेनं भारताला हे सदस्यत्व द्यावं अशी शिफारस केली. अनेक देशांची मतं बळवली. पण चीननं त्याला विरोध दर्शवला. भारतानं अण्वप्रसारबंदीच्या करारावर सही केलेली नाही असं कारण त्यानं सांगितलं पण वास्तव निराळं होतं. त्याचा मित्र पाकिस्तानचा अर्ज नाकारण्यात आला होता. त्या देशाचा अण्वशक्तीजनक ए. क्यू. खान यानं चोरून तंत्रज्ञानाचा प्रसार केला होता. त्यामुळे उत्तर कोरिया या क्षेत्रात वर आला. ही वागणूक NSG ला मुळीच मान्य नसल्यामुळे त्या देशानं या प्रतिष्ठित गटाचा सदस्य होण्याची आशा बाळगू नये. मोदींनी स्वित्झर्लंड, मेक्सिकोसारख्या देशांना स्वत: भेट देऊन त्यांची मतं अनुकूल केली. त्यामुळे आता चीन एकटा उरला आहे. त्याचा विरोध मुख्य प्रवाहाबाहेर असल्यामुळे पुढेमागे हा एकाकी आवाज बदलेल अशी आशा आहे.

पण या खास गटात समाविष्ट होण्यासाठी जिवाचा एवढा आटापिटा का? त्यामुळे देशाची जागतिक प्रतिष्ठा वाढते व सदस्यांमध्ये अणुतंत्रज्ञानाची व साहित्याची देवाणघेवाण करण्यास मदत होते. NSG चं सदस्यत्व अमेरिकेमुळे तोंडाजवळ आलं असून ते लवकरच ओठात पडेल असं वाटतं.

आतापर्यंत अमेरिकेला भेट देणारे सर्व पंतप्रधान हातात कटोरी व मनात लाचारी घेऊन आलेले. त्या संबंधात बरोबरी नसून श्रीमंत-गरीबीची भावना असे. प्रथमच मोदी मान उंचावून समता व बंधुत्वाच्या तत्त्वावर अमेरिकेला आले. हे मनोवृत्तीचे परिवर्तन होण्यास भारताच्या वाढदरानं मदत केली. मार्च २०१६च्या तिमाहीत आपल्या देशानं ७.९ टक्क्यानं अर्थकारण वाढलं असं जाहीर केलं. ते बघून जगानं अविश्वासार्ह डोळे विस्फारले. मोदी अमेरिकेत असताना जागतिक बँकेनं जगाचा वाढदर २०१६च्या जानेवारीत जाहीर केलेल्या २.९ टक्क्याच्या ऐवजी २.४ टक्के असणार अशी घोषणा केली. जगाला याप्रमाणे ओहोटी लागली असताना भारताला भरती कशी आली? मुळातच जगाचा चीनप्रमाणे भारताच्या आकडेवारीवर विश्वास नाही. दोन्ही देशातलं मापन सदोष आहे याविषयी वाद नाही. परंतु पर्यायी निकष वापरून वाढदराची सत्यता तपासता येते. वीज, पोलाद किंवा सिमेंटचा वाढलेला वापर बघून अर्थकारणाला आलेलं बाळसं बऱ्याच अंशी खरं आहे असं अनुमान काढता येतं. तो दर जाहीर केलेल्या ७.९ टक्क्यांपेक्षा कमी असला तरी चीनच्या ६.२ टक्के, अमेरिकेच्या व ग्रेट ब्रिटनच्या १.८ टक्के, जपानच्या ०.३ टक्के किंवा जगाच्या २.४ टक्क्यापेक्षा बराच वर आहे हे पाश्चात्य सुटाबुटातल्या पंडितांना मान्य करणं भाग पडलं. त्यामुळे वॉशिंग्टनमध्ये पाय ठेवताना मोदींच्या चेहऱ्याभोवती यशाचं एक तेजोवलय पसरलं होतं असं म्हणण्यास

हरकत नाही. शिवाय त्यात त्यांच्या नैतिक बळाची भर पडली होती. पूर्वीचं सरकार भ्रष्टाचारासाठी प्रसिद्ध होतं.

भाजपचे सचिव अमित शहांनी नुकतंच विधान केलं की काँग्रेस सरकारच्या कारकिर्दीत १२ लाख कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला. भारताची अर्थसंकल्पीय त्रुटी ५ लाख कोटी रुपये. म्हणजे या गैरव्यवहारातून २ वर्षांची त्रुटी भरली असती. मोदींचं सरकार सत्तेवर येऊन २ वर्ष नुकतीच झाली. म्हणजे भ्रष्टाचाराच्या गळफासासाठी त्यांना पुरेसा दोरखंड मिळाला. तरीही एक देखील घोटाळा केंद्रीय पातळीवर उघडकीस आला नाही. त्यांच्या या स्वच्छ प्रतिमेची दखल परदेशी गुंतवणूकदारांनीच नव्हे तर वॉशिंग्टननं घेतली. म्हणून प्रथमच आपले पंतप्रधान बलशाली भूमिका (strength) घेऊन वाटाघाटी करू शकले. त्यांच्या उजव्या व बाजारपेठीय धोरणाला व भ्रष्टाचारमुक्त सरकारला ओबामांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

भारताला अमेरिकेनं मिझल टेक्नॉलॉजी कंट्रोल रेजिम (Missile Technology Control Regime, MTCR) या खास गटाचं सदस्यत्व बहाल केलं. हा मान अजूनपर्यंत चीनला देखील मिळाला नाही. २०१५ मध्ये इटलीनं विरोध केल्यामुळे भारताला हे सदस्यत्व मिळालं नाही. पण अमेरिकेच्या आशीर्वादामुळे ते आता प्राप्त झालं. त्याचे दोन फायदे. एक म्हणजे क्षेपणास्त्र तंत्रज्ञान इतर देशांकडून आयात करणं शक्य होईल. दुसरं म्हणजे त्यामुळे भारताची जागतिक प्रतिमा उजळली. तो एक जबाबदार देश म्हणून ओळखला जाईल. पाकिस्तानलाही हा मान मिळालेला नाही.

याशिवाय मोदींचं यश ओळखून अमेरिकेनं भारताला महत्त्वाचा लष्करी भागीदार (Major Defense Partner) म्हणून सन्मानित तर केलंच पण भारताचा लौकिक वाढवला. यात भारत आता बरोबरीचा झाला असं अभिप्रेत आहे. याचं महत्त्व असं की अमेरिकेची जी खास दोस्त राष्ट्र आहेत आणि ज्यांच्यात एकमेकांवर कमालीचा विश्वास दाखवण्यात येतो त्या राष्ट्रांच्या पंक्तीला आता भारत बसणार. हे सूनबाईला घरातल्या तिजोरीच्या किल्ल्या देण्यासारखं. हे महासत्ताक राष्ट्र अशा निवडक देशांना अतिगुपित लष्करी तंत्रज्ञान पुरवते. या खास भागीदारीमुळे दोन देशांत द्वैत राहिलेलं नाही. याचा आपल्या लष्कराला खूपच फायदा होऊन चीनला तोंड देण्यास मदत होईल. आतापर्यंत भारत अमेरिकेच्या घरात एक पाहुणा होता. आता त्याला या लष्करी भागीदारीमुळे गाभाऱ्यात प्रवेश मिळाला. अशा सामिप्यास आशिया खंडातल्या कुठलाच देश पात्र झाला नाही. हा मोदींच्या मुकुटातला एक महत्त्वाचा तुराच आहे.

हे दोन देश एकत्र येण्यामागे चीन व पाकिस्तानही तेवढेच जबाबदार आहेत. किंबहुना त्या साम्यवादी देशाची सावली या बैठकीत पसरली होती. चीन एक महासत्ताक राष्ट्र म्हणून उदयास येत आहे. त्यामुळे गेल्या काही वर्षांत या भागातलं भूराजकीय समीकरण बदललं आहे. अण्वस्त्रधारी पाकिस्तानही चीनच्या इशाऱ्यांवर भुंकतो आहे. चीनला विस्तारगंड जडलेला असून त्या देशानं सर्व दक्षिण चिनी समुद्रावर व त्याच्या पोटात असलेल्या खनिज संपत्तीवर मालकी हक्क जाहीर केले. एवढंच नव्हे तर समुद्रातील स्प्राटले (Spratlys) नावाची लहान लहान बेटं जुळवून लष्करी छावणी उभारली. त्यामुळे अमेरिकेचे त्या भागातले दोस्त राष्ट्रे (फिलिपाईन्स, जपान, बोर्निओ, दक्षिण कोरिया व मलेशिया) भयग्रस्त होऊन त्यांनी मदतीसाठी अमेरिकेकडे धाव घेतली. एकेकाळचा कट्टर शत्रू- व्हिएटनाम देखील या महासत्ताक राष्ट्राचा मित्र झाला. परवाच म्हणजे मोदी अमेरिकेत येण्यापूर्वी चार आठवडे अगोदर ओबामांनी व्हिएटनामला भेट देऊन त्या देशांवर लादलेली लष्करी बंधनं उठवली व दोन देशांत व्यापार सुरू केला. त्या देशाचा रोष चीनवर ओढवला असून आता तो संरक्षणासाठी अमेरिकेकडून शस्त्रास्त्रे मिळवू शकेल.

याप्रमाणे अमेरिकेनं चीनला आटोक्यात ठेवण्यासाठी चीनभोवती दोस्त राष्ट्रांची माळ तयार केली. पण तिच्यात एक मोठं भोक होतं. आता भारताशी जवळीक साधून ही माळ पूर्ण केली. जर वेळ आली तर अमेरिका या माळेचं गळफासात रूपांतर करू शकते. या गोऱ्या राष्ट्रानं भारताला आपल्या गटात ओढण्याचे अनेक प्रयत्न केले. पण मोदींनी आपल्या पारंपरिक तटस्थ धोरणाचा त्याग करण्यास विनम्रपणे नकार दिला. त्यांनी अमेरिकेचं भारताच्या प्रगतीसाठी महत्त्व ओळखून आतापर्यंत रशियाकडे झुकणारं धोरण यापुढे पश्चिमेकडे वळवण्याचं मान्य केलं. यात अमेरिका व पाकिस्तानमधले दृढ संबंध आड येत. पण अमेरिकेनं आता त्या मुस्लिम देशाला दूर ढकललं असून पूर्वीचे संबंध तोडले. हे त्या देशाच्या उच्च राजनैतिक अधिकाऱ्यांनी या बैठकीत कबूल केलं. आयसीस (ISIS) चा नायनाट न केल्यामुळे व ओसामाला गुप्त आश्रय दिल्यामुळे उभय देशातील संबंधांवर विरजण पडलं. त्याचे परिणाम परवाच दृष्य झाले. अलिकडेच अमेरिकेनं ८ लढाऊ विमानं (F-16) ६०० दशलक्ष डॉलरला पूर्वीच्या करारानुसार पाकिस्तानला विकण्याचं कबूल केलं. परंतु इथल्या सिनेटनं त्यासाठी पैसे उसने देण्याचं नाकारलं. त्या मुस्लिम देशाजवळ डॉलर नसल्यामुळे त्यानं धुमसत तो सौदा नाकारला व चीनकडे झोळी पसरली. याप्रमाणे दोन देशांतील फूट कायमस्वरूपी झाल्यामुळे भारताला अमेरिकेकडे झुकणं शक्य झालं. या नात्यात समता व बंधुत्व अभिप्रेत होतं. मागच्या वर्षी पाकिस्तानी सेनेचे सरसेनापती अनामंत्रित वॉशिंग्टनला आले. तेव्हा उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी त्यांना भेटायला नाकारलं. याबरून पाकिस्तान आता अमेरिकेच्या वर्तुळात राहिलेला नाही हे सिद्ध झालं. त्याचं व्यूहात्मक महत्त्व लोप पावलं.

एकेकाळी चीन अमेरिकाधार्जिण होता. अमेरिकेच्या भव्य बाजारपेठेचा उपयोग करून तो श्रीमंत झाला. आजही चीन अमेरिकेला आयातीपेक्षा ५०० अब्ज डॉलर जास्तीचा माल निर्यात करतो. त्यामुळे अमेरिकेतील औद्योगिक उत्पादनक्षेत्रावर कुऱ्हाड पडून कारखाने बंद झाले व ४-५ दशलक्ष लोकांच्या नोकऱ्या

गेल्या. आज दोन देशांतील संबंध ताणले जाऊन विस्तारगंडामुळे त्याला चरा गेला. याशिवाय चीननं अणुपाणबुड्या बंगालच्या उपसागरात पाठवून भारताच्या प्रभुत्वाला आव्हान दिलं. न्यू यॉर्क टाइम्सनं मोदी इथे असताना एका लेखात म्हटलं की, भारत-चीन सीमाप्रश्नांच्या बाबतीत त्या देशानं ताठर भूमिका तर घेतलीच व गेल्या काही महिन्यात बैठकीला येणं बंद केलं. चीनच्या या उर्मट वागणुकीमुळे जगातल्या दोन मोठ्या लोकशाहींना जवळीक साधणं शक्य झालं.

समतेच्या भूमिकेतून मोदी प्रथमच अमेरिकेला आले होते. मग त्यांनी ओबामांना काय दिलं? एक म्हणजे अमेरिकेच्या अध्यक्षांना जीव की प्राण असलेल्या विषयाला पुष्टी दिली. पर्यावरण रक्षणात ओबामांना फार रस असून तो त्यांचा वारसाविषय (legacy) होणार आहे. आतापर्यंत त्यांनी चीनसह अनेक देशांची दाढी धरून पर्यावरण करारावर सह्या करून घेतल्या. त्याला आतापावेतो भारतानंच संमती दिली नव्हती. प्रदूषणाच्या बाबतीत अमेरिका व चीननंतर आपलाच नंबर लागत असल्यामुळे भारताचं सहकार्य आवश्यक होतं. मोदींनी हरित वायू उत्सर्जनावर बंधनं घालण्यास पावलं उचलू असं ओबामांना आश्वासन दिलं आणि त्यांचं मन झंकारित झालं. डोनाल्ड ट्रंपने आपण निवडून आलो तर हे सर्व करार रद्द करू अशी घोषणा केली. पण सहा महिने अगोदर सह्या झाल्यामुळे कुठल्याही देशाला या करारातून ४ वर्षे निघता येणार नाही. ओबामांची कारकीर्द संपायला अजून ७ महिने असल्यामुळे त्यांना मोदींचं सहकार्य महत्त्वाचं होतं.

पंतप्रधानांनी अमेरिकेला दुसरीही एक सवलत दिली. वसाहतगंडामुळे भारतानं आतापर्यंत परदेशी सैनिकांना देशात येण्याची परवानगी कधीच दिली नाही. या गंडापोटी नेहरूंनी काश्मीरच्या ताबारेषेवर संयुक्त राष्ट्रसंघाचे निरीक्षक ठेवण्यास नाकारलं होतं. त्याच भावनेपोटी नेहरू-इंदिरा गांधींनी परदेशी कंपन्यांना भारतात येऊ दिलं नाही. पण ही संवेदना आता शिथिल झाली आहे. म्हणून मोदींनी प्रथमच अमेरिकेच्या नौदलाला रसद घेण्यासाठी, विसाव्यासाठी व डागडुजीसाठी भारतीय बंदरं खुली करून ओबामांना खुश केलं. याप्रमाणे दोन देशात समतेच्या भावनेतून देवाणघेवाण होऊन ते जवळ आले व एक नवीन पहाट सुरू झाली.

भारताचा आदर करण्यासाठी ८ जून २०१६ रोजी मोदींना संसदेच्या संयुक्त सभेत (Congress) भाषण देण्याचं खास आमंत्रण देण्यात आलं होतं. त्यासाठी लोकसभापती पॉल रायान व सिनेटचे मुख्य उपाध्यक्ष ज्यो बायडन हजर होते. अमेरिकेच्या लोकसभागृहात ४३५ सभासद व सिनेटमध्ये (उच्चगृह) १०० सिनेटर्स आहेत. या संयुक्त विधीसभेत मोदी इंग्रजीतून ४५ मिनिटं बोलले आणि त्यांनी श्रोतृवर्गावर आपली खास छाप पाडली. सभासदांनी उठून आठदा टाळ्या वाजवल्या. असा उत्स्फूर्त प्रतिसाद फक्त अध्यक्षीय भाषणालाच मिळतो. मागच्या वेळी २००५ मध्ये मनमोहनसिंगांनी तिथे भाषण दिले असता बरंचसं सभागृह रिकामं होतं. ते दूरचित्रवाणीवर चांगलं दिसत नसल्यामुळे रिकाम्या जागा ऐन वेळेवर ऑफिसमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी भरून काढाव्या लागल्या. त्यांना भूगोलात भारत कुठे आहे हे देखील ठाऊक नसेल. पण अशी आपत्ती यावेळी कोसळली नाही हे विशेष. याचं एक कारण म्हणजे मोदींचं वक्तृत्व तर होतंच पण भारताच्या वाढत्या अर्थकारणामुळे ते अगोदरच वलयांकित झाले होते. त्यामुळे त्यांचं भाषण ऐकण्यास सर्व उत्सुक होते.

या बाबतीत श्रोतृवर्गाची मुळीच निराशा झाली नाही. ते म्हणाले की, अमेरिकेच्या राज्यघटनेचे दोन खांब आहेत- बंधुत्व व समता. तेच भारताच्या संविधानातही सापडतात. काही लोकांनी भारतात पुरेसं धार्मिक स्वातंत्र्य नसून मानवी हक्कांचं उल्लंघन होतं अशी तक्रार केली. मोदींनी त्याला सडेतोड उत्तर दिलं. त्यांनी भारत आपल्या राज्यघटनेला पवित्र पुराणग्रंथ समजत असून त्यात प्रत्येकाला या सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत, असं सांगितलं. भारताला जेव्हा स्वातंत्र्य मिळालं तेव्हा त्याची धार्मिक, भाषिक व सांस्कृतिक व्यामिश्रता बघून देशाचे तुकडे पडतील असं पाश्चात्यांनी भाकित केलं होतं. त्यांना काळानं खोटं ठरवलं. आज बहुभाषांच्या सुमधुर आवाजात 'भारत एक आहे!' असं गाणं आळविण्यात येतं. याची जगानं दखल घ्यावी. अमेरिकेतील दोन्ही सभागृह विरोधी पक्षाच्या ताब्यात असल्यामुळे ओबामांची विधेयकं कचऱ्याच्या पेटीत पडतात असं कानावर पडलं म्हणून मोदींना काहीसा हुरूप आला. याबाबतीत त्यांना दिल्लीतल्या राज्यसभेची सोबत आहे असं म्हणून त्यांनी हशा पिकवला. मोदींनी कुशलतेनं मार्टिन ल्यूथर किंग, कवी वाल्ट व्हिटमन, गुलामगिरी कायद्यानं बंद करणारे अध्यक्ष अब्राहम लिंकन, महात्मा गांधी व न्यू यॉर्कच्या कोलंबिया विद्यापीठातून विधीशिक्षण घेतलेले व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. आंबेडकर यांची नावं भाषणात गुंफून श्रोतृवर्गाला मंत्रमुग्ध केलं.

याप्रमाणे मोदींनी अवघ्या तीन दिवसांच्या दौऱ्यात अमेरिका काबीज तर केलीच पण त्याबरोबर भारताची डागाळलेली जागतिक प्रतिमा उजळवली. हे 'सुटाबुटातलं' सरकार प्रथमच महासत्ताक राष्ट्राच्या विश्वासार्हतेला पात्र होऊन त्याच्या पंक्तीला बसलं. हे प्राप्तव्य काही कमी मोलाचं नाही. चायना सेंट्रल टेलिव्हिजननं देखील या भेटीचं प्रक्षेपण केलं हे विशेष.

९ जूनला मोदींचं विमान मेक्सिकोकडे जाण्यासाठी ढगांमागे लपलं तरी त्यांच्या भेटीचा सुगंध अनिवासी भारतीयांच्या मनात तरी दीर्घकाळ दरवळत राहिला.

**- डॉ. अनंत पां. लाभसेटवार** (Ph.D.)
latalabh@aol.com
(लेखक फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनी, कॅन्सास अमेरिका या वित्तसंस्थेचे १४ वर्षे चेअरमन ऑफ दी बोर्ड होते.)




# सार्वमताची कुऱ्हाड

आल्हाद गोडबोले

**सार्वमताच्या प्रयोगात बहुमताचा आदर राखण्याच्या नादात तथाकथित 'अल्पसंख्य' हे प्रत्यक्षात बहुमतात असण्याची शक्यता असूनही उलटाच इतिहास आकाराला येऊ शकतो आणि या वस्तुस्थितीस 'संशयाचा फायदा'देखील न मिळण्याची ऐतिहासिक चूक घडू शकते, हे वास्तव 'ब्रेक्झिट'च्या उदाहरणातून समोर येत आहे. जनमताच्या रेट्यापुढे मान तुकवून, युकेमध्ये पुन्हा सार्वमत घेतले गेले आणि आधी सार्वमतांत भाग न घेतलेल्या २८ टक्क्यांपैकी निम्म्याहून अधिक म्हणजे, १५-१६ टक्के ब्रिटिशांनी युरोपीय समुदायातच राहण्याच्या बाजूने कौल दिला तर हा निर्णय पूर्ण उलटा फिरू शकतो!**

'युरोपीय समुदायात राहावे की नाही' यावर युनायटेड किंग्डममध्ये नुकत्याच झालेल्या सार्वमताचे, म्हणजे 'ब्रेक्झिट'चे कवित्व अजून संपलेले नाही. किंबहुना भावी युरोपबरच नव्हे, तर जागतिक राजकारण, अर्थकारणावर आणि जगाच्या नकाशावरही त्यामुळे कायकाय परिणाम होऊ शकतील, यावर सर्वत्र चर्चेला ऊत आला आहे. मात्र लोकशाहीत जन्माला आलेली ही संकल्पना जिथे लोकशाहीचाच पुरस्कार केला जातो, अशा एकसंध राष्ट्राच्या किंवा युरोपसारख्या समूहाच्या आणि पर्यायाने लोकशाहीच्याच मुळावर येत असल्याचे दुश्चिन्ह दिसू लागले आहे. सार्वमताच्या प्रयोगात बहुमताचा आदर राखण्याच्या नादात तथाकथित 'अल्पसंख्य' हे प्रत्यक्षात बहुमतात असण्याची शक्यता असूनही उलटाच इतिहास आकाराला येऊ शकतो आणि या वस्तुस्थितीस 'संशयाचा फायदा'देखील न मिळण्याची ऐतिहासिक चूक घडू शकते, हे वास्तव 'ब्रेक्झिट'च्या उदाहरणातून समोर येत आहे. जनमताच्या रेट्यापुढे मान तुकवून, युकेमध्ये पुन्हा सार्वमत घेतले गेले आणि आधी सार्वमतांत भाग न घेतलेल्या २८ टक्क्यांपैकी निम्म्याहून अधिक म्हणजे, १५-१६ टक्के ब्रिटिशांनी युरोपीय समुदायातच राहण्याच्या बाजूने कौल दिला तर हा निर्णय पूर्ण उलटा फिरू शकतो! हा यातील कळीचा मुद्दा आहे. अन्यथा सार्वमतात भाग न घेतलेल्या २८ टक्के ब्रिटिशांसह लाखो नागरिक पुन्हा सार्वमत घेण्याच्या मागणीसाठी रस्त्यावर उतरलेच नसते.

या पार्श्वभूमीवर हे लक्षात घ्यायला हवे आहे की, सार्वमत

हे कोणत्याही प्रश्नावरचे अंतिम उत्तर नव्हे आणि त्यातून मानला जाणारा कौल खऱ्या अर्थाने 'जनतेचा' असेल असे नाही! याचबरोबर गोव्यात किंवा सिक्कीममध्ये सार्वमताचा कौल मानणाऱ्या भारताने विदर्भच नव्हे तर, गुरखालँड, नागालॅण्ड किंवा काश्मीरचा प्रश्न सार्वमताच्या आधारावर सोडविण्याच्या मागणीस धूप घालण्याचे कारण नाही, असेही ठणकावून सांगण्याची वेळ आली आहे. कारण सार्वमताचा हा दांडा भारतासारख्या बहुसांस्कृतिक राष्ट्राचा, लोकशाहीचा आणि 'ग्लोबल व्हिलेज'च्या उदार संकल्पनेचाच 'काळ' ठरण्याची शक्यता दिसू लागली आहे.

सार्वमत ही फक्त लोकशाहीतच अमलात येऊ शकणारी संकल्पना आहे. लोकशाहीतील उदारमतवादाचे प्रतीक मानावे, असा हा आदर्श. 'अल्पमतातील' ४९ टक्के नागरिकांनी विरोधी कौल दिला तरी ५१ टक्क्यांच्या 'बहुमताचा' आदर राखणारे तत्त्व. कम्युनिस्ट राजवटीकडून किंवा लष्करी हुकूमशाहीकडून सार्वमताची अपेक्षासुद्धा कोणी करीत नाही. पण नवयुरोप किंवा भारतासारख्या लोकशाही राष्ट्रांत मात्र उठसूठ सार्वमताच्या आधारावर प्रश्न सोडविण्याची मागणी केली जाते आणि गोव्यापासून स्कॉटलंडपर्यंत अनेक नाजूक प्रश्नांवर सार्वमत घेण्याचे धाडस दाखविलेले असूनही काश्मीरसारख्या गुंतागुंतीच्या मुद्द्यावर वेळोवेळी चर्चा होत राहते. पण तिबेटला चीनमध्येच ठेवावे की स्वातंत्र्य द्यावे, यावर कधी सार्वमत घेतले जाईल का? जाफना प्रांत वेगळा करून तामिळांना – किंवा गाझा पट्टी पॅलेस्टिनियनांना देऊन – अशा नव्या प्रांताला स्वायत्तता देऊन टाकावी, असे सार्वमताच्या माध्यमातूनच ठरविण्याचा आग्रह संयुक्त राष्ट्रे धरतील काय? याउलट गोवा महाराष्ट्रात सामील करण्याबाबतचा निर्णय सार्वमताचा कौल घेऊन केला जातो आणि मराठी माणूस ते मोठ्या मनाने स्वीकारतो किंवा राजेशाहीला विराम देऊन शेजारच्या भारत देशात सामील होण्याची सिक्कीमची प्रक्रिया मात्र लोकेच्छा आणि निवडणुकीचा निःशंक कौल लक्षात घेऊनच, वास्तवात येते.

मुद्दा हा की, हुकूमशाही, राजेशाही किंवा लष्करशाहीतून आकाराला येणाऱ्या जगाच्या नकाशात 'सार्वमताच्या माध्यमातून' अस्तित्वात येणाऱ्या राष्ट्राला थारा नसतो. ती शक्यता फक्त लोकशाहीतच असते. कारण सार्वमत ही संकल्पना लोकशाहीतच जन्माला आलेली असून कोणत्याही लोकशाहीतच ती अंमलात येऊ शकते आणि ती जनतेला मान्यही असते. तिची प्रक्रिया निवडणुकीसारखीच जनतेचा आणि बहुमताचा कौल अजमावून निर्णय करणारी असते. फरक एवढाच की, सार्वमत हे एका विशिष्ट प्रश्नावर 'हो' किंवा 'नाही' अशा थेट निर्णायक मतावर जोखले जात असते. म्हणजे पोर्तुगीजांच्या जोखडातून मुक्त करण्यात आलेल्या गोवा, दीव आणि दमण यांचा 'केंद्रशासित प्रदेश' हाच दर्जा कायम राहू द्यावा की हा प्रदेश शेजारच्या (आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे जेथील स्वातंत्र्यसैनिकांच्या लढ्यामुळे तो स्वतंत्र होऊ शकला, त्या) महाराष्ट्रात विलीन करावा, या एकाच मुद्यावर १६ जानेवारी १९६७ रोजी जनमत घेण्यात आले. त्याचा निर्णय



बंधनकारक राहील, हे आधी ठरविण्यात आले. एकूण तीन लाख ८८हजार ४३२ नागरिकांपैकी तीन लाख १७हजार ६३३ म्हणजे ८१. ७७ टक्के गोवेकरांनी त्यात भाग घेतला. त्यात ४३.५० टक्के म्हणजे एक लाख ३८हजार १७० जणांनी महाराष्ट्रात सामील होण्यास अनुकूल, तर ५४.२० टक्के म्हणजे एक लाख ७२ हजार १९१ जणांनी विरोधात कौल दिला. इथेही १८ टक्क्यांहून अधिक नागरिक प्रत्यक्ष मतदानांत सहभागी झालेले नव्हते. त्यात अनुकूल आणि प्रतिकूल नेमके किती असतील, याचा अंदाज बांधता येणार नाही. पण समजा, पुन्हा सार्वमताची मागणी झाली असती आणि त्यात भले १८ टक्क्यांपैकी बहुतांश नागरिकांनी महाराष्ट्रात सामील होण्याच्या बाजूने कौल दिला असता, तरी अनुकूल आणि प्रतिकूल मतांमधील फरक भरून निघणे किंवा निकाल फिरणे जवळजवळ शक्य नव्हते. म्हणजे गोव्यातील 'बहुमत' महाराष्ट्रात सामील होण्याच्या विरुद्ध होते. अर्थात हे खरे असले तरी याच वास्तवाचा दुसरा अर्थ असा होतो की, ४३ टक्के किंवा त्याहून अधिक गोवेकरांना महाराष्ट्रात आणि महाराष्ट्रांतच यायचे होते. याचा अर्थ गोव्याच्या स्वातंत्र्यानंतर अर्धशतक उलटून गेले तरी त्यांची इच्छा डावलली गेली आहे! अर्थात मराठी माणसाने मनाचा मोठेपणा दाखवून गोव्यातील बहुमताचा आदर राखला आणि विद्यमान लोकशाही चौकटीत ते गैरही नाही. 'महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष' त्यानंतर अनेक वर्षे सत्तेत येऊनही गोवा तेव्हापासून केंद्रशासित प्रदेशच राहिला आणि १९८७ मध्ये त्यास राज्याचा दर्जा मिळाला, हे वास्तव उरले आणि आपण साऱ्यांनी ते मान्य केले.

स्वातंत्र्यानंतर भारत आणि चीन यांच्या मधील सीमावर्ती सिक्कीमचे संरक्षण, दळणवळण आणि परराष्ट्र व्यवहार आधीच्या ब्रिटिश राजवटीप्रमाणे भारताकडे राहिले, तरी सिक्कीमची स्वायत्तता जवळजवळ तीन दशके कायम होती. किंबहुना स्वातंत्र्यानंतर तेथील जनतेने भारतात सामील होण्यास आधी नकार दिला होता, तो स्वीकारून सिक्कीमचा 'प्रोटेक्टोरेट स्टेट' हा दर्जा कायम ठेवण्यात आला. पण साधारण दीड-दोन दशकांनंतर आणि विशेषतः १९६२च्या भारत-चीन युद्धापासून सिक्कीममधील जनमत बदलत गेले. राजेशाहीला कंटाळलेल्या सिक्कीमवासीयांना शेजारच्या

भारतातील लोकशाही अधिक चांगली वाटू लागली. त्यातून जनमताचा रेटा वाढत जाऊन उभ्या राहिलेल्या चळवळीमुळे आणि 'सिक्कीम राष्ट्रीय काँग्रेस' या राजकीय पक्षामुळे वातावरण पूर्णपणे बदलले आणि अखेरीस तेथील चोग्याल- म्हणजे राजा - पालडेन थोन्डुप नामग्याल यांनी स्वतः १४ एप्रिल १९७५ रोजी घेतलेल्या सार्वमतानुसार सिक्कीमचे भारतात विलीनीकरण झाले. हा कौल ९७.५५ टक्के सिक्कीमवासीयांकडून भारतात सामील होण्यास मान्यता देणारा, एवढा खणखणीत होता की, चीन किंवा पाकिस्तान यांनी त्याविरोधात प्रतिक्रिया व्यक्त केली तरी जगभरात त्याची टरच उडवली गेली.

वानगीदाखल दिलेले आपल्याच देशातील सार्वमताचे हे दोन कौल निर्विवाद आणि पुरेसे बोलके आहेत. ते काठावरचे किंवा 'संशयाचा फायदा' देणारे नाहीत. युकेतील ताज्या किंवा दोन वर्षांपूर्वी स्कॉटलंडमध्ये घेतल्या गेलेल्या सार्वमताचा अर्थ मात्र वेगळा आहे. ते निर्विवाद नाहीत. शंभर टक्के मत अजमावले गेले तर वेगळा कौल मिळू शकतो. तशी संशयाला जागा राहिली तरी तो कौल 'खरा' ठरत नाही. युकेमध्ये पुन्हा सार्वमत घेण्याच्या मागणीतून हेच सूचित होते.

युरोपीय समुदायात राहायचे अथवा नाही यावर नुकत्याच घेतलेल्या सार्वमताची आकडेवारी पाहिली तर ५२ टक्के नागरिक बाहेर पडण्याच्या बाजूने तर ४८ टक्के युरोपीय समुदायात राहावे, या मताचे आहेत, असे दिसते. अर्थात तेही ७२.२१ टक्के नागरिकांचेच मत आहे, हा एक मुद्दा आहेच, पण त्यातही स्कॉटलंडमधील ६२ टक्के आणि उत्तर आयर्लंडमधील ५६ टक्के नागरिकांनी बाहेर पडण्याच्या विरोधात स्पष्ट कौल दिला आहे. याचा अर्थ स्कॉटलंड आणि उत्तर आयर्लंड हे दोन्ही प्रांत इंग्लंडच्या बाजूने नाहीत आणि निदान स्कॉटलंड तरी नजीकच्या भविष्यकाळात पुन्हा सार्वमत घेऊन युकेमधूनच बाहेर पडेल. कारण, याला पार्श्वभूमी आहे ती सप्टेंबर २०१४ मध्ये स्कॉटलंडमध्ये घेतल्या गेलेल्या सार्वमताची. १ मे १७०७ पासून ग्रेट ब्रिटनचा एक हिस्सा असलेल्या स्कॉटलंडने आताच्या युनायटेड किंग्डमपासून फारकत घेऊन स्वतंत्र व्हावे अथवा नाही, याचा निर्णय पावणेदोन वर्षांपूर्वी सार्वमताच्या माध्यमातून घेतला, तेव्हा ५२ विरुद्ध ४८ टक्के असा कौल मिळाल्यामुळे युकेचे विभाजन त्यावेळी टळले. पण आता त्याची पुनरावृत्ती होणार नाही. फेरसार्वमतात हीच आकडेवारी उलटेल आणि स्कॉटलंड फुटून निघणे अटळ ठरेल, असे आत्ताच मानले जाऊ लागले आहे.

हे तपशीलाने सांगण्याचे कारण हे की, समजा विदर्भात सार्वमत घेतले आणि तेथील जनतेने ५१ विरुद्ध ४९ असा काठावरचा कौल दिला, तर ती तमाम विदर्भवासीयांची इच्छा मानून स्वतंत्र राज्य अस्तित्वात आणायचे काय? विदर्भ इकडे असला काय किंवा तिकडे, भारतातच राहणार आहे ना, अशी मखलाशी यावर होऊ शकते. पण काश्मीरबाबत केवळ एवढाच मुद्दा मांडता येणार नाही. कारण गेल्या सहा दशकांत तिथे डझनावारी



निवडणुका झालेल्या आहेत, त्यांत तेथील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन लोकनियुक्त सरकारे सत्तेवर आणलेली आहेत. आता त्यांना स्वातंत्र्याचे आमिष दाखवून, सार्वमताच्या काठीने लोकशाहीचा बाघ मारण्याचे कारस्थान कुणाच्या तरी सांगण्यावरून रचले जाणार असेल, तर ते अमलात आणू देण्याचे कारण नाही. लोकशाहीतील निवडणुकांचा प्रदीर्घ कौल हा सार्वमतापेक्षाही अधिक निर्णायक मानावा लागेल. कारण लोकशाहीतील निवडणुकीच्या कौलावर विश्वास ठेवणाऱ्या ४९ टक्के नागरिकांचा सार्वमतात विश्वासघात होऊ शकतो. युकेतील सार्वमताने हाच धोका जगासमोर आणला आहे. युके किंवा विदर्भच नव्हे, तर जगाच्या पाठीवर कुठेही कोणत्याही भूभागाचे भवितव्य ५१ किंवा ४९ टक्क्याच्या आधारावर ठरविण्याचा धोका यापुढे पत्करला जाऊ नये. समजा, काहीही कारणाने तशी वेळ आली किंवा येणार असेल, तर सार्वमताचा कौल निव्वळ बहुमताच्या आधारावर न मानता दोनतृतीयांश, किंबहुना तीनचतुर्थांश मतांचा पाठिंबा असेल, तरच तो मानावा. अशी अट घातली किंवा संसदेने तसे ठरवून कायदा केला, तर सार्वमताच्या अतिरेकी मागणीला आळा तरी बसू शकेल.

जगाचे राहो, भारताने तरी युकेच्या घडामोडीतून हा धडा शिकायला हवा.

**(दै. 'पुढारी'च्या सौजन्याने)**


**- आल्हाद गोडबोले**
भ्रमणध्वनी : ८८०५००७५९१
alhadgodbole@gmail.com

रोहन प्रकाशन


# काही लक्ष्यवेधी पुस्तकं





किं.रु.२५० (२४८ पानं)





किं.रु.२०० (२४० पानं)




किं.रु.३०० (३१२ पानं)




किं.रु.२५० (२८८ पानं)




किं.रु.२५० (२४८ पानं)




किं.रु.२५० (२८० पानं)

## या पुस्तकांवर विशेष ऑफर : २५% सवलत

३१ जुलैपर्यंत विशेष ऑफर

रोहन प्रकाशन

५ व ६ धवलगिरी, शनिवार पेठ, पुणे ३०
© पुणे २४४८०६८६ मो. ८१४९१२०२१०
© मुंबई २३८९२३७८ मो. ९८६९११८७६२
E-mail : rohanprakashan@gmail.com

अधिक माहितीसाठी
आमच्या वेबसाईटला भेट द्या
www.rohanprakashan.com

# स्नेहमयी अण्णा



**अपर्णा पाटील**

संगीतकार स्नेहल भाटकर... भाटकर बुवा, व्ही. जी. भाटकर, बी. वासुदेव आणि अगदी संगीतकाराची पहिली जोडी अशी ओळख असलेल्या वासुदेव-सुधीर मधील वासुदेवही तेच. अशा वेगवेगळ्या नावांनी परिचय असलेल्या संगीतकार स्नेहल भाटकर यांचं आणखी एक संबोधन म्हणजे अण्णा. त्यांच्या कुटुंबातील लहानमोठ्या सगळ्यांसाठी ते अण्णा होते. वासुदेव गंगाराम भाटकर यांनी चित्रपटांना संगीत देण्यासाठी आपलं नाव बदललं. सुधीर फडके यांच्याबरोबर सिनेमा करण्यासाठी ते वासुदेव झाले. तर केदार शर्मांच्या आग्रहाखातर पहिल्यांदा संगीतकार बी. वासुदेव मग प्रेमाखातर स्नेहल भाटकर झाले. त्यांची ही ओळख सिनेजगतात लोकप्रिय झाली. तरी गिरणी कामगारांच्या, साध्या भोळ्या भाविकांसमोर ते भाटकर बुवा होत, ज्ञानेश्वर, तुकोबांच्या अभंगांमध्ये अखंड बुडत. कोणाकडून अपेक्षा न करणारे, कोणावरही अपेक्षांचं ओझं न लादणारे. कोणालाही न दुखावणारे आणि प्रत्येकाचं कौतुक करणारे. कधी भेदाभेद न करणारे, कोणत्याही वयातल्या व्यक्तीशी मैत्री करू शकणारे, त्याहीपेक्षा जगण्यातला आनंद शोधत छोट्या छोट्या गोष्टीत शोधत राहणारे... असे स्नेहल भाटकर उलगडत गेले ते त्यांच्या मुलांच्या आणि सुनेशी साधलेल्या संवादामधून.

अभिनेते म्हणून परिचित असलेले त्यांचे धाकटे सुपुत्र रमेश भाटकर, सून मुंबई हायकोर्टाच्या सुप्रसिद्ध जस्टिस मृदुला भाटकर आणि ज्यांच्या नावामुळे त्यांची आपल्याला स्नेहल भाटकर या नावाशी ओळख झाली, त्या त्यांच्या कन्या स्नेहलता ऊर्फ बकुल बरडे यांच्याशी बोलताना संगीतकार म्हणून प्रचंड लोकप्रिय झालेले स्नेहल भाटकर हे पिता, सासरे म्हणून किती साधे होते, याचा परिचय झाला. अण्णांच्या म्हणजेच आपल्या वडिलांच्या या

**१७ जुलै १९१७ हा अण्णांचा म्हणजे संगीतकार, गायक स्नेहल भाटकर यांचा जन्मदिवस. हिंदी आणि मराठी अशी दोन्ही चित्रपटक्षेत्रं एकाचवेळी गाजवतानाही ज्ञानेश्वर, तुकारामांच्या अभंगांत तल्लीन होत भाटकर बुवा म्हणून त्यांनी आपली ओळख शेवटपर्यंत कायम ठेवली. भजनीबुवा असूनही देवभोळेपणा न करणारे आणि हिंदी सिनेमातल्या दिग्गजांमध्ये राहूनही चाळीतल्या दोन खोल्यांमध्ये, साधेपणाने जगण्यात आनंद घेतलेल्या स्नेहल भाटकर यांची, त्यांच्या यंदाच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त कुटुंबप्रमुख अण्णा अशी आणखी एक ओळख करून घेण्याचा हा प्रयत्न...**



'बुवा तेथे बाया' या नाटकाच्या वेळी स्नेहल भाटकर, आचार्य अत्रे आणि रघुवीर तळाशिलकर



सुधीर फडके आणि स्नेहल भाटकर

साधेपणाचं कारण बहुधा त्यांच्या लहान वयातल्या संघर्षात असावं, असं रमेश भाटकर यांनी त्यांच्याविषयीच्या आठवणी सांगताना सहज लक्षात आलं.

सुमारे पाच दशकांच्या कारकीर्दीत स्नेहल भाटकर यांनी २७ हिंदी, १२ मराठी चित्रपटांना आणि काही नाटकांनाही संगीत दिलं. राधामाई, भूमिकन्या सीता इत्यादी. त्यातली ज्योत्स्ना भोळेंनी गायिलेली खेळेल का देव, मानसी राजहंस पोहतो अशी नाटकगीते लोकप्रिय झाली. अनेक चित्रपटांमध्ये गाणीही गायली. रुक्मिणी स्वयंवरपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास नीलकमल, सुहागरात, ठेस, संत तुकाराम, सती अहिल्या, पगले, अशा मार्गाने होत राहिला. संत तुकाराम (१९४८) या चित्रपटात तर त्यांनी सहा गाणी गायली होती. पन्नासच्या दशकात हमारी बेटी, भोला शंकर, नंदकिशोर, गुनाह, आज की बात, बिंदिया, डाकू, दिवाली, जलदीप, हरिया, स्काऊट कॅम्प, छबीली, गुरुभक्ती अशा चित्रपटांना दिलेलं संगीत गाजलं. नीलकमल, सुहागरात, हमारी बेटी, गुनाह, हमारी याद आयेगी, प्यासे नैन, भोला शंकर या चित्रपटांतील गाण्यांच्या लोकप्रियतेच्या पायऱ्या ते चढत होते. त्याचवेळी मराठीत चिमुकला पाहुणा, नंदकिशोर, मानला तर देव, बहकलेला ब्रह्मचारी, अशा चित्रपटांतील गीतांना मिळालेलं यश कल्पनातीत होतं. मराठीत त्यांची झोंबती अंगा जललहरी, तुझ्या कांतीसम रक्तपताका, एक एक पाऊल उचली.., मज नकोत अश्रू घाम हवा (अन्नपूर्णा), तुजसाठी शंकरा (चिमुकला पाहुणा), प्रीतीचा नव वसंत फुलला (या मालक), रात्र काळी घागर काळी, यासारखी असंख्य गाणी गाजली. पण त्यांच्या अभंगांची गोडी विशेष होती. बारियाने कुंडल हाले, डोळे मोडीत राधा चाले, काय सांगू देवा ज्ञानोबाची ख्याती, आपुल्या माहेरा जाईन मी आता..., तुका झालासे कळसमधील काय तुझे उपकार पांडुरंगा, उंचनीच काही नेणे भगवंत.. या अभंगाची गोडी अवीट ठरणं, हे भाटकरांच्या संगीताचं देणं होतं.

मराठीत भावगीतांच्या जोडीने अभंग तर हिंदीत एकीकडे दर्दभरी गाणी तर दुसरीकडे हलकीफुलकी गाणी देत स्नेहल भाटकरांनी संगीतक्षेत्राचं मुलुख मैदान जिंकलं. फरिश्तो की नगरी में आ गया हूँ किंवा सोचता हूँ ये क्या किया मैने (हमारी याद आयेगी), हाले दिल उनको सुनाना था (फरियाद), मुहब्बत भी झूठी (हमारी बेटी), क्यो शिकवा करे (पगले), लहरो पे लहर (छबीली) अशी अनेक गाणी गाजली. तर हे बाबू, हे बा बा (छबीली), ए मेरे हमसफर (छबीली) अशी मॉर्डन स्टाइलची गाणीही प्रचंड लोकप्रिय झाली. हिंदी आणि मराठीत सातत्याने हिट गाणी देऊनही त्यांना कधी त्याचं श्रेय मिळालं नाही. ही खंत त्यांच्या चाहत्यांना आहेच. खुद्द स्नेहल भाटकर मात्र अशी खंत न करता काम करत राहिले, गात राहिले. त्याच्याविषयी जाणून घेताना त्यांचं कारण कळत जातं.

रमेश भाटकर सांगतात, खरं तर मूळचे भाट्ये गावातील (रत्नागिरीजवळचं) आमचं भाटकर कुटुंब सुखवस्तू होतं. आजी सुभद्रा (सखुबाई) चौथी शिकलेल्या होत्या. माझ्या आजोबाच्या निधनानंतर चौथी झालेल्या माझ्या आजीने घराबाहेर पडत व्हर्न्याक्युलर फायनलपर्यंत शिक्षण घेतलं. त्या काळात प्रौढ, विधवा स्त्रीने घराबाहेर पडत शिक्षण घेणं किती मोठं धाडस होतं. ते आधुनिक पाऊल त्यांनी टाकलं होतं. पुढे मुंबईत शिक्षिकेची नोकरी केली.

मुंबईतल्या पालखीवाडीत राहिलेल्या अण्णांचे वडील अण्णा लहान असताना गेले. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या आईने दोन मुलांना एकटीने वाढवलं. आजीचा आवाज सुरेल होता, भजनं म्हणायच्या. अण्णाही लहानपणापासून गायला लागले. त्यांची आई हीच त्यांची पहिली गुरू ठरली. अण्णा लहान असताना त्यांचे मामा मुंबईत त्यांच्याकडे राहायला आले. मामांना पेटी (हार्मोनियम) शिकायची आवड होती. त्यांना पेटी आणून दिली आणि एक शिक्षकही शिकवायला येऊ लागले. त्यावेळी मुलांना पेटीला हातही लावायला मिळत नसे. अण्णा आपल्या मामांना ती वाजवताना पाहू लागले. वाजवायला कोणी शिकवलं नाही, पण अण्णा पेटीवर सहज सूर छेडू लागले. हीच आवड पुढे त्यांना एचएमव्ही या त्यावेळच्या संगीतक्षेत्रातल्या अव्वल रेकॉर्ड

कंपनीपर्यंत घेऊन गेली. एचएमव्हीमध्ये अण्णा नोकरीला (१६ जून १९३९) लागले. नोकरी करत असताना, विश्वंभर प्रासादिक भजन मंडळातही ते गात असत. पुढे ते नवयुग प्रासादिक भजनमंडळींचे प्रमुख बुवा होते.

अण्णा एचएमव्हीमध्ये केवळ वादक म्हणून काम करायचे नाहीत तर तिथे गायचे, अनेक गाण्यांना संगीतही द्यायचे. एचएमव्हीशी संबंधित गीतकार, संगीतकार यांच्याशी अण्णांचे मैत्रीचे सूर जुळले ते त्यामुळेच. गीतकार ग.दि. माडगुळकर, संगीतकार सुधीर फडके यांच्याशी छान मैत्री होती. याच दोस्तीतून फडके यांच्या साथीने संगीत देण्याचा प्रयोग झाला. रुक्मिणी स्वयंवर या सिनेमासाठी वासुदेव-सुधीर नावाने संगीत देणारी त्यांची जोडी ही सिनेसृष्टीतील पहिली संगीतकार जोडी म्हणायला हरकत नाही, असंही रमेश भाटकर सांगतात.

रुक्मिणी स्वयंवर हा चित्रपट मराठी आणि हिंदीत तयार करण्यात आला होता. त्याचे दिग्दर्शक होते, बाबूराव पेंटर. त्याकाळी एचएमव्हीमध्ये रेकॉर्ड केलेली गाणी बाजारात तबकड्यांवर विकायला येत. मात्र त्यासाठी एचएमव्ही सॅम्पल्स रेकॉर्ड तयार करत. तेव्हा अनेकदा अण्णा गात किंवा संगीत देत. त्यामुळे संगीतकार म्हणून सिनेसृष्टीत प्रवेश होण्यापूर्वीच एचएमव्हीच्या रेकॉर्डवर त्यांनी गायलेली, संगीत दिलेली बरीच गाणी आलेली होती. पण हिंदी सिनेमात संगीतकार होण्यास कारणीभूत ठरले केदार शर्मा.

केदार शर्मा हे न्यू थिएटरसाठी काम करणारे यशस्वी दिग्दर्शक, पटकथालेखक आणि गीतकार होते. एका चित्रपटाचं संगीत रेकॉर्ड करण्यासाठी ते कोलकात्याहून एचएमव्हीत आले. तेव्हा दोन्ही साइडसाठी (ए-बी) गाणी रेकॉर्ड करताना एक गाणं कमी पडत होतं. केवळ एक गाणं तयार करण्यासाठी संगीतकार उस्ताद झंडे खान यांना मुंबईला बोलवणं शक्य नव्हतं. त्यावेळी शर्मा यांनी ते गाणं अण्णांनी करावं, असा आग्रह धरला. अण्णांनी तयार केलेलं गाणं केदार शर्मा यांना इतकं आवडलं की त्यांना आपल्या पुढच्या सिनेमासाठी साइन करायचं ठरवलं.

केदार शर्मा यांनी, स्वतः पटकथा लिहून राज कपूर-मधुबाला ही जोडी प्रथमच पडद्यावर आणण्याची तयारी केली होती. संगीतकार म्हणून अण्णा हेच नाव त्यांच्या डोळ्यांसमोर होतं. अण्णा मात्र राजी नव्हते. एचएमव्हीमध्ये नोकरी करण्यात त्यामुळे अडचणी येण्याची शक्यता होती. केदार शर्मांनी मात्र त्यांचं मन वळवलं आणि अण्णांनी तो सिनेमा केला. तो सिनेमा होता, नीलकमल आणि पडद्यावरच्या नामावलीत संगीतकार म्हणून नाव होतं, बी. वासुदेव. अशा रीतीने अण्णांचा हिंदी सिनेमासृष्टीत प्रवेश झाला, अशी आठवण रमेश भाटकर सांगतात.

केदार शर्मा आणि अण्णा यांच्या या मैत्रीचा अप्रतिम आविष्कार म्हणजे हमारी याद आयेगी... हे अविस्मरणीय गीत. हे गाणं खुद्द केदार शर्मा यांनीच लिहिलेलं होतं. हमारी याद आयेगी या गाण्याविषयीची आणखी आठवण अशी की, खरं तर हे गीत लता मंगेशकर गाणार होत्या. मात्र त्यांच्या व्यग्र वेळापत्रकामुळे केदारजींचा सिनेमा लांबणीवर पडू नये, यासाठी अण्णांनी मुबारक बेगम यांना गाण्यासाठी बोलावलं. हे गीत या तिघांच्या कारकीर्दीतलं मानाचं पान ठरलं.




'छबिली' सिनेमासमयी शोभना समर्थ, नूतन, रेकॉर्डिस्ट मिनू कात्रक आणि स्नेहल भाटकर

नवनवे संगीतकार चित्रपटसृष्टीत येण्याचा तो काळ होता. मात्र त्यांच्या संगीतावर पंजाबी ठेक्याचा प्रभाव होता. बंगालकडचं संगीतही प्रभावी ठरत होतं. त्यावेळी अण्णांनी राग पहाडी पहिल्यांदा चित्रपटगीतासाठी वापरून संगीताला नवं वळण दिलं. किस पापी संग उलझी अँखिया (चित्रपट सुहागरात, गायिका राजकुमारी) हे ते गीत इतकं लक्षणीय ठरलं की संगीतकार नौशाद यांनी अण्णांना, आपने हिंदी संगीतकारोंको सही रास्ता दिखा दिया, अशा शब्दांत कौतुक केलं होतं, अशी आठवणही रमेश भाटकर सांगतात.

छुप छुप के तीर चलाए न कोई या गाण्यात बोलाची गती रोखत पुन्हा एकदा वेग देण्याचा प्रयोग स्नेहल भाटकरांनी प्रथमच केला होता. त्यासाठी तबल्याचा वापर करण्याचा प्रयोग नाविन्यपूर्ण होता. रूत है सुहानी बादल छाये रे या गाण्यात मुखड्याचा शेवट पुन्हा पुन्हा आळवत विस्तारण्याचा प्रयोग असो, नाही तर रोओगे पछताओगे गाण्यातली लयीला हळूवार खेचण्याची चाल ही स्नेहल भाटकरांच्या संगीताची वैशिष्ट्ये म्हणता येईल.

अशाच आणखी प्रयोगांविषयी सांगताना रमेशजी सांगतात, पहिली संगीतिका म्हणजे ऑपेरा मराठीत रंगभूमीवर आणण्याचा मानही अण्णांचाच. अभिनेत्री शोभना समर्थ यांनी तनुजाला लाँच करण्यासाठी छबिली हा सिनेमा काढायचं ठरवलं. तनुजा स्वित्झर्लंडला शिकायला असताना बॅले नृत्य शिकल्या होत्या. ते नृत्यकौशल्य सादर करण्यासाठी योग्य संधी मिळावी यासाठी अण्णांनी छबीलीमध्ये तेरा मिनिटांचा ऑपेरा संगीतबद्ध केला. इतक्या मिनिटांचं ऑपेरा संगीत अन्य कोणत्याही हिंदी चित्रपटात संगीतबद्ध न केल्याचं रमेशजींनी नमूद केलं.



## नातं मुलीचं... नावाचं

पहिली मुलगी म्हणून अण्णांची मी विशेष लाडकी होती. मात्र लाजरी होते. मध्यमवर्गातील कुटुंबात असल्यामुळे आपण इतरांपेक्षा वेगळे आहोत, असं वाटलं नाही. आपल्या नावामुळे ते प्रसिद्ध आहेत, याचं कौतुक वाटायचं. आम्हां तिघात माझा भाऊ अविनाश हा गायचा. त्याचा आवाज चांगला होता. रमेश तर अभिनेता झाला. मी मात्र कानसेनच राहिले. मंत्रालयात नोकरी केली. लग्न झाल्यावर माझं स्नेहलता हे नाव बदलून बकुल रामकृष्ण बरडे असं झालं. अण्णा गेल्यानंतर आयुष्यात येणाऱ्या वेगवेगळ्या तारखा, त्यांची आठवण करून देतात. त्यांचा वाढदिवस, कधी त्यांच्या लग्नाचा वाढदिवस.. हे बोलत असताना साठी उलटून गेलेल्या स्नेहलता ऊर्फ बकुलजी भावुक झाल्या.

बरं हे असे प्रयोग करताना इतर संगीतकारांशी त्यांची स्पर्धा सुदृढ अशीच होती. त्याही पलीकडे अनेकांशी मैत्री होती. सी. रामचंद्र, वसंत प्रभू या मित्रांचं घरी येणंजाणं असायचं. एकदा सी. रामचंद्र यांना संगीता चित्रपटासाठी तेरी हाय के साथ निकलेगी मेरी हाय... या कव्वालीचं रेकॉर्डिंग करायचं होतं. कव्वाली मोहम्मद रफी गाणार होते. तेव्हा रमजानचा महिना सुरू होता. गाण्यात हुक्क्याचा उल्लेख असल्याने रमजानमध्ये तशा आशयाचं काही गाऊ शकणार नाही, असं रफीजींनी कळवलं. मग काय आपला हक्काचा मित्र म्हणून सी. रामचंद्र यांनी अण्णांना बोलवलं. ते गायलेही. त्यांच्या मैत्रीची ती आणखी एक मिसाल होती.

अण्णांच्या मनाच्या मोठेपणाचा आणखी एक किस्सा आहे. मुंबईत आलेल्या निर्वासित (रेफ्युजी) कुटुंबातून आलेल्यांपैकी एक होते, रोशनलाल नागरथ. शर्मा उत्तरेकडचे असल्याने रोशनलाल यांना संधी मिळावी, असं वाटत होतं, त्यांनी अण्णांना मी रोशनला माझा सिनेमा देतो असे सांगत बावरे नैन दिला. पण त्याबद्दल अण्णांनी खाईटपणा बाळगला नाही. उलट त्या चित्रपटात अण्णा महम्मद रफी यांनी गायलेल्या गाण्यावर पडद्यावर दिसतात. ते काम त्यांनी अर्थातच गंमत म्हणून केलं होतं. केदार शर्मांनीही बावरे नैननंतर पुढच्याच सिनेमासाठी पुन्हा अण्णांना संधी दिली.

रमेश भाटकर यांनी सांगितलेला आणखी एक प्रसंग असा की, ''एकदा अण्णा आणि मी रंगभवनला सुरू असलेल्या फिल्म फेस्टिव्हलवरून घरी परतत होतो. बसची वाट पाहत थांबलो होतो. त्याचवेळी गीताबाली आपल्या गाडीने घरी निघाल्या होत्या. तेव्हा गाड्यांची संख्या अगदीच कमी होती. अण्णांनी मला ती बघ गीताबालींची गाडी चाललीय, असं सांगितलं. ती गाडी आमच्यासमोरून निघून गेली, मात्र काही वेळाने गाडी रिव्हर्स आली आणि गीताबाली यांनी गाडीतून उतरून आम्हाला आग्रहाने गाडीत बसवलं. विशेष म्हणजे अण्णांच्या संगीतावर बेहद्द खुश असलेल्या गीताजींनी अण्णांची अनेक गाणी गात त्या भेटीचा आनंद त्या प्रवासात साजरा केला.''

गीताबालींचा असा स्नेह असण्याचं कारणही विशेष होतं. त्यांच्या पदार्पणाचा सिनेमा अण्णांनीच केला होता. त्यांच्याखेरीज सिनेसृष्टीतील राज कपूर, मधुबाला, तनुजा, नूतन, भारतभूषण यासारख्या प्रचंड यशस्वी कलाकारांच्या पहिल्या चित्रपटाचं संगीतही अण्णांनी दिलंय. राज कपूर आणि मधुबाला दोघांचा पहिला चित्रपट नीलकमलला अण्णांनी संगीत दिलं होतं. त्याची एक वेगळी आठवण म्हणजे या सिनेमात तीन वेगवेगळ्या आवाजांत राज कपूर यांच्यावर गाणी चित्रीत झाली आहेत. त्यापैकी एका गाण्याच्या ओळी (जईयोना बिदेस मोरा जिया...) खुद्द अण्णांनी गायल्या होत्या.

अण्णांच्या कारकीर्दीतील अत्यंत महत्त्वाची गोष्ट अशी की, महिला निर्मात्यांनी नेहमी त्यांच्या संगीतावर विश्वास टाकला. शोभना समर्थ यांनी आपल्या दोन्ही मुलींना म्हणजेच नूतन आणि तनुजा यांना लाँच करण्यासाठी काढलेल्या हमारी बेटी आणि छबीली या दोन्ही सिनेमांसाठी अण्णांनाच संगीत द्यायला सांगितलं. याचप्रमाणे प्रतिमा दास सेनगुप्ता, कमला कोटणीस, लीला चिटणीस, शुभा खोटे यांनी चित्रपट निर्मिती करताना संगीतकार म्हणून अण्णांची निवड केली होती. अभिमान वाटावा असाच हा योगायोग म्हणता येईल.

संगीतकार म्हणून त्यांची लोकप्रियता अफाट होती. त्याचबरोबर महाराष्ट्रातल्या प्रत्येक घराला अभिमान वाटेल, असे उच्च कोटीचे अभंग गायक म्हणून त्यांना मिळालेला सन्मान हा



'अन्नपूर्णा' या चित्रपटातील गाणे रेकॉर्ड करताना
स्नेहल भाटकर आणि सुमन कल्याणपूर



'चिमुकला पाहुणा' सिनेमासमयी स्नेहल भाटकर, गायिका सुमन
कल्याणपूर आणि सिनेमाच्या दिग्दर्शिका-अभिनेत्री शुभा खोटे

अन्य कोणाच्याही वाट्याला आलेला नाही. भजनीबुवा म्हणून त्यांचा दबदबा मोठा होता. अण्णा आपल्या भजनांनी कार्यक्रम अगदी गाजवून सोडत. गाणारे भजनीबुवा म्हणजे गिरणी कामगारांमध्ये प्रतिदैवतच. अशावेळी बुवांना देवतासमान समजून पाय धरणारे साधेभोळे भाविक असायचे. त्यांचं पाया पडायला येणं, अण्णांना अजिबात चालायचं नाही. मी बिदागी घेऊन गातोय, माझ्या कसले पाया पडता, असं सांगून नकार द्यायचे.

अण्णांचं भाटकरबुवा हे नाव प्रचंड लोकप्रिय होतं. मराठी-हिंदी सिनेमातले स्नेहल भाटकर आणि भजनी मंडळातील भाटकरबुवा असा अत्यंत टोकाचा वाटावा असा विरोधाभास त्यांच्या ठायी असलेल्या साधेपणामुळेच सुसंगत ठरला होता. तरीही मराठी चित्रपटांसाठी अभंग गाताना त्यांनी आपलाच आवाज वापरावा, असा आग्रह कधी धरला नाही. त्याचा एक प्रसंग अण्णांच्या स्वभावाचा परिचय करून देणारा आहे. तुका झालासे कळस या सिनेमाचं संगीत करत असताना पंडितराव नगरकर यांना गाण्यासाठी बोलवण्यात आलं होतं. सुंदर ते ध्यान... हे गाणं मनासारखं होत नव्हतं. त्यावर मंगेश देसाई सिनेमाच्या निर्मात्यांना म्हणाले की, भाटकरबुवा हिरा आहेत. भजनात त्यांची मास्टरी आहेत, त्यांनाच का नाही करू देत गाणं. त्यावर अण्णांनी नगरकर दुखावले जाणार नाहीत, यासाठी त्यांना तसं कळवण्याची जबाबदारी घेण्यास निर्मात्यांना सुचवलं. आपण भजनं गातो म्हणून आपणच गाणीही गाणार असा आग्रह ते सुरुवातीला धरू शकले असते, पण त्यांनी तसं केलं नव्हतं.

अण्णा प्रेमळ होते. शिस्तीत वाढवण्याची जबाबदारी आईची होती. मला मात्र एकदा त्यांच्या फटक्याचा प्रसाद मिळाला होता. अण्णांनी काही तरी कारणाने मला छडीने मारलं. मी संतापलो. त्यांच्याशी बोलणंच बंद करून टाकलं. दोन दिवसांनी त्यांच्या ही गोष्ट लक्षात आली. तेव्हा आईने त्यांना 'तुम्ही त्याला मारलं म्हणून बोलत नाही' असं सांगितलं. तेव्हा मात्र त्यांनी मला जवळ घेतलं. ते स्वतःच रडायला लागले, अशीही आठवण रमेश यांनी सांगितली.

रमेश भाटकर वडिलांच्या जास्त जवळचे राहिले. त्याविषयी सांगताना ते म्हणतात, तिघा भावंडांमध्ये त्यांचा कल बहिणीकडे जास्त होता. पण कायम त्यांच्यासोबत मात्र मी असायचो. कार्यक्रमांत ते गात असताना त्यांच्याजवळ बसणं मला फार आवडायचं. त्यावेळी अण्णांना आर.डी बर्मन यांचे सहाय्यक मारुतीकाका (कीर) तबल्याची साथ करायचे. त्या दोघांजवळ मी बसून असे. शाळेत सर म्हणायचे, तुझे वडील ग्रेट आहेत. अनेकदा शाळेत शारदोत्सव यासारखे वेगवेगळे कार्यक्रम व्हायचे, तेव्हा घरून मला रेकॉर्ड आणायला सांगत. घरी लता मंगेशकर, मुकेश यांच्यासारख्या त्यावेळच्या लोकप्रिय गायकांच्या अनेक रेकॉर्ड असायच्या.

अण्णा अत्यंत आनंदी वृत्तीचे होते. सुखी माणसाचा सदरा घातलेले होते. हिंदी सिनेमांत काम करत असल्याने पैसेही चांगले मिळत होते. केदार शर्मा यांनी त्यांना साइन केलं तेव्हा हजारांच्या चार नोटा काढून दिल्या होत्या. घरी फोर्ड गाडी होती, पण राहायचो मात्र दोन खोल्यांच्या घरातच. तेही एकत्र कुटुंबात. काका, आजी आम्ही म्हणजे अण्णा-आई, आम्ही तीन भावंडं. शोभना समर्थ अण्णांना चेंबूरमध्ये बंगला घ्या, असा सतत आग्रह करायच्या. अख्खी वाडी विकत घ्यावी, एवढे पैसे असूनही अण्णांनी कधी तसं केलं नाही, याचं कारण ते आहे त्यात समाधानी असायचे.

मी गाणं शिकावं असं त्यांना वाटत होतं. चार वर्षांचा असताना मी टिळक संगीत विद्यालयात जायला लागलो. क्लास संध्याकाळी असायचा. अनेकदा मी थकून झोपी जायचो. त्याच काळात आकाशवाणीवरील गंमतजम्मत या कार्यक्रमात दोनदा गायलोही. पण गाण्याचा क्लास काही जमत नव्हता. मग व्हायोलिन शिकण्याचा प्रयोग झाला. आम्ही ज्या चाळीत राहायचो, त्याच्या शेजारी रामप्रसाद शर्मा राहत. ते म्हणजे लोकप्रिय संगीतकार प्यारेलाल यांचे वडिल. ते व्हायोलिन शिकवायचे, व्हायोलिनही मी फार काळ शिकू शकलो नाही. प्यारेलाल यांना हिंदी चित्रपटात संगीतकार म्हणून संधी

मिळाल्यानंतर ते खारला राहायला गेले. त्यांच्यानंतर त्यांच्या खोलीत अब्दुल करीम खान राहायला आले. शंकर यांच्या संगीत दिग्दर्शनातील गाण्यांसाठी तबला वाजवण्याचे काम ते करायचे. त्यांचं अण्णांच्या गाण्यावर प्रचंड प्रेम. नंदकिशोर चित्रपटातील यमुना सावळी किंवा आम्ही जातो आमच्या गावा ही अण्णांची गाणी ऐकून ते अनेकदा ढसाढसा रडायचे. त्यांच्यांकडे माझी तबल्याची शिकवणी सुरू झाली. गंडाबंधन वगैरे झालं. पण माझी बोटं नाजूक. मला त्यामुळे तबला वाजवणं जमेना. त्यामुळे एकूणच काय तर माझं गाणं किंवा वाद्य वाजवणं थांबलं. कदाचित मी ते शिकलो असतो तर नक्कीच संगीतकार झालो असतो, असं आज निश्चित वाटतं. पण अण्णांनी तशा अपेक्षांचं ओझं माझ्यावर कधीच लादलं नाही. पुढे मी अभिनेता झाल्यावर ते माझी नाटकं पहायला येत. त्यांना माझं काम खूप आवडायचं. एकदा केदार शर्मांना घेऊन ते 'अश्रूंची झाली फुले' हे नाटक पहायला आले. त्या नाटकामुळे शर्माजीसुद्धा खूष झाले आणि पुढे त्यांच्या हिंदी सिनेमात 'सहमे हुए सितारे' यात मला प्रमुख भूमिका दिली. त्यामुळे माझी एक इच्छा पूर्ण झाली ती म्हणजे त्या सिनेमाला संगीत होतं स्नेहल भाटकरांचं.

अण्णांनी संगीतक्षेत्रात दिलेलं योगदान आणि त्यांना मिळालेलं नाव याचा विचार केला तर त्यांच्या कामाचं चीज झालं नाही, असं मला वाटतं. स्वतः अण्णांना मात्र त्याबद्दल खेद नव्हता. मुलगा म्हणून रमेश भाटकर यांना जी खंत वाटते तसंच सासरे म्हणून त्यांची एक इच्छा अपूर्ण राहिल्याचं त्यांच्या सूनबाई म्हणजे जस्टिस मृदुला भाटकर यांनी सांगितलं.

मृदुला भाटकर सांगतात, अण्णा माझ्या कायम लक्षात राहतील ते त्यांच्या साधेपणामुळे. भाटकरांच्या घरामध्ये अण्णा मोठे. सासुबाई मुख्याध्यापिका. त्यांच्या कुटुंबावर त्यांच्या आईचे संस्कार झालेले. माझीही आजी, पणजी शिक्षण घेतलेल्या होत्या. स्त्रीला अपेक्षित असलेलं स्वातंत्र्य ती मिळवती असेल, तरच मिळवणं शक्य होतं, ते त्यांच्या आईकडे होते. भाटकरांच्या घरात येऊन ३५ वर्षे झाली. मी मंगळसूत्र घातलं नाही, कधी कुंकू लावलं नाही, ते मी फेमिनिस्ट म्हणून नाही तर तो माझ्या जगण्याचा पॅटर्न होता. लग्न झालं म्हणून आपलं जगणं बदलत नाही, या भावना होत्या. हे स्वातंत्र्य सासरी जपलं, तसं जगू देण्याला अण्णा आणि सासूबाई कारणीभूत होत्या.

मी सतरा वर्षांची होते, संगीतात तर मठ्ठ म्हणावं अशी होते, तेव्हा मला पहिल्यांदा रमेश हा स्नेहल भाटकर यांचा मुलगा आहे हे कळलं नव्हतं. माझ्या घरात भावगीतं, संगीत नाटकांमधील पदं ऐकली जायची. पण रमेश यांच्या घरातल्याप्रमाणे फिल्मी संगीताचा माहोल नव्हता. रेडिओवर ऐकलेलं 'शुक्शुक् मन्या' हे अण्णांचं गाणं मला मांजरी आवडत असल्याने आवडत होतं. माझी आणि अण्णांची पहिली भेट पुण्यात पुरुषोत्तम करंडक स्पर्धेच्या निमित्ताने झाली. मी आणि रमेश प्रेमात पडलो होतो. माझी भूमिका असलेलं आणि रमेश दिग्दर्शन करत असलेलं नाटक स्पर्धेच्या अंतिम



फेरीत पोहोचलेलं होतं. ते नाटक पाहायला अण्णा भरत नाट्यमंदिरात आले होते. टोपी घालून आलेल्या साधेपणाची मूर्ती असलेल्या अण्णांची त्या दिवशी झालेली पहिली भेट अविस्मरणीय आहे.

मला संगीतातलं फार काही कळत नव्हतं. घरात काम करताना मी विचित्र सुरात गाणी गायचे. अण्णा तेही आवडून घ्यायचे. लता मंगेशकर, सुमन कल्याणपूर यांच्यासारख्या गायिकांकडून आपण गाणी गाऊन घेतो, असा अभिनिवेश त्यांनी कधी बाळगला नाही.

अण्णांचं मन एखाद्या मुलासारखं होतं. छोट्याछोट्या गोष्टीत ते आनंद घ्यायचे. ते बाजारहाट करायचे. मासे आणायचे. किराणाही आणायला जायचे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आनंदी असायचे. गाणी गुणगुणायचे. लिंगभेद (जेंडर बायस) मानत नव्हते. ही आपली कामं आपली नाहीत, ती बायकांची आहेत, अशा संकल्पनांना त्यांनी कधीही थारा दिला नाही. दुरभिमान नव्हता. कधी इतरांना तुच्छ लेखलं नाही. सगळ्यांविषयी त्यांना कमालीचा आदर होता.

आचार्य अत्रे यांच्या 'बुवा तेथे बाया' या नाटकाला अण्णांनी संगीत दिल्याने दोघांचे मैत्रीपूर्ण संबंध होते. आचार्य अत्रे



'गीत शाकुंतल' समयी रेकॉर्डिंग करताना प्रभाकर पंडित, स्नेहल भाटकर आणि कुंदा बोकिल



'सूर सिंगर ॲवॉर्ड'समयी माला सिन्हा यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना स्नेहल भाटकर

तुकारामांवर नाटक लिहणार होते. तुकाराम मात्र व्ही.जी. भाटकर तुम्हीच करा, असं अत्र्यांनी त्यांना बजावलं. त्यावर मी संगीतकार आहे, मी नाटकात काम कसं करणार असं उत्तर दिलं होतं. अण्णांचं उत्तर ऐकल्यानंतर अत्र्यांनीही ते नाटक लिहिलं नाही. कारण अत्र्यांच्या कल्पनेतले संत तुकाराम हे अण्णाच होते. मैत्रीचा आदर राखणारं यापेक्षा मोठं ते उदाहरण काय असणार...

माणूस म्हणून जगताना त्यांनी पैशापेक्षा लोकांची मनं जास्त जपली. एकदा सासूबाईंचं आठ तोळे सोनं चोरीला गेलं. घरात काम करणा-या बाईवर संशय होता. मात्र आपण तिची तक्रार पोलिसांत दिली तर तिला काय वाटेल, असा विचार करून त्यांनी टाळलं. शिवाय आई-अण्णांनी ठरवलं याची चर्चाही करायची नाही. त्यांच्या सभ्यतेच्या कल्पना वेगळ्याच होत्या.

अण्णांना गोड खूप आवडायचं. डायबिटीज, बीपी नाही. खूप काम करायचे. खूप चालायचे. मोजके खायचे. पण गोड जास्त आवडत असे. खीर, पुरणपोळी. इतकंच कशाला त्यांची दोन ऑपरेशन्स झाली, तेव्हा मी त्यांना लाडू खायला घातले, अशी आठवणही मृदुलाजी सांगतात.

अण्णा भजनीमंडळांमध्ये होते पण कधी देवपूजा केली नाही. कर्मकांडं कधी केली नाहीत. ज्ञानेश्वर मंदिरात सेवा करायचे. अमूर्त अशा परमेश्वराशी त्यांनी नातं जोडलं होतं, आणि त्या नात्याला जोडणारा धागा सूर हाच होता. तो धागा इतका पक्का होता की, उतारवयात डिमेन्शिया झाला तरी त्यांच्या आठवणीत सुरांची उजळणी व्हायची. देश स्वतंत्र झाला त्या रात्री मुंबईभर लोक देशभक्तीपर गीतं गात होते. अण्णा आपण गात-गात गेटवे ऑफ इंडियापर्यंत चालत गेल्याची आठवण सांगायचे. तर एकदा गणपतीला कोणाच्या तरी घरी गेलो होतो. तिथे शोभेचे दिवे लावलेले होते. ते दिवे हळूवारपणे मंद होत विझायचे. पुन्हा हळूहळू उजळायचे. ते पाहून मला म्हणाले, मृदुला हा दिव्यांचा आरोह अवरोह आहे.

डिमेन्शिया झालेला असताना अशा आठवणी येणं, हे त्यांचं सुरांशी नातं किती घट्ट होतं, याची साक्ष देणारं होतं. इतकंच कशाला, २७ मे २००७ रोजी अण्णा मंदिरात जाऊन गायले होते. तेव्हा त्यांची शुश्रूषा करणारी आमच्या घरातील सहकारी त्यांच्यासोबत गेली होती. ती घरी परतल्यावर म्हणाली, आज अण्णांचा आवाज असा काही लागला होता की, विचारायची सोय नाही. त्यानंतर दोनच दिवसांनी म्हणजे २९ मे रोजी अण्णाचं निधन झालं. अगदी अखेरपर्यंत त्यांची संगीताशी असलेली साथ सुटली नाही.

अण्णांना आपल्या गावाबद्दल प्रचंड प्रेम. तिथे आपलं घर असावं असं त्यांना वाटायचं. कोकणातली माती पायाला लागली पाहिजे. तिथल्या लाल मातीमध्ये आपली पावलं उमटली पाहिजेत, असं ते नेहमी बोलायचे. समुद्र, त्यात सोडलेली होडी, अशा निसर्गरम्य कल्पना मनोमन रंगवायचे. कोकणात घर जरी होतं तरी पुढे ते लहान पडायला लागलं म्हणून मग ते त्यांचे मित्र बाळोबा सावंत यांच्या घरीही उतरत असत. रत्नागिरीशी असलेलं नातं, अण्णांच्या जाण्यानंतरही टिकून राहिलं. दरवर्षी रत्नागिरीत अण्णांची आठवण आजही जागवली जाते. तशीच आठवण यंदाच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने जागवणार असल्याचं मृदुलाजी सांगतात.

स्नेहल भाटकर यांनी हिट गाणी दिली, शिवाय हिंदी आणि मराठी दोन्हीकडे आपल्या स्वतंत्र संगीतशैलीचा बाणा जपला. अत्यंत सुमधुर अशा चाली, सहज गुणगुणता येणारी, कमी वाद्यांचा वापर करत शब्द आणि सूर यांचं वजन वाढवणारी आणि सतार, बासरी अशा वाद्यांचा अप्रतिम मेळ असलेली, त्यांनी संगीतबद्ध केलेली असंख्य गाणी आजही रसिकांच्या ओठावर आहेत. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने त्यांच्या या योगदानाची दखल घेतली तर त्यासारखा दुसरा सन्मान असणार नाही.

– अपर्णा पाटील
aparna.patil1@gmail.com
भ्रमणध्वनी : ८९८३८२०२०२

# ५० हजार प्रतींचा टप्पा ओलांडला...


सहा पुस्तकांचा
७५० रुपयांचा संच
**५०० रुपयांत**
(ट.ख.आमचा)
एकूण पृष्ठे : ८५०

प्रत्येक पुस्तकाची
किंमत : १२५ रुपये
सवलतीत : १०० रुपये (ट.ख.वेगळा)




न पेटलेले दिवे
राजा शिरगुप्पे
सहा वर्षांत ४ हजार प्रती

प्राथमिक व माध्यमिक शाळा,
शिक्षक आणि शिक्षण यांच्या संदर्भात
अनेक लहान-थोरांना अंतर्मुख करणारी,
स्फूर्ती देणारी व कार्यप्रवण करणारी
ही पुस्तके आहेत. मराठी माध्यमांच्या
सरकारी शाळांवरील विश्वास वाढवणारी,
एवढेच नव्हे तर तिथे आकाराला येत असलेल्या
शिक्षण-चळवळीला बळ देणारी ही पुस्तके आहेत.
मागील सहा वर्षांत साधना प्रकाशनाकडून आलेल्या
या सहा पुस्तकांच्या मिळून, आतापर्यंत
५२ हजार प्रती वितरीत झाल्या आहेत.
या सर्व लेखकांचे अभिनंदन व आभार!





कवाडे उघडताच
प्रतिभा भराडे
साडेपाच वर्षांत ७ हजार प्रती

संपर्क
साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ,
पुणे ४११०३०.
फोन
०२०-२४४५९६३५



माझी काटेमुंढरीची शाळा
गो. ना. मुनघाटे
पाच वर्षांत १३ हजार प्रती




शाळा भेट
नामदेव माळी
चार वर्षांत २३ हजार प्रती




आठ शिक्षकांची आत्मवृत्तं
संपादक : नामदेव माळी
सहा महिन्यांत ३ हजार प्रती



माझे विद्यार्थी
रघुराज मेटकरी
पाच महिन्यांत २ हजार प्रती



प्रसिद्ध अभिनेत्री सुलभा देशपांडे यांचे गेल्या महिन्यात निधन झाले. विजय तेंडुलकरांच्या 'शांतता कोर्ट चालू आहे'तील बेणारेबाईच्या व्यक्तिरेखेने त्यांना निराळी ओळख मिळवून दिली. छबिलदास शाळेतील शिक्षिका ते समर्थ नाट्यकर्मी, प्रगल्भ अभिनेत्री असे संपन्न व्यक्तिमत्त्व सुलभाताईंना लाभले.

# शांतता, कोर्ट उठलं आहे...

'**शां**तता... कोर्ट चालू आहे'मधील बेणारे बाई, 'सखाराम बाईंडर'मधील चम्पा ते 'मिसेस तेंडुलकर' या विनोदी मालिकेतील राणेआजी. या भूमिका, त्यांचा बाज, आवाका, एकूण मांडणीतील त्या व्यक्तिरेखेची व्याप्ती हे सारे काही भिन्न. त्यांना जोडणारा समान धागा म्हणजे ज्येष्ठ अभिनेत्री सुलभा देशपांडे यांचा सहज अभिनय. रंगभूमी असो की चित्रपट ज्यांच्याविषयी सतत चर्चा नसते, ज्यांना तथाकथित 'ग्लॅमर' नसते, पण तरी चोखंदळ रसिकांच्या मनातले ज्यांचे स्थान अढळ असते, अशा दुर्मिळ कलाकारांपैकी एक म्हणजे सुलभाताई. त्यांच्या रंगभूमी, विशेषत: प्रायोगिक रंगभूमीवरच्या निष्ठेचा राज्य सरकारने 'नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार' जाहीर करून गौरव केला. 'रंगायन' विखुरल्यानंतर अरविंद देशपांडे, अरुण काकडे आणि पूर्वाश्रमीच्या सुलभा कामेरकर यांनी 'आविष्कार' ही नाट्यसंस्था काढली. सुलभा देशपांडे आणि माधव साखरदांडे यांनी 'आविष्कार'च्या 'चंद्रशाला' या बालरंगभूमीची धुरा सांभाळली. 'बाबा हरवले आहेत', 'राजा राणीला घाम हवा' यासारख्या बालनाटकांची त्यांनी

**भूमिका केलेले चित्रपट**

अब इंसाफ़ होगा (१९९५), अरविंद देसाई की अजीब दास्तान (१९७८), अल्बर्ट पिंटो को गुस्सा क्यों आता है (१९८०), आदमी खिलौना है (१९९३), इजाज़त (१९८७), एक फूल तीन कांटे (१९९७), कस्तूरी (१९८०), कॉमन मॅन (१९९७), (टी.व्ही.) कारोबार (२०००), क्रोध (१९९०), खून भरी मांग (१९८८), गमन (१९७८), गुलाम-ऐ-मुस्तफा (१९९७), गैर (१९९९), घर द्वार (१९८५), घर हो तो ऐसा (१९९०), चौकट राजा (१९९१), चौराहा (१९९४), जादू का शंख (१९७४), जान तेरे नाम (१९९२), जानू (१९८५), जैत रे जैत (१९७७), डॉटर्स ऑफ़ धिस सेंचुरी (२००१), तमन्ना (१९९७), तमाचा (१९८८), तरंग (१९८४), त्रिदेव (१९८९), द फिल्म (२००५), दर्पण के पीछे (२००५), दिल आशना है (१९९२), दुनिया (१९८४), दुश्मन देवता (१९९१), बदलते रिश्ते (१९९६), टीव्ही मालिका बाज़ार (१९८२), भीगी पलकें (१९८२), भीष्म (१९९६), भूमिका (१९७७), भैरवी (१९९६), मन (१९९९), मान्सून (२००६), मिस्टर आज़ाद (१९९४), मोक्ष: साल्वेशन (२००१), यह कैसा इंसाफ़ (१९८०), याराना (१९९५), युगपुरुष (१९९८), राजा की आयेगी बारात (१९९७), रामनगरी (१९८२), लोरी (१९८४), विजेता (१९८२), विरासत (१९९७), शंकरा (१९९१), शांतता! कोर्ट चालू आहे (१९७१), संध्या छाया (१९९५), (टीव्ही) सलाम बॉम्बे! (१९८८), सितम (१९८२), सुर संगम (१९८५), हमला (१९९२), हेच माझं माहेर (१९८४)

**दिग्दर्शित चित्रपट**

राजा रानी को चाहिए पसीना (१९७८)

निर्मिती केली. पार्वतीकुमार यांच्या मदतीने 'दुर्गा झाली गौरी'सारखे नृत्यनाट्य उभे केले. बालरंगभूमीच्या निमित्ताने देशविदेशातील बालरंगभूमीचा अभ्यास केला. छबिलदास शाळेतील शिक्षिका ते समर्थ नाट्यकर्मी, प्रगल्भ अभिनेत्री असे संपन्न व्यक्तिमत्त्व सुलभाताईंना लाभले. प्रायोगिक रंगभूमीवर त्या निष्ठेने काम करत राहिल्या. त्यामानाने व्यावसायिक रंगभूमीवर त्यांचे आगमन उशिरा झाले. विजय तेंडुलकरांच्या 'शांतता कोर्ट चालू आहे'तील बेणारेबाईच्या व्यक्तिरेखेने त्यांना निराळी ओळख मिळवून दिली. व्यावसायिक रंगभूमीवरील दिग्दर्शकीय कारकीर्द भरात असताना अरविंद देशपांडे यांचे निधन झाले. त्यांच्या मागे सुलभाताईंनी अरुण काकडे यांच्या साथीने 'आविष्कार' कार्यरत ठेवली. समविचारी नाट्यसंस्था, समूहांच्या एकत्रित चळवळीला 'छबिलदास चळवळ' म्हणून मिळालेल्या लौकिकात सुलभाताईंचा सहभाग महत्त्वाचा आहे. १९५०च्या दशकात स्पर्धांमधून रंगभूमीवर आलेल्या सुलभाताईंना व्यावसायिक रंगभूमी खुणावत होती. तरी त्यांनी प्रायोगिकतेची कास सोडली नाही. व्यावसायिक नाटके आणि चित्रपटांतून त्यांनी छोट्या-मोठ्या भूमिका केल्या. भूमिका, जैत रे जैत, विजेता, सलाम बॉम्बे अशा सिनेमांमधून तसेच टीव्ही मालिकांमध्येही त्या भेटल्या. त्यांचे रंगभूमीवरील वावरणे असो की प्रत्यक्षातील संवाद; त्यात सहजता, सोपेपणा आणि मनाचा मोकळेपणा जाणवत असे. संगीत नाटक अकादमी, नानासाहेब फाटक पुरस्कार, गणपतराव जोशी पुरस्कार, वसंतराव कानेटकर पुरस्कार, कुसुमाग्रज पुरस्कार, तन्वीर सन्मान यांनी त्यांचा गौरव



झाला. रंगभूमी जीवनगौरव पुरस्कारानेही त्यांचा उचित गौरव झाला. अशा सुलभा देशपांडे या अष्टपैलू अभिनेत्री. आता आपला निरोप घेऊन अनंताच्या प्रवासाला निघून गेल्या आहेत.

**– प्रतिनिधी**

## ग्रंथाली
## पुस्तक प्रकाशन वृत्तांत





प्रसिद्ध कादंबरीकार तथा नांदेडच्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख (माजी जिल्हाधिकारी), यांच्या 'मृगतृष्णा' या कथासंग्रहाचे प्रकाशन लेखिका व अभिनेत्री सुप्रिया विनोद यांच्या हस्ते करण्यात आले. एसएसम जोशी फाउंडेशनच्या सभागृहात झालेल्या या प्रकाशन समारंभप्रसंगी मसापचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, विद्यासागर अध्यापक (नाटकराव पटकथा लेखक), अनिल कांबळे, 'ग्रंथाली' प्रकाशनचे विलास जोशी आदी मान्यवरांच्या बरोबरच विविध क्षेत्रांतील मान्यवर व नागरिक उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना सुप्रिया विनोद म्हणाल्या, ''विविध नातेसंबंधांचा डोह खूप खोल असतो व त्याचे पैलूही विविध असतात. 'मृगतृष्णा' या कथासंग्रहात त्याचे विविध अंगांनी दर्शन घडतेच पण यात स्त्रीमनाचे विविध कंगोरे दिसतात.'' प्रा. मिलिंद जोशी यांनी बोलताना कुटुंबसंस्था, स्त्री-पुरुष संबंधावर आधारित असलेली तरी पुरुष पुरुष, तसेच स्त्री स्त्री अशा संबंधाचे ही अस्तित्व असून त्यातील मानवी भावभावनांचे सखोल विश्लेषण या कथांमध्ये आहे व सेक्स हे सर्वस्व नसले तरी मानवी जीवनाचे एक अभिन्न अंग आहे असे सांगितले. लेखक लक्ष्मीकांत देशमुख यांनी बोलताना मानवी जीवनाचे सार म्हणजे कुटुंबसंस्था याचे विविध पैलू ललित साहित्यात दर्शविण्यासाठी या कथासंग्रहाची निर्मिती केली आहे असे सांगितले. 'ग्रंथाली' प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या 'मृगतृष्णा' हा कथासंग्रह २२१ पानांचा असून किंमत २५० रुपये आहे. सवलतीत १५० रुपयांत मिळेल.

isha tours™
Lets explore the new world...
आनंदतरंग

# कोल्ड डेझर्ट

आत्माराम परब, नरेंद्र प्रभू



हिमाचल प्रदेश म्हणजे फक्त हिरवागार निसर्ग असं जे आपलं मत असतं ते त्याच राज्यातील लाहोल-स्पिती या जिल्ह्याला भेट दिल्यानंतर बदलतं. हिमालयाच्या सौंदर्याचा अविभाज्य भाग असलेल्या देवदार वृक्षांची इथली अनुपस्थिती, इथला राकट रांगडा प्रदेश, बैराण पण माबळतीच्या आकाशातील रंगांशी स्पर्धा करणाऱ्या मातीचे रंग या आपल्या आगळ्यावेगळ्या सुंदरतेने भरून काढतो आणि तिथला आसमंत न्याहाळताना त्याचं स्वर्गीय सौंदर्य आपल्याला चकित करून टाकतं. हिमाचल प्रदेशच्या पूर्वोत्तर भागात तिबेटला लागून असलेलं हे ठिकाण म्हणजे भारत आणि तिबेटमधला टापू. स्पितीचा अर्थच मधली भूमी. तिबेटला लागून असल्याने या भागावर बौद्ध धर्माचा पगडा आहे. परतीच्या प्रवासात कुनझुम पास पार करून रोहतांग पास मार्गे मनालीच्या दिशेने आपण पुन्हा हिरवाईकडे परततो. परतीच्या मार्गावर असलेला चंद्रताल लेक पाहताना अजून हिमाचल पाहायचा आहे हे लक्षात येतं. या तलावातून बाहेर पडणाऱ्या पाण्याचा प्रवाह आपल्या दृष्टीस पडतो पण तलावात येणारं पाणी दिसत नाही. तलावात खालच्या बाजूलाच हे झरे असावेत.

हिमाचल प्रदेशची स्वर्गीय भूमी, तिथले देवदार, पाईन, सूचिपर्णी वृक्ष, मनमोहक फुलं, सहस्रावधी धबधबे, खळाळत्या नद्या, विस्तीर्ण तलाव असा नेत्रदीपक देखावा पाहाण्याबरोबरच स्पिती व्हॅलीमुळे लडाखसारख्या प्रदेशाच्या दर्शनाचा लाभ आपणाला या ठिकाणी गेल्यावर घेता येतो हे या सफरीचं आणखी एक वैशिष्ट्य आहे. हिमालयाचं तसं कितीही वर्णन केलं आणि फोटो काढले तरी तिथे प्रत्यक्ष गेल्याशिवाय त्याच्या भव्यतेची, सौंदर्याची, रौद्रपणाची कल्पना येणार नाही. माणसाला इवलंसं असल्याची जाणीव करून देणारा श्रीखंड पर्वत, किन्नौर कैलास शिखर याची देही याचि डोळा पाहाण्यासाठी तिथेच गेलं पाहिजे.

मोकळ्या शीतल हवेतल्या इथल्या पक्षी जगताने आपलं लक्ष वेधून घेतलं नाही तरच नवल. पायी चालत जायला जर मोकळा वेळ असेल तर त्यांचं उत्तम दर्शन घडतं. नुसत्या हिमालयीन मैनाही गुबगुबीत देखण्या दिसतात. पक्षी, फुलं, फळं या सगळ्यांचेच रंग उठून दिसणारे. सफरचंदाची फिकट गुलाबी फुलं किती साजरी दिसतात. सगळं कसं रसरशीत. लांबच्या प्रवासाने आळसावायला झालं तर वाहनातून उतरल्यावर पाच मिनिटात पुन्हा तजेला येतो. ही मोकळी हवा, तिथला निसर्ग, महाकाय पर्वत, पाताळात जाणाऱ्या दऱ्या, खळाळते प्रवाह आणि शुभ्र बर्फाच्छादित शिखरं हे हिमालयाचं जगभरातील पर्यटकांना भुलवणारं रूप न्याहाळायलाच इथे जायचं, वर्षभराचं वारं पिऊन घेण्यासाठी.

निसर्गाच्या या अफाट कॅनव्हासवरच्या बारीकशा रेषा हीच माणसाची इथली खूण. नदी काठावरून बरबर जाणारे रस्ते नागमोडी वळण घेत पुन्हा पुन्हा त्याच ठिकाणचं दर्शन देत राहातात आणि मग कधीतरी अचानक मागचा प्रदेश दिसेनासा होतो आणि नव्या दुनियेत आपण प्रवेश करतो. एक पर्वत ओलांडून दुसऱ्या पर्वताच्या उतारावर गाडी धावत असते, सूर्याचा डोंगराआडून



लपंडाव सुरू होतो आणि आजचा त्याचा दिवस आता संपणार अशी वर्दी मिळते, तरी आपलं मुक्कामाचं ठिकाण अजून दूरच असतं. हिमालयात मैलाच्या दगडाला फारसं महत्त्व नाहीच. आपण शहरी माणसं ते पहात अंतराचा, वेळेचा अंदाज बांधत असतानाच एखादं असं डायव्हर्शन येतं की मती गुंग होते. त्यावरून धावणारी वाहनं कधी थांबवायची ते ठरवणार कोण तर निसर्ग.

जेवढं खडतर जीवन तेवढीच किंवा त्याहून उत्तुंग अशी माणसाची जिद्द. पर्वत उतारावर चार-पाच फुटांच्या पायऱ्या करून तिथला शेतकरी शेती करतो ते पाहून आपण विचार करायला उद्युक्त होतोच. दिवसभर थकवणारा प्रवास करीत मुक्कामाकडे लक्ष ठेवून जाणाऱ्या पर्यटकांना किन्नौर कैलाशचं दर्शन घडतं आणि नकळत वाहनांना विश्राम द्यावाच लागतो. मावळतीकडे निघालेला सूर्य त्या पर्वतांच्या मुकुटावर झळाळी चढवण्याचं काम घाईने करीत असतो आणि सगळ्यांनाच तो अचूक क्षण टिपायची उत्कंठा लागून राहते. तो मुकुट सोनेरी होणं न होणं नशिबावर अवलंबून असतं. शेवटी रोजचे रंग वेगळे हेच खरं. चंद्रप्रकाशातलं किन्नौर कैलासचं रूप केवळ अप्रतिम. त्याचं वर्णन करता येणार नाही. चांदण्यात न्हाऊन निघालेला किन्नौर कैलास पहायचा असेल तर तिथेच गेलं पाहिजे.

काल्पा हे सतलज व्हॅलीमधलं छोटंसं गाव आहे. जवळच्याच कोठी गावात चंडिका देवीचं पुरातन मंदिर आहे. देवदार वृक्षांच्या छायेत असलेलं पुरातन मंदिर भारतीय आणि तिबेटी कलेचा संगम असलेलं देवालय आहे. कुठलंही स्तोम न माजवलेली ही छोटी पण सुरेख मंदीरं हे तिथल्या जनतेची श्रद्धास्थानं आहेत.

सतलज आणि स्पिती नदीचा संगम हे या सफरीमधलं आणखी एक आकर्षण आहे. कुठलाही नदीचा संगम पाहाणं ही अपूर्वाईच असते पण इथले प्रदूषणविरहित प्रवाह पाहताना आपण प्रफुल्लित होऊन जातो. पुढे नाको हे आणखी एक सुंदर गाव लागतं. इथलं नाको लेक अप्रतिम असंच आहे. सभोवताली दाटीवाटीने उभी असलेली झाडं आणि उंचावरच्या शुभ्र शिखरांचं प्रतिबिंब या नाको लेकमध्ये पडलेलं पाहाण्यातला आनंद शब्दातीत असाच आहे. इथे उन्हाळ्यात नौकाविहारचा आनंद लुटता येतो तर हिवाळ्यात गोठलेल्या तलावावर स्किईंगचा खेळ खेळता येतो. आळस झटकून उबदार बिछान्यातून बाहेर पडण्याची तयारी असणाऱ्यांनी पहाटेच्या वेळी थोडं वर चालत जाऊन नाको गाव, तलाव आणि व्हॅलीचं विहंगम दृष्य कॅमेऱ्यात बंदिस्त केलं तर तो आयुष्यातला अविस्मरणीय क्षण आपल्याला छायाचित्राच्या माध्यमातून कायमचा जपून ठेवता येतो.

किन्नौरमधली हिरवाई कमी कमी होत जाते आणि पुढे आपण स्पिती व्हॅलीकडे मार्गस्थ होतो. हिंदूधर्माचा पगडा असलेली गावं आणि संस्कृती मागे टाकून आपण तिबेटी संकृती आणि बौद्ध धर्मीयांच्या गुंफा असलेल्या प्रदेशात प्रवेश करीत असतो. या पहाडी प्रदेशात आता लोकांची आपसातली संपर्काची भाषाही बदललेली असते. वाटेत लागणाऱ्या गेऊ या गावात तिबेटियन धर्मगुरूची



पाचशे वर्षांपासून जतन करून ठेवलेली ममी पाहायला मिळते. आता हा सगळ प्रदेशच बैराण आणि लडाख प्रांताशी साधर्म्य असलेला असा आहे. समुद्रसपाटीपासून ११,००० फूट ते १४,००० फुट उंची असलेला लाहोल स्पिती हा हिमाचल प्रदेशमधला जिल्हा विरळ हवा, बर्फाच्छादित शिखरं, खोल खोल दऱ्या, उंचच उंच पहाड आणि गडद निळं आकाश या अनोख्या वैशिष्ट्यांसाठीच प्रसिद्ध आहे. आतापर्यंत न पाहिलेले रुद्रभीषण पहाड, नजर न पोहोचणाऱ्या खोल दऱ्यांमधून वाट काढत जाणारी इवलीशी सडक आणि त्यावरून जाणारं आपलं वाहन हे दृष्यच आपण किती किंचित आहोत हे आपल्याला सांगत असतं. असं असलं तरी अशा दुर्गम ठिकाणी रस्ते बांधणारे हात आणि सीमा सडक संघटन यांना आपण आपसूकच प्रणाम करतो. स्पिती नदीच्या काठी बसलेलं ताबो हे गाव तिथल्या ताबो गुंफेमुळे प्रसिद्ध आहे. दहाव्या शतकातली ही गुंफा हिमालयातील अजंठा म्हणूनही प्रसिद्ध आहे. भारताच्या पुरातत्व खात्याच्या अखत्यारीत असलेली ही गुंफा तिथली सर्वात मोठी गुंफा आहे. काझा गावाकडे जाण्याआधी वाटेत लागणारी धनकर गुंफा तिथून न्याहाळता येणाऱ्या विहंगम दृष्यामुळे लक्षात राहते.

काझाच्या जवळच असलेलं किब्बर गाव हे जगातलं सर्वात उंचीवरचं कायम राहत्या वस्तीचं गाव म्हणून प्रसिद्ध आहे. सुमारे चारशे लोकवस्ती असलेलं हे गाव मोटरवाहतुकीच्या रस्त्याने जोडलेलं आहे. स्पितीमध्ये इतर सर्व ठिकाणी मातीच्या विटांपासून बनवलेली घरं आहेत. मात्र हे गाव त्याला अपवाद आहे. इथे मिळणाऱ्या दगडांपासून ही घरं बनवली गेली आहेत. याच परिसरात असलेली की मॉनेस्ट्री तिच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे आणि आजूबाजूला असलेल्या पर्वतांमुळे कायमची लक्षात राहाते. एक हजार वर्षं जुनी असलेली ही गुंफा किल्ल्यासारखी असून दोन-तीन मजली इमारती या ठिकाणी आहेत.

हिमाचल प्रदेश म्हणजे फक्त हिरवागार निसर्ग असं जे आपलं मत असतं ते त्याच राज्यातील लाहोल-स्पिती या जिल्ह्याला भेट दिल्यानंतर बदलतं. हिमालयाच्या सौंदर्याचा अविभाज्य भाग असलेल्या देवदार वृक्षांची इथली अनुपस्थिती, इथला राकट रांगडा प्रदेश, वैराण पण मावळतीच्या आकाशातील रंगांशी स्पर्धा करणाऱ्या मातीचे रंग या आपल्या आगळ्यावेगळ्या सुंदरतेने भरून काढतो आणि तिथला आसमंत न्याहाळताना त्याचं स्वर्गीय सौंदर्य आपल्याला चकित करून टाकतं. हिमाचल प्रदेशच्या पूर्वोत्तर भागात तिबेटला लागून असलेलं हे ठिकाण म्हणजे भारत आणि तिबेटमधला टापू. स्पितीचा अर्थच मधली भूमी. तिबेटला लागून असल्याने या भागावर बौद्ध धर्माचा पगडा आहे. परतीच्या प्रवासात कुनझुम पास पार करून रोहतांग पास मार्गे मनालीच्या दिशेने आपण पुन्हा हिरवाईकडे परततो. परतीच्या मार्गावर असलेला चंद्रताल लेक पाहताना अजून हिमाचल पाहायचा आहे हे लक्षात येतं. या तलावातून बाहेर पडणाऱ्या पाण्याचा प्रवाह आपल्या दृष्टीस पडतो पण तलावात येणारं पाणी दिसत नाही. तलावात खालच्या बाजूलाच हे झरे असावेत.

हिमाचल प्रदेशची स्वर्गीय भूमी, तिथले देवदार, पाईन, सूचिपर्णी वृक्ष, मनमोहक फुलं, सहस्त्रावधी धबधबे, खळाळत्या नद्या, विस्तीर्ण तलाव असा नेत्रदीपक देखावा पाहाण्याबरोबरच स्पिती व्हॅलीमुळे लडाखसारख्या प्रदेशाच्या दर्शनाचा लाभ आपणाला या ठिकाणी गेल्यावर घेता येतो हे या सफरीचं आणखी



एक वैशिष्ट्य आहे. हिमालयाचं तसं कितीही वर्णन केलं आणि फोटो काढले तरी तिथे प्रत्यक्ष गेल्याशिवाय त्याच्या भव्यतेची, सौंदर्याची, रौद्रपणाची कल्पना येणार नाही. माणसाला इवलसं असल्याची जाणीव करून देणारा हा आगळा हिमालय याचि देही याची डोळा पाहिल्यावर निघताना मन व्याकूळ होतं, आणि मग सतत म्हणत राहतं-

दूर जाती इथल्या वाटा
कडे-कपारीच्या खाली
किती विसरू म्हणता
याद पुसता न आली

खिंड संपली तरीही
पुन्हा खिंडीकडे वाट
जात असता दिसतो
उभ्या पर्वताचा घाट

शुभ्र शिखरांच्या राशी
आणि पाचूचे ठिपके
वर आभाळ मोकळे
देई उन्हाचे चटके

रंग रंग उधळतो
इथे आसमंत सारा
निळे हिरवे प्रवाह
आणि दुधाच्याही धारा

कधी सुसाट धावतो
वर ढग खाली वारा
आडोश्याला जागा नाही
हिमवृष्टीचाही मारा

असा न्यारा हा इलाखा
सय भरूनीया येते
किती विसरू म्हणता
याद पुसता न येते

– आत्माराम परब, नरेंद्र प्रभू
info@ishatours.net
भ्रमणध्वनी : ९३२००३१९१०

# ते दोन क्षणसुद्धा...!

**गौरी पाटील**

'ते दोन क्षणसुद्धा!' या गौरी पाटील लिखित पुस्तकाचं नुकतेच मुंबईत प्रकाशन झालं. त्या पुस्तकाची आणि गौरीची ही कहाणी...

आज..

आज एक ख़ुशी और माँग लूँ, आज एक दुवाँ और माँग लूँ।
आज एक आँसू और पि लूँ। आज एक जिंदगी और जी लूँ
आज एक सपना और देख लूँ। क्या पता....
कल हो न हो !!!

हे शब्द आहेत एका वहीतले... वयाच्या अवघ्या १७ व्या वर्षी लिहिलेले.. गौरी पाटीलच्या डायरीतले. या वयात खरंतर 'कल'चाच विचार असतो, उद्याची भावी स्वप्नंच मनात तरळत असतात.

पण हे शब्द वहीत उतरले आणि दोनच वर्षात गौरीला एक दुर्धर आजार जडला. आपलं आयुष्य आता फार नाही हे त्या क्षणपासूनच गौरीला कळलं होतं. पण ते कोणालाही जाणवू न देता गौरीनी

आज एक जिंदगी और जी लूँ।
आज एक सपना और देख लूँ।

हे शब्द प्रत्यक्ष आचरणात आणले. कारण जगणं हा गौरीसाठी आनंद सोहळा होता, उत्सवच होता.



कशी होती गौरी..

आयुष्यात फोकस हवा आणि तोही लेझर सारखा, स्वप्नं.. ती तर बघायलाच हवीत, आयुष्य खूप सुंदर आहे आणि मी ते अजून सुंदर करणार हे गौरीच्या जगण्याचं सूत्र होतं. ती प्रेमाची भुकेली होती.

ती सौंदर्याची भोक्ती होती. ती फुलांची, त्यांच्या रंगा गंधाची वेडी होती, अभिजात संगीताची चाहती होती, चंद्रावर आणि त्याच्या चांदण्यावर लुब्ध होती. घराचा कोपरान् कोपरा सजवणारी होती. पराकोटीची नीटनेटकी होती.

आणि हे जगणं अगदी सहज होतं त्यात कुठलाही अभिनिवेश नव्हता, आवेश नव्हता. तिच्याकडे प्रचंड आत्मविश्वास होता पण फाजील आत्मविश्वास नव्हता.

ती कलाकार होती, ती सुरेख पत्र लिहायची, छान चित्र काढायची, रांगोळ्या काढायची, दागिन्यांची सुंदर सुंदर डिझाइन्स बनवायची, मोठ्या-मोठ्या छान मेणबत्त्या तयार करायची.

तिचे विचार अतिशय प्रगल्भ होते. ती स्पष्टवक्ती होती. आजारपणात एक दिवस ती आई-वडिलांना समोर बसवून, हे सुंदर आयुष्य दिल्याबद्दल, काळजी करणारी इतकी माणसं जोडल्याबद्दल त्यांना धन्यवाद देते, आणि एकदा बाबांशी जोरदार भांडण झाल्यावर त्यांना सॉरी म्हणणारं पत्र लिहित, पण त्यात स्पष्ट करते की ज्या मुद्यांवरून वाद झाला त्याबद्दल सॉरी म्हणत नाहीये, त्यात माझं काही चुकलं नाही पण सॉरी यासाठी की तुमच्या बरोबर घालवता येणाऱ्या वेळातला एक तास फुकट गेला. तिचं दुःख आहे ते, ते क्षण वाया घालवल्याचं.

आपल्या आयुष्यातले काहीच क्षण बाकी आहेत हे माहित असल्यामुळे त्यातला क्षणन् क्षण तिला जगायचा होता हे सांगणारं पुस्तक ते दोन क्षण सुद्धा ..

चुरगळल्यानंतरही फुलांच्या पाकळ्यांनी दिलेला सुगंध म्हणजे क्षमा .. असं लिहिणारी गौरी..

फुलांना तसं आयुष्य कमीच असतं. रंगा गंधानी आपल्याला रिझवणं हेच त्यांचं आयुष्य, पण त्यातही अतिशय देखण्या आणि मंद सुगंध असणाऱ्या प्राजक्ताच्या फुलाला शाप असतो तो अल्पायुष्याचा. मला वाटतं तसंच होतं गौरीचं आयुष्य सगळ्यांना आनंद देणारं, जगायला शिकवणारं आणि म्हणूनच गौरीच्या पुस्तकाचं मुखपृष्ठ सजलं आहे ते प्राजक्ताच्या फुलांनी.

.. कसं जगायचं हे शिकवणारं हे पुस्तक, मोठ्या ग्रंथाचं मोल असलेलं हे छोटसं पुस्तक, प्रत्येकानी जपून ठेवावं असं आणि विशेष म्हणजे कुठल्याही छोट्याशा गोष्टीनंसुद्धा नैराश्य येणाऱ्या आजच्या तरुणाईपर्यंत पोहोचायलाच हवं असं हे पुस्तक.

गौरीच्या निधनानंतर दोनच दिवसांनी गौरीच्या आईला गौरीची डायरी, तिने लिहिलेली पत्रं असा खजिना गवसला. तोपर्यंत आपली लेक डायरी लिहिते हे त्या आईला काय, कोणालाच कळलं नाही. मग त्या ठेव्याचं झालं पुस्तक .. 'ते दोन क्षणसुद्धा!'



आपल्या हातात फार वेळ नाही उरलेला हे माहिती असताना उरल्यासुरल्या दिवसांना आनंदाचं तोरण लावण्यासाठी धडपडणारी एक तरुण मुलगी...
पोटच्या पोरीचा हा विलक्षण झगडा हतबलतेने पाहत तिच्यामागे पहाडासारखी उभी राहिलेली आई...
आणि दोघींमधला एक करुण लपंडाव.
मृत्यू काही पावलांवर आहे... आहेच... हे दोघींनाही माहिती! पण ना हिने तिला सांगितलेलं, ना तिने हिला!
मुलीच्या मृत्यूनंतर अवघ्या दोनच दिवसांनी आईला एक खाजगी डायरी सापडते... तिच्या मुलीची! शरीरात शिरलेल्या चिवट व्याधीचा डंख क्षणाक्षणाने कुरतडत असताना लिहिलेली... मृत्यूच्या मिठीत खेचत नेणाऱ्या प्रत्येक दिवसातला क्षण-न-क्षण जिवंत उभा करणारी डायरी!



हवंहवंसं आयुष्य कणाकणाने हातातून निसटतंय याची खोल जाणीव असलेल्या या खळबळत्या वादळात काय नाही? छोट्या लढायांमधल्या विजयाचा अहानंद, मोठ्या युद्धातल्या पराभवाचे डंख, जखमा बांधत नेणारा नर्म विनोद आणि हातून सगळं सुटताना गवसलेलं तत्त्वज्ञानही!
...हे सगळं लिहिणारी गौरी आज असती, तर तीस वर्षांची असती. तिचा डाव अर्ध्यावर मोडला हे खरं; पण ती जे जगली, त्यातला कणही तिच्याहून दुप्पट आयुष्य मिळालेल्यांच्या वाट्याला येत नाही अनेकदा!!
आज वाटतं, तेव्हाच का नाही मी थोडं जास्त बोलले तिच्याशी? तेव्हाच का नाही तिच्या समृद्ध मनाच्या विहिरीत थोडी आत उतरून तिला आणखी घट्ट भेटले.
का नाही?
..का?
■ शोभा डे

खरंतर ही पत्र म्हणजे गौरीचा वैयक्तिक ठेवा. त्यातली पात्र आपल्याला अपरिचित पण तरीही पुस्तकाच्या पानापानात भरून राहिलेला सकारात्मक दृष्टिकोन आपल्याला स्तिमित करतो.

ती देवाला पत्र लिहिते. इतक्या यातना, संकटं देणाऱ्या तुला प्रिय कसं म्हणायचं असा प्रश्न करते. आणि पत्राचा शेवट करते तो.. तुझी सुपरवायझर, गौरी असा.

खूप यातना होत असताना इतनी शक्ती हमें देना दाता असं पानभर लिहून किंवा माझा खोकला पूर्णपणे थांबलाय अशी वाक्य परत परत लिहून, आजाराविरुद्ध लढण्याची ताकद मिळवते. पण त्या यातना कोणाला कळू देत नाही.

रोज नवीन रंग दाखविणाऱ्या मुंबईबद्दल लिहिते. लग्नानंतर सासरी कसं वागायचं याचा सल्ला आपल्या शीतलताईला देते आणि स्पष्ट करते की, मी तुझ्यापेक्षा लहान आहे, पण काही संसार मी बघितले आहेत आणि त्यामुळे संसार कसा करावा आणि कसा करू नये मी शिकले आहे.


मित्र मैत्रिणींना तिच्या आयुष्यात वेगळं स्थान होतं. साहजिकच मित्रांना लिहिलेली पत्र आहेत आणि मैत्रीबद्दलची, Listen and silent are two words, and are very important in friendship because only a friend can listen when you are silent अशी खूप छान वाक्यही आहेत.

खूप अस्वस्थ असतानाच ती लिहिते असं नाही तर शोभा डे यांचं 'स्पीडपोस्ट' हे पुस्तक हाती लागतं तेव्हाही ती व्यक्त होते. गौरीच्या शब्द-चित्र-कलाकृतींनी सजलेलं 'ते दोन क्षणसुद्धा...' हे पुस्तक

याच आजारानं confidence दिला, positive attitude दिला, practically जगायला शिकवलं, मनापासून हसायला शिकवलं, आजारपण हाच माझ्या आयुष्यातला टर्निंग पॉईंट ठरला कारण त्याच क्षणी मी आयुष्याला नवी उभारी देण्याचा मी विचार केला, असं लिहिणारी गौरी, आजारपणाचाही सोहळा करणारी गौरी पाटील.. आणि वाचायलाच हवं असं तिचं पुस्तक ''ते दोन क्षणसुद्धा...!!''

प्रकाशक: इंकिंग इनोव्हेशन्स, मुंबई
फोन +91 22 2412 2755
Email : sneha@inkinginnovations.com
Website : www.inkinginnovations.com
पृष्ठ: १२० ■ मूल्य रु. २५०.००
संपूर्ण रंगीत छपाई

## ग्रंथाली
## पुस्तक प्रकाशन वृत्तांत




**जनआवृत्ती मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १६० रुपये**
**हार्ड बाउंड ४०० रुपये**
**सवलतीत ३०० रुपये**

हृदयरोगाच्या वाढत्या प्रसाराला आळा घालण्यासाठी महाराष्ट्रभरात क्लिनिक्सचे जाळे निर्माण करणाऱ्या माधवबागची कहाणी सांगणारे 'हृदयस्पर्शी माधवबाग' हे पुस्तक सुमेध वडावाला रिसबूड यांनी लिहिले असून 'ग्रंथाली'ने नुकतेच प्रकाशित केले. अल्पावधीतच त्याच्या दोन आवृत्त्या संपल्या असून तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन मंगळवार, २१ जून रोजी डोंबिवलीमध्ये झाले. डोंबिवलीकर रसिकांनी भरघोस गर्दी केलेल्या या कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार व संपादक दिनकर गांगल यांनी या पुस्तकाचे प्रकाशन केले. त्यांनी यावेळी बोलताना 'हृदयस्पर्शी माधवबाग' हे किंमती पुस्तक असल्याची मार्मिक प्रतिक्रिया नोंदवली. त्याविषयी अधिक सांगताना ते म्हणाले, हे पुस्तक किंमती आहे असे मी म्हणतो तेव्हा त्याच्या छापील किंमतीबद्दल म्हणत नसून त्यात जो मजकूर आहे तो अतिशय मौल्यवान आहे अशा अर्थाने ते किंमती आहे. माधवबागच्या पुस्तकामध्ये हृदयरोगमुक्तीची एक अभिनव संकल्पना, समाजात सुरू असलेली चळवळ तसेच दोन मध्यमवर्गीय कुटुंबातील उत्साही तरुणांनी उभ्या केलेल्या वैद्यकीय उद्योगाच्या यशाची कहाणी या सर्व गोष्टी आहेत. ही कहाणी एका अर्थाने प्रेरणादायी आहे कारण किरण भिडे आणि डॉ. रोहित साने यांनी केवळ उत्तम व्यावसायिक यश मिळवलं नाही तर त्यांना केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतभरातील, जगभरातील हृदयरोगाला नष्ट करायचं आहे. २१ जून या वर्षातील सर्वात मोठ्या दिवशी हृदयरोगासारख्या मोठ्या रोगाशी लढा देणाऱ्या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन होत आहे ही अतिशय औचित्यपूर्ण आणि आनंदाची घटना आहे


यावेळी ज्येष्ठ आयुर्वेद तज्ज्ञ वैद्य विनय वेलणकर यांनीही त्यांचे विचार मांडताना जागतिक योग दिनाप्रमाणेच आयुर्वेद दिन हा जागतिक आरोग्य दिन म्हणून साजरा करण्यात यावा अशी आशा व्यक्त केली. यावेळी ते म्हणाले, आयुर्वेदशास्त्र हे हजारो वर्षांपासून कार्यरत असलेले शास्त्र आहे. सामान्य नागरिक आणि वैद्यकतज्ज्ञ दोघांनीही त्याच्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याची गरज आहे. बऱ्याच वेळा व्यक्तीला हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन त्याला मोठी रक्कम खर्च करावी लागली की मग तो आपल्या आरोग्याविषयी सजग होतो. खरंतर आयुर्वेदाने योग्य जीवनशैली सुचवली आहे. रोग झाल्यावर उपचार करण्यापेक्षा रोग होवूच नये यासाठी उपाय सांगितले आहेत. आयुर्वेदाने सर्व जगासाठी आरोग्यविचार सांगितला आहे. आपल्या ऋषींनी सर्व ज्ञान कोणत्याही पेटंटशिवाय सर्वांसाठी खुले ठेवले आहे. त्यामुळे सर्वांनी या पुस्तकात दिलेल्या आयुर्वेदाच्या संकल्पनांकडे स्वागतशील दृष्टीने पाहिले पाहिजे.


डोंबिवलीतील ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ आणि रोटरी क्लबचे माजी गव्हर्नर डॉ. उल्हास कोल्हटकर यांनी किर्लोस्करांपासून ते पेंढरकरांपर्यंतच्या मराठी उद्योजकांच्या परंपरेत साने आणि भिडे यांनी भर घातली आहे असा मुद्दा मांडला. यावेळी ते म्हणाले, आपण आपल्या चुकीच्या वागण्यामुळे जगामध्ये हृदयरोग, मधुमेह या रोगांची महासत्ता बनलो आहोत. या परिस्थितीत आपल्याला स्वस्त, मस्त, सहज उपलब्ध असणाऱ्या, कमी धोका असणाऱ्या आणि प्रतिबंधात्मक, आरोग्यप्रवर्तक औषधोपचारांची गरज आहे. १९९३साली बिल क्लिंटन आणि हिलरी क्लिंटन यांनी अमेरिकेतील हृदयरोगतज्ज्ञ डॉ. डिन ऑर्निश यांना व्हाईट हाऊस मधील सर्वांचा आहार व जीवनशैली बदल करण्यासाठी सल्लागार म्हणून आमंत्रित केले होते. डॉ. ऑर्निश यांनी प्रमाणित केलेला आहार व जीवनशैली ही आयुर्वेदाने व योगशास्त्राने सांगितलेली होती. माधवबागनेही याच धर्तीवर आहार, व्यायाम, जीवनशैलीतील बदल आणि आयुर्वेदिक पंचकर्म व औषधे यांचा उपयोग करून रुग्णांना हृदयरोगाशी लढायला व जिंकायला मदत केली आहे. 'हृदयस्पर्शी माधवबाग' या पुस्तकाची निर्मिती ग्रंथालीने अगदी दर्जेदार, कोणत्याही प्रकारे हातचे न राखता केली आहे. हे पुस्तक वाचल्यानंतर आधुनिक वैद्यकाचे अभ्यासकही नकळत आयुर्वेदाचे प्रशंसक होऊन जातील. किरण भिडे आणि रोहित साने यांनी मोठं स्वप्न पाहिलं आहे. पण त्यांनी आणखी मोठं उद्दिष्टं गाठावं. जागतिक स्तरावर आयुर्वेदाचं स्थान ठळकपणे दिसून यावं अशी मी शुभेच्छा देतो.

या शिवाय यावेळी नामांकित कंपनी सेक्रेटरी व सामाजिक कार्यकर्ते माधव जोशी यांनीही पुस्तकाविषयी आपले मनोगत व्यक्त केले. याशिवाय सुप्रसिद्ध नाट्य-चित्रपट-दूरदर्शन कलाकार मिलिंद फाटक आणि स्पृहा जोशी यांनी पुस्तकातील निवडक उताऱ्यांचे वाचन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. यश वेलणकर यांनी तर 'ग्रंथाली'तर्फे स्वागत धनश्री धारप यांनी केले. ज्येष्ठ पत्रकार शुभदा पटवर्धन यांनी किरण भिडे व डॉ. रोहित साने यांची मुलाखत घेतली. महेश खरे यांनी आभारप्रदर्शन व समारोप केला.

रोहन प्रकाशन

# ग्रंथपान




भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची २१ मे १९९१ रोजी निवडणूक प्रचारादरम्यान निघृण हत्या झाली. निवडणुकीनंतर ते सत्तेत येतील, या भीतीने श्रीलंकेतील 'एलटीटीई' या संघटनेने राजीव यांची हत्या केली असावी, असं मानलं जातं आहे. परंतु या मूळ गृहीतकावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं, तर वेगळीच परिस्थिती समोर येते. लेखक व पत्रकार फराझ अहमद यांनी या पुस्तकातून या गृहीतकावर प्रश्नचिन्ह निर्माण करून राजीव गांधी हत्या प्रकरणातील वेगवेगळ्या कंगोऱ्यांवर प्रकाश टाकला आहे. राजीव गांधींच्या मृत्यूनंतर काँग्रेस पक्ष सत्तेत आला हे खरं, पण सहानुभूतीचं वातावरण निर्माण होऊनही पक्षाला स्पष्ट बहुमतही मिळवता आलं नव्हतं; हे लक्षात घेतलं, तर राजीव गांधी यांच्या सत्तेत परत येण्याची भीती एलटीटीईला वाटत होती, ही मांडणीच कोसळते. याचा ऊहापोह फराझ पुस्तकात करतात. मग त्यांची हत्या का झाली असावी, याचा शोध घ्यायचाही ते प्रयत्न करतात.

राजीव गांधी यांच्या हत्येचा कथित मुख्य सूत्रधार शिवरासनने हत्येनंतर भारतातच थांबण्याचा निर्णय का घेतला? त्याला भारतातच कोणी थांबवून घेतलं? आपल्या सुरक्षेसाठी तो कोणावर विसंबून होता? जाफन्याला परतायची त्याला का भीती वाटत होती? असे प्रश्न या पुस्तकात लेखकाने उपस्थित केले आहेत.

राजीव गांधी यांचा मृत्यू झाल्यामुळे कोणाचा राजकीय फायदा झाला याचाही शोध हे पुस्तक घेतं. फराझ यांनी असा दावा केला आहे की, तत्कालीन राजकीय परिस्थितीतीच राजीव गांधींच्या हत्येमागील खऱ्या कटावर पांघरूण घालण्यासाठी जबाबदार होती.

जगभरातल्या भयंकर हत्याकांडांपैकी एक असलेल्या या प्रकरणाची दुसरी बाजू मांडण्याचा आणि त्याबाबतचे प्रश्न उपस्थित करण्याचा हा प्रयत्न... अर्थात् राजीव गांधी हत्या... एक अंतर्गत कट?

**राजीव गांधी हत्या... एक अंतर्गत कट?**
फराझ अहमद
अनुवाद : अवधूत डोंगरे
पृष्ठे २८८, मूल्य २५०.००
**'ग्रंथाली' येथे सवलतीत २०० रुपये**

व्यवसाय किंवा नोकरी-धंद्यातील प्रगतीसाठी...
चांगला उद्योजक / व्यावसायिक / नोकरदार होण्यासाठी
तुम्ही जागरूकपणे प्रयत्न करायला तयार आहात?

सुप्रसिद्ध लेखक, 'माइंडट्री' कंपनीचे संस्थापक सुब्रोतो बागची यांनी 'द प्रोफेशनल' (मराठी आवृत्ती : मैत्री व्यावसायिकतेशी) हे पुस्तक लिहिलं आणि त्याला उदंड प्रतिसाद मिळाला. या पुस्तकात त्यांनी व्यावसायिकतेबद्दल त्यांच्या अनुभवांआधारे भाष्य केलं होतं, तर तुमचा 'सच्चा साथीदार'मध्ये त्यांनी व्यावसायिकांमध्ये आवश्यक असणाऱ्या गुणांचा विकास व्हावा, यासाठी एका वर्कबुकचीच निर्मिती केली आहे.

या पुस्तकात त्यांनी चांगला व्यावसायिक होण्यासाठी आवश्यक असलेल्या २५ गुणांबद्दल थोडक्यात, पण मौलिक माहिती दिली आहे. तसंच हे गुण आपल्या अंगी कसे बाणवावेत, ते अधिकाधिक विकसित कसे करावेत, हे आपलं आपल्यालाच समजावं यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण प्रश्नही विचारले आहेत. त्यांची उत्तरं देण्यासाठी पुस्तकात मोकळ्या जागा देण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी आपल्याला सामोरे जावे लागणारे, आपल्या क्षमतांचा कस लावू पाहणारे वेगवेगळे घटना-प्रसंगही देण्यात आले आहेत. त्या घटना-प्रसंगांत तुम्ही कसं वागाल, काय कृती कराल हे पुस्तकात लिहायला सांगितलं आहे. कधीकधी आधी दिलेल्या उत्तरांचं पुनरावलोकन करायलाही सांगितलं आहे.

'प्रत्यक्ष स्वाध्याय' करायला लावून स्वत:च्या आत डोकवायला लावणारं हे आगळंवेगळं पुस्तक सगळ्या व्यावसायिकांना, उद्योजकांना आणि नोकरदारांना मौलिक मार्गदर्शन तर करेलच, शिवाय व्यावसायिक जीवनातला तुमचा 'सच्चा साथीदार'ही होईल!

**तुमचा सच्चा साथीदार**
सुब्रोतो बागची
अनुवाद : प्रणव सखदेव
पृष्ठे १६०, मूल्य १९५ रु.
**'ग्रंथाली' येथे सवलतीत १५५ रुपये**




# ग्रंथपान



**लिंगभेदापलीकडची नवी बाराखडी**

आशयाभिव्यक्तीच्या नावीन्यामुळे दलित साहित्याने साहित्यविश्वात स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. आज दलित साहित्याने अर्धशतकापेक्षा अधिक कालखंड ओलांडला आहे. या साहित्यातील दास्यमुक्तीचा आंबेडकरी दृष्टिकोन ही एक जीवनदृष्टी आहे. भारतीय समाज–व्यवस्थेच्या संदर्भात या साहित्याने बंधमुक्त माणसाचा विचार मांडला आहे. झंझावातासारख्या उदयाला आलेल्या दलित कवितेने साहित्यजगताला प्रचंड हादरे दिले आहेत. या कवितेच्या प्रवासात कवयित्रींच्या कवितांनी मौलिक स्वरूपाचे योगदान दिले आहे. कवयित्रींच्या कवितांचा स्वतंत्र विभाग मानता येईल एवढी निर्मिती झाली आहे. ही निर्मिती ऐतिहासिक आणि वाङ्मयीन दृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण ठरली आहे. याचा प्रत्यय पद्मगंधा प्रकाशित 'दलित कवयित्रींची कविता : स्वरूप आणि चिकित्सा' या डॉ. जया विश्वनाथ पाटीललिखित ग्रंथातून येतो.

लेखिकेने जवळपास पस्तीस कवयित्रींच्या कवितांचे साधार विश्लेषण करून सावित्रीबाई फुल्यांना 'दलित जाणिवेच्या आद्य आधुनिक कवयित्री' असे संबोधले आहे. ते अमान्य होण्यासारखे नाही. कारण दलित साहित्य चळवळीच्या भूमिकेशी संवादी विचार सावित्रीबाईंच्या काव्यातून प्रकटले आहेत. दलित कवयित्रींच्या कवितेतील आशयसूत्रे आणि वाङ्मयीन मूल्यमापन अशा दोन पातळ्यांवर चिकित्सकपणे घेतलेला वेध या ग्रंथातून प्रत्ययाला येतो. प्रारंभीच्या काळातील कवयित्रींचे लेखन चळवळीतील कवींच्या कवितांच्या अनुकरणातून आलेले दिसते. तरीही या कवींसारखा टोकदारपणा त्यांच्या कवितेत दिसत नाही. पायाभरणीच्या काळात वाङ्मयबाह्य पेचांमुळे त्या सावध पवित्रा घेताना दिसतात. शिक्षणामुळे आलेली जाण आणि फुले–आंबेडकरी विचारांमुळे मिळालेली जीवनदृष्टी यामुळे समाजस्तराच्या निरीक्षणातून दृश्यमान झालेला, जात आणि लिंगाधिष्ठित प्रश्नांकडे पाहण्याचा पारंपरिक दृष्टिकोन आणि सामाजिक दांभिकता सशक्तपणे कवितेतून अभिव्यक्त होत गेली.

ऐंशीच्या दशकात उदयाला आलेल्या स्त्रीवादापेक्षा दलित कवयित्रींचा स्त्रीवाद वेगळा आहे. फुले–आंबेडकरी स्वीकृत विचारांच्या आधारे त्या स्त्रीवादाचा विचार करतात. या विचारामागे मानवमुक्तीच्या विचाराचीच बैठक आहे. नव्वदोत्तर काळातील कवितेत बदलत्या काळाचे संदर्भ सशक्तपणे अधोरेखित होतात. आधुनिकतेमुळे बदलत जाणारी आर्थिक समीकरणे, त्यातील स्त्रीचे स्थान, संस्कृतीने लादलेले जगणे असे अनेकविध पेच व्यक्त झाले आहेत. त्यामुळे हा केवळ वाङ्मयीन आविष्कार न राहता सामाजिक जीवनाचे सखोल प्रतिबिंब या कवितेत उमटले आहे. 'आम्हीही बनलोत आता रणरागिणी हा विटाळलेला अंधार पेटवण्यासाठी' असा या कवितेचा एल्गार असून दलितत्व आणि स्त्रीत्व अशी दुहेरी वेदना शब्दबद्ध केली असून अस्तित्वशोध ही या कवितांची खासियत आहे.

जसे येथे स्त्रीमन व्यक्त होते, तसेच स्वकीय परिप्रेक्ष्यातील व्यंगीही तटस्थपणे अधोरेखित होते. भूतकाळातील दुखरी जाणीव, वर्तमानातील जगण्याचा संदर्भ आणि भविष्यकालीन सकारात्मक जीवनमान असा कवितेचा प्रवास झालेला दिसून येतो. लिंगाच्या आधारे स्त्रीचे नाकारले गेलेले कर्तृत्व ही वेदना या कवितेचे केंद्र बनले आहे. दलित स्त्रीविषयी सवर्ण स्त्रीच्या मनात भगिनीभावाचा अभाव दिसून येतो. ती पुरुषप्रधान सरंजामी मानसिकतेतून व्यवहार करताना दिसून येते. लोकशाहीत जातीचा वापर राजकारणासाठी केला जातो. जातियतेच्या अदृश्य परंतु भक्कम भिंती ठाण मांडून बसलेल्या आहेत. संस्कृती, परंपरा, घरंदाजपणा, मानमर्यादा, कुलशील यासारख्या वांझोट्या संकल्पनांच्या आधारे 'बाई'ला येथील समाज हवा तसा आकार देत असतो. ही सल कवयित्रींनी व्यक्त केली आहे.

खैरलांजीवर जसे कठोर भाष्य असते तसेच 'निठारी'च्या क्रूर घटनेचा संतापही असतो. जात, धर्म, पंथ, लिंग यांच्या पलीकडे जाऊन वेदना आणि दुःखाची सहवेदना अभिव्यक्त होते. त्यामुळे अभिव्यक्तीचे स्वरूप निव्वळ प्रतिक्रियात्मक राहत नाही तर घडणाऱ्या घटनांची चिकित्सा मानवतावादी दृष्टिकोनातून केली जाते हा या अभिव्यक्तीचा विशेष आहे.

या अभ्यासातून डॉ. जया पाटील यांनी कवयित्रींच्या सृजनशीलतेचा वेध घेतला आहे. बाईच्या इच्छा, आकांक्षा, आवडीनिवडी आणि स्वप्नांच्या थडग्यावर येथील समाजपुरुष उभा आहे. हे सारे सहन करूनही बाई सृजनाच्या टप्प्यावर नव्याने उभी राहते. सीमित आदिबंधातून मुक्त होऊन अवकाशाच्या फलकावर लिंगभेदापलीकडची नवी बाराखडी ती लिहू पाहतेय. परंपरागत पुरुषांच्या दृष्टीने ही बंडखोरी तर फुले–आंबेडकरी विचारदृष्टीने पाहता हा मानवमुक्तीचा विचार आहे. यामुळेच स्वतंत्र आणि स्वायत्त होऊन 'पुरुष' मात्र व्हायचे नाही, असा रोखठोक विचार स्त्रियांच्या कवितांनी मांडला आहे. या विचाराच्या आधारेच संस्कृतीचा पुनर्शोध घेतला जातो. आपले नायक निश्चित करताना परंपरेने नाकारलेल्या नायकांचा 'माणूस' म्हणून विचार केला जातो. गुणात्मकदृष्ट्या विस्तार पावलेल्या या कवितेतून करारी बाणा आणि व्यवस्थेला प्रश्नांकित करणारे धाडसी मन व्यक्त होते.

मुक्तछंदात अभिव्यक्त झालेल्या या कवितेत अंतर्गत संवादी लय असल्यामुळे या रचनांना काव्यात्म मूल्य प्राप्त झाले आहे. जीवनानुभव प्रभावीपणे व्यक्त करण्यासाठी काव्यमूल्य प्रस्थापनेचे पुरेपूर स्वातंत्र्य कवयित्रींनी घेतले आहे. त्यामुळेच कवयित्रीप्रत भाषाभिव्यक्ती बदलताना दिसते. त्यात व्यासंग आणि जीवनदृष्टीचे प्रतिबिंब पडल्याचे दिसून येते. कवयित्री आपल्या प्रकृतिपिंडाप्रमाणे अनेकविधप्रकारे काव्याभिव्यक्ती करतात. तसेच वैचारिक आणि वाङ्मयीन दृष्ट्या स्वचिकित्साही करतात. त्यामुळे त्यांची कविता वैशिष्ट्यपूर्ण ठरली आहे.

डॉ. जया पाटील यांनी गुणात्मक विश्लेषणाच्या आधारे अभ्यासाअंती निष्कर्ष मांडले आहेत. म्हणून अभ्यासपूर्ण संदर्भ ग्रंथ असे रूप या ग्रंथाला प्राप्त झाले आहे. दलित साहित्याच्या प्रांतात भालचंद्र फडके, रा. ग. जाधव, प्र. श्री. नेरूरकर, सदा कऱ्हाडे, म. सु.पाटील अशी मोठी परंपरा सांगता येते. त्यात डॉ. जया पाटील यांचाही आवर्जून उल्लेख केला पाहिजे.

**– महेंद्र भवरे**
mmbhaware@gmail.com
भ्रमणध्वनी : ९९२०७८९३८५

**दलित कवयित्रींची कविता : स्वरूप आणि चिकित्सा**
डॉ. जया विश्वनाथ पाटील
पृष्ठे १४३, मूल्य १४० रुपये **'ग्रंथाली' येथे सवलतीत ११० रुपये**

साधना प्रकाशन

# ग्रंथपान




**मनोगत**

मी ज्या खेड्यापाड्यांत फिरलो, ज्या बालपणातून मी गेलो; त्याची आणि त्या काळाची एक अमीट छाप माझ्या मनावर कायम कोरली गेली आहे. त्याचा काहीएक मूल्यात्मक संस्कार माझ्या मनावर आहे. तिथून माझ्या जीवनात दिसलेल्या त्या माणसांचे एक भव्य-दिव्य चित्रण माझ्याजवळ आहे आणि त्या आठवणींच्या रिळातली ती माणसं, त्यांचे एक विशिष्ट जगणे घेऊन माझ्याशी समांतर चालत आलेली आहेत. त्यांनी माझ्या जीवनाशी कुठे-कुठे सांधा जोडला आहे आणि ती माझ्यातही कधी तरी विरघळून जात आहेत, असे मला वाटले आहे. त्यांचा आनंद, त्यांची दु:खे, त्यांची संकटे यांचा मी साक्षीदार राहिलो आहे. त्यांच्या दु:खाच्या धगीने मी होरपळलो आहे आणि कधी कधी संतापाने पेटून उठलो आहे. त्यांना जखमा झाल्या, तेव्हा मलाही वेदना अनुभवायला मिळाल्या आहेत.

ते माझे बालमित्र होते, शेजारी होते, गावचे रहिवासी होते, दारावर येणारे खेड्याच्या संस्कृतीचे घटक होते, चळवळीचे कार्यकर्ते होते. ते सर्व क्षेत्रांतले विविध जात, पंथ, लिंग, धर्म, व्यवसायी होते. त्यांच्यात जगण्याची एक चिवट आस होती. जीवनाशी त्यांची एक यशस्वी-अयशस्वी झुंज होती. त्यांच्यात माणुसकीचे काठोकाठ दर्शन होते, त्यांच्या जगण्यात आपलेपणाचा सूर होता. त्यांची लढाई ते लढत होते, पण त्यात मीही कुठे तरी होतोच. कधी वाटे- आपल्यातलेच वेगळे शरीर घेऊन ही माणसं जगण्याला भिडत आहेत... ती सारी माझी माणसं आहेत! त्यांच्या आनंद-दु:खाचा मी वाटेकरी होतो आणि त्यातून मलाही सुख-दु:ख प्राप्त होत होते.

या माणसांच्या दु:खाच्या पार्श्वभूमीवर मी बरेच काही लिहीत आलो, मात्र थेट त्यांना लेखनात आणणे या ना त्या कारणाने दूर ठेवीत आलो होतो. त्या दुनियेत स्वत:हून पुनर्प्रवेश करणे टाळीत होतो. पण २०१३ च्या ऑक्टोबर महिन्यात एक दिवस आळंदीकडे पायी चाललेले काही भाविक पाहिले. हाती पताका, पाठीवर बोचकी, तोंडात अभंग... आणि मी अशाच एका भाविक, वारकऱ्याच्या जीवनाचा कसा साक्षी आहे; ते आठवायला लागले. ती 'रभाजी कडलगाची गोष्ट' माझी पाठच सोडेना. आणि मी लिहू लागलो. नकळत आकृतिबंध आला. त्यात आशय होता, सांगाडा जागृत झाला. आता कवितेचा देह आला. रभाजीचा आत्माच जणू लेखणीतून बोलू लागला, कवितेचा आपसूक शेवट झाला आणि मी मुसमुसून रडू लागलो. कवितेच्या आणखी बाहेर राहिलेले खूपच होते, ज्यात माझ्याही अस्तित्वाचे काही रंग लपून बसलेले होते.


मी पाहिलेले रभाजीचे व्यक्तिचित्र कवितेत उतरले होते. कथेची बूज राखत ते निवेदनरूप घेत, वाङ्मयप्रकार आणि त्यांच्या संकल्पनेची मोडतोड करीत होते; पण तसल्या गोष्टींची चिंता करण्याला अर्थच नव्हता. कारण जे सहजपणे बाहेर आले, त्याला आता मोजपट्ट्या लावत बसण्यापेक्षा ते येऊ देण्याला मी अग्रमहत्त्व दिले.

ही कविता २०१३च्या दिवाळीनंतर माझे मित्र साधनाचे संपादक विनोद शिरसाठ यांना पाठविली. कविता वाचून त्यांनी पसंती कळविली. साधनात कविता छापून येणार, हा माझ्यासाठी खूप मोठा आनंद होता. त्यानंतर 'बाळू पिराजी' लिहिली आणि साधनाकडे पाठवली. ती वाचून संपादक म्हणाले, 'अशा किती कविता होऊ शकतील?' मी म्हणालो, 'किमान दहा-पंधरा तरी...' संपादक म्हणाले, 'चला, महिन्यातून दोन कविता असे सदरच सुरू करू....' माझ्यासाठी तो आश्चर्याचा धक्काच होता. आणि मग एकेक व्यक्ती माझ्या डोळ्यांसमोर येऊन नाचू लागली; त्यातूनच गुजाबाई, हिराबाई, कमलबाई, चांगू यांच्या कविता लिहून झाल्या.

**- संतोष पद्माकर पवार**

**बहादूर थापा आणि इतर कविता**
संतोष पद्माकर पवार
पृष्ठे १४९, मूल्य १२५ रुपये
**'ग्रंथाली' येथे सवलतीत १०० रुपये**

# ग्रंथाली ✱ नवीन पुस्तके




## अचानक – स्मिता भागवत

भारत – पाकिस्तान फाळणीत वासनेचं तांडव अनुभवलेला या कादंबरीचा नायक – संदीप शहा कोवळ्या वयातच अत्यंत समंजस होतो. प्रखर बुद्धिमत्ता असलेला हा नायक परिस्थितीच्या चटक्यांनी टोकाचा स्वाभिमानी आणि एकांगी बनत जातो. कोवळ्या वयात झालेली कुटुंबाची वाताहत, अत्यंत प्रेमळ आणि कष्टाळू पित्याने केलेली आत्महत्या, दांपत्य जीवनात आलेले दारुण अपयश आणि आपल्या अपत्यांना आपण मायेची ऊब देऊ न शकल्याचा गंड, या सगळ्याची बोच त्याला अस्वस्थ करत राहते. नायकाच्या या मनोवस्थांची चित्रणे लेखिकेने अत्यंत समर्थपणे साकारली आहेत. कादंबरीचे कथानक सत्य घटनेवर आधारित असल्याने नायकाचा मानसिक संघर्ष वाचकाला अस्वस्थ केल्याशिवाय राहत नाही.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

---





## ... पुत्र मानवाचा! – स्मिता भागवत

रखरखीत आयुष्यात ओॲसिस ठरावं त्याप्रमाणे अंबरीषच्या आयुष्यात आलेली मीना त्याचं अवघं जीवनच बदलून टाकते. पण जितक्या वेगाने त्याच्या आयुष्यात सुखाची पालवी फुटते तितक्याच वेगाने आणि आकस्मिक त्याच्या आयुष्याचं पुन्हा वाळवंट होतं, ते मीनाला झालेल्या अपघाताने! त्यानंतर भेटलेल्या अर्चनाशी झालेली जवळीक आणि मीना शुद्धीत आल्यानंतर नायकाच्या– अंबरीषच्या मनातील आंदोलने लेखिकेने समर्थपणे टिपली आहेत. नायकप्रधान या कादंबरीत स्त्री-पुरुष नात्याची वीण सांधताना मानवी मनातील संघर्ष ठळकपणे साकारला आहे. माणसाच्या आयुष्याची दोर नियतीच्याच हातात असल्याने 'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा!' या ओळीचा प्रत्यय या कादंबरीतून येतो.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

---




## आर्त माझ्या बहु पोटी – विजय शं. माळी

'माती' आणि 'माणूस' मग तो रक्ताचा का असेना यातला फरक हाच! मातीला सगळ्यांचीच माया, तिची सारीच लेकरं. मलाही तिच्यासारखं होता येऊ दे. कुणी माझ्याशी कसंही वागलं, कितीही वाईट वर्तन केलं तरी. तिचं मातीपण, तिचं ममत्व, माझ्या रंध्ररंध्रात उतरून धमन्यातून वाहू दे. शक्य झालं तर सर्वांच्याच. मला कुणी परका मानू नये, उपरा ठरवू नये. मी ही या मातीचा आहे, माझ्या मातीमायचं तुमच्यासारखंच लेकरू! आपला गाव आणि तिथल्या मातीवर विलक्षण प्रेम करणाऱ्या मनस्वी नायकाची, जीवनाच्या विविध अंगांना थेटपणे भिडताना विविध प्रश्न उभे करत; समकालीन कौटुंबिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक पर्यावरणाचा अचूक वेध घेणारी; अत्यंत सूक्ष्म, ओघवत्या, चिंतनगर्भ; आपल्या अशा खास शैलीत लिहिलेली, काळजाला भिडणारी महत्त्वपूर्ण कादंबरी.

**मूल्य ६५० रु. सवलतीत ३९० रु.**

---




## पप्पूच्या पुड्या – प्रशांत पाठक, शब्दांकन : जी.बी. देशमुख

पुस्तकाचा खरा चरित्रनायक बडनेरा रोडवरील २२ बाय ६च्या क्षेत्रफळात बंदिस्त पण अनेक पेशंटच्या तीन पिढ्यांच्या मनांमध्ये विस्तारलेला, रुजलेला पाठकांचा दवाखाना आहे. हे पुस्तक दवाखान्याच्या त्या वास्तूचे आहे. तिथल्या प्रामाणिकतेच्या, आपुलकीच्या, मायेच्या वातावरणात घडलेल्या किंवा त्या वातावरणाशी निगडित असलेल्या घटनांची आणि व्यक्तींच्या विविध छटांची ही अभिव्यक्ती आहे. गेल्या तीस वर्षांत या दवाखान्यात त्यांना आलेले विलक्षण, अद्भूत अनुभव, विविध स्वभावाच्या पेशंटसचे मजेदार किस्से तसेच काही गंभीर जीवनानुभव त्यांचे बालमित्र जी.बी. देशमुख यांनी 'पप्पूच्या पुड्या' या पुस्तकात शब्दांकित केले आहेत.

**मूल्य १२० रु. सवलतीत ७५ रु.**

## ग्रंथपान

चांगदेव काळे

संपर्क : ९८६९२०७४०३

'ऐ मेरे वतन के लोगों, जरा आँखमें भरलो पानी' हे गाणं कुठेही ऐकू यायला लागले की ऐकणारा हळवा होतो, भावुक होऊन स्तब्ध उभा राहतो. त्या गाण्यातील बोल आणि लताच्या आवाजातील आर्तता आपले सारे अस्तित्वच व्यापून टाकतात. व्याकुळ मनाला गोठवून टाकणारे अंगभर शहारे आणि शहरेच फुलून येतात. यापाठी असलेला चीनशी झालेल्या युद्धाचा इतिहास नजरेसमोर उभा राहतो. त्या युद्धात शहीद झालेल्या शूरवीरांच्या बलिदानाने अंतःकरण हेलावून जाते. ही आपली प्रतिक्रिया असते एक नागरिक म्हणून. परंतु जो सैनिक आहे, त्याला काय वाटतं? डोळ्यात पाणी येणे, ही कल्पना त्याला कधीही रूचत नाही. ना हाती शस्त्र घेतलेल्या सैनिकाला, ना शहीद झालेल्या सैनिकाला. देश, देशप्रेम, शिस्त आणि कर्तव्य यासाठी काहीही करायची तयारी असलेल्या सैनिकाला आपले बलिदान म्हणजे सर्वोच्च सन्मान वाटतो. तो कडक गणवेशात असो, वा नागरी पातळीवर, त्याच्यातला सैनिक सदैव जागरूक असतो. आपले कर्तव्य हेच त्याचे सर्वस्व असते, कुठल्याही परिस्थितीत असला तरी. अशाच एका सैनिकाची ही गाथा आपल्या हाती दिली आहे, शिल्पा खेर यांनी, तिचे शीर्षक आहे, 'ए मेरे वतन के लोगों.'




या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा आहे मिहीर. ज्याचे एकच ध्येय आहे, 'एनडीए'मध्ये जॉईन होण्याचे, एक सैनिक म्हणून देशसेवा करण्याचे. 'एनडीए' ही ना त्याच्या प्रकृतीला झेपणारी ना त्याच्या आप्त-मित्रांच्या पसंतीची. तिथले खडतर आणि रुक्ष जीवन ही त्यापाठची कारणे. परंतु माणसाचा ध्यास ही एक गोष्ट असते, ती प्राप्त करण्यासाठी तो कुठलीही किंमत मोजण्यास तयार असतो. मिहीर ती सगळी किंमत मोजतो. अगदी आयुष्यभराची. एका चकमकीत जखमी होतो, आणि कायमचा जखडला जातो व्हिलचेअरशी कॅप्टन मिहीर म्हणून. तरीही त्याच्यातला सैनिक त्याला स्वस्थ बसू देत नाही. तो तरुणांसाठी नेमबाजीचे शिक्षण देतो. नेमबाजीत स्वतः कौशल्य दाखवून प्रशंसा मिळवतो, आंतरराष्ट्रीय स्तरावर. एका मोठ्या संकटातून अनेकांची सुटका करतो, एक सैनिक म्हणून.

एक सैनिक कसा असू शकतो आणि त्याची मानसिकता काय असते, हे या कादंबरीचे मुख्य सूत्र आहे. त्याला गुंफताना नागरी जीवनातील सुखाच्या कल्पना, स्वतः आणि स्वतःभोवतीच्या जगाला स्वर्ग समजण्याचा स्वार्थीपणा, संकटात सापडल्यानंतर हवालदिल होण्याची आणि हार पत्करण्याची प्रवृत्ती, यासारख्या विरोधी सूत्रांच्या धाग्यांचा लेखिकेने कुशलपणे वापर केला आहे. त्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तिरेखा म्हणजे मकरंद, पार्थ, रीना, समीरा, अक्षय, निधान आणि इतरजण. परंतु त्याचवेळी सुलेमान, एलिना, मि. स्मिथ, मिसेस कटारिया सारखी आडवा छेद देणारी काही मंडळी आपले आपले धागे घेऊन येतात. आणि त्यातून साकारली जाते एक सुरेख अशी वीण असलेली कलाकृती.

वास्तविक हे कथानक बऱ्याचशा अंशी सत्य घटनेवर आधारित आहे. एका सैनिकाने स्वतःचे सांगितलेले हे अनुभव आहेत. परंतु लेखिका केवळ एवढ्याच भांडवलावर थांबलेल्या नाहीत. वास्तवाला समोर ठेवताना त्यातल्या सर्व पैलूंचे आकलन झाले पाहिजे म्हणून त्यांनी अनेक सैनिकांशी संवाद साधला. 'सैनिक' आणि 'एनडीए' या शब्दांभोवती असलेले वातावरण आणि त्यातला गूढपणा समजून घेतला. जसे ऐकले, उमगले त्याचा एक कलाकृती म्हणून कसा उपयोग करता येईल, याचे चित्र कल्पकतेने मनाशी चितारले. त्यातून ही कादंबरी आकाराला आली. शिस्त, कर्तव्य, देशप्रेम आणि सैनिक यांचे परस्पर नाते कसे आहे, याची महती सांगणारी कितीतरी वाक्ये त्यातून आलेली आहेत, अगदी उत्स्फूर्तपणे.

'शौर्य म्हणजे काय असतं? ते सगळं असतं ऑनेस्टी, ड्युटी, डिसिप्लिन या गुणांनी मिळून तयार झालेलं.'

'एका अतिरेक्याला पकडताना काय रक्ताचं पाणी करावं लागतं ना सैनिकांना ते पेपर वाचून नाही कळणार. त्यासाठी तिथं सैनिक म्हणूनच उभं असावं लागतं.'

यात सहजपणा आहे, तरीही काही सांगून जाणे आहे, हे या कादंबरीचे यश आहे, असे म्हणता येईल. या कादंबरीसाठी खास कॅ. मधुकर देसाई यांनी प्रस्तावना दिली आहे. ते लिहितात, 'सैनिकाच्या डोळ्यांसमोर एकच लक्ष्य असते, मी विजयी होणार. एक आत्मविश्वास असतो, एकच भावना असते, हे माझे बलिदान माझ्या मातृभूमीच्या रक्षणासाठी आहे आणि हे माझं परम कर्तव्य आहे. आपल्या देशबांधवांसाठी ''आम्ही आमचा आज तुमच्या उद्यासाठी अर्पण केला.''

अविनाश धमाधिकारी लिहितात, ''माणूस जगतो त्याची संहिता होते. त्या संहितेला शब्दरूपात सांगितलं की साहित्य तयार होतं. पण काही साहित्य फक्त वास्तव मांडतं, काही त्या पलीकडे जाऊन वास्तवाचा अन्वयार्थ सांगतं, तर त्याच्याही वर उठणारं साहित्य जगण्यातली प्रेरणा सांगतं. 'ए मेरे वतन के लोगों' ही कादंबरी या वर्गातली आहे.''

या प्रस्तावना म्हणजे कादंबरीच्या शिरपेचाला मोत्याचा तुरा लावल्यासारख्या आहेत.

चित्रकार पुंडलिक वझे यांनी मुखपृष्ठ साकारले आहे. सैनिक आणि त्यांचे अंतरंग, यांच्या छावणीशी आपण उभे आहोत, असाच त्याकडे पाहून भास होतो.


**मूल्य ३०० रु. • सवलतीत १८० रु.**

## ग्रंथाली

# ग्रंथपान

**चेकपॉईंट चार्ली**

**डॉ. माधवी मेहेंदळे**




चार्ली हे नाव सगळ्यांनाच ठाऊक आहे, त्याची प्रतिमाच नजरेसमोर उभी राहते, नुसते नाव उच्चारले तरी. परंतु चेकपॉईन्ट ही काय भानगड आहे, हा शब्द त्याच्याशी जोडलेला कसा, कुतूहल वाटावे असाच प्रकार. शीर्षक ठेवताना अशा रम्य कल्पनांचा उपयोग केला जातो, वाचकांना आकर्षित करण्यासाठी. तसे प्रथम दर्शनी हे पुस्तक हातात घेताना वाटले देखील. परंतु वाचत गेलो आणि पृष्ठ १०४ वर संदर्भाचा शिलालेख सापडला : चेकपॉइन्ट चार्ली म्हणजे बर्लिनची भिंत अधिकृतरीत्या ओलांडण्याची जागा. नाटोने अशी तीन ठिकाणे ठेवली होती, अलफा, ब्राव्हो, चार्ली. लोकांना आणि टूरिस्टना पूर्व बर्लिनमध्ये जाण्यासाठी चेकपॉईन्ट चार्लीमधून जावे लागे. याचे वर्णन आणि त्याला अनुसरून मांडलेला विचार लेखिकेने मांडला आहे तो असा, 'दृश्य आणि अदृश्य कुंकवाच्या भिंती स्त्रियांच्या मनाभोवती उभारलेल्या असाव्यात. सगळ्या आपापल्या परीने त्यात एखादं दार सापडतंय का पलीकडे जायला, असं शोधत असतील. आमचा हा युरोप प्रवास म्हणजे त्या भिंतीत आम्हाला सापडलेलं किंवा आम्ही निर्माण केलेलं दार म्हणायला हरकत नाही.'

यावरून लक्षात यायला हरकत नाही, की हे पुस्तक प्रवासवर्णनाचा साज घेऊन आलेले आहे. दोन मैत्रिणी नेहा आणि वैदेही या नावाच्या. त्यांनी सुरू केलेल्या युरोप प्रवासाचा वृत्तांत यात आहे. एक भारतातील तर दुसरी अमेरिकेहून निघालेली. दोघीच. प्रवासही मस्तपैकी कारनेच. त्यामुळे जे काही करायचे, पाहायचे ते आपल्या मनाप्रमाणे, मर्जीने. कुठेही थांबा, पाहा, पुढे चला. असा प्रवास. प्रवासवर्णन म्हटले की साधारणपणे नजरेखाली आलेल्या स्थळांची माहिती, वर्णन, आलेले अनुभव, असा ठराविक साचा ठरलेला. परंतु इथे या समजाला चांगलाच धक्का बसतो. यात हे सारे आहेच, पण त्यातच इतिश्री नाही. त्याहीपलीकडचे सौंदर्य अनुभवायला मिळते, कल्पकता आणि मानसिकतेचे सौंदर्य. अगदी ठासून भरलेले. नदी, घरे, प्रसाधनगृहे, निसर्ग, मतिमंद मुले, चुंबन-अलिंगन, लग्न-लिव्ह इन रिलेशनशीप, घटस्फोट, शारीरिक भूक आणि नैतिकता असे कितीतरी विषय आहेत, ज्यांच्याशी आपली आणि त्यांची अशी तुलना, साम्य आणि विरोधाभासाचे तपशील विचारांच्या पातळीवर वाचकांच्या समोर ठेवलेले आहेत. ते वाचत असताना वाचक म्हणून आपण भूप्रदेशाच्या प्रवासात रममाण होतोच. परंतु या प्रवासाला निघालेल्या नेहा आणि वैदेहीच्या वैयक्तिक जीवनाच्या प्रवासाचाही उलगडा आपल्यासमोर होत जाताना आपण अनुभवतो. दोघीही सुविद्य आहेत, वृत्तीने स्वतंत्र आहेत. मुक्त आणि मिळवत्या आहेत. एक संसारी, एक लिव्हइन रिलेशनशिपमध्ये राहिलेली. त्यामुळे विचारातील प्रगल्भता आणि पाहण्याचा दृष्टिकोन यात स्थापित होतो तो उच्चस्तरीय. एक समांतर प्रवासाचा अनुभव येत राहतो, शारीरिक आणि मानसिक स्तरावरचा. त्यामुळे हे केवळ प्रवासवर्णन न राहता, त्या ढाच्यात बसवलेली कादंबरी होते. आनंदप्रवासाची कादंबरी!

तसा या प्रवासवर्णनात हिटलर वारंवार भेटत राहतो, वेगवेगळ्या संदर्भातून. त्याची मानसिकता, युद्ध, वैयक्तिक जीवन आणि इव्हा ब्राऊन, चार्ली चॅप्लिन आणि हिटलर, चेक, बर्लिन, भिंत, हा सगळा इतिहासाचा भागही यात आलेला आहे, आणि तो मांडलाही आहे तितकाच रंजकतेने. संपूर्ण लेखनाचा बाज आहे तोच मुळी रंजक स्वरुपाचा. संवादात्मक पद्धतीने मांडणी केलेली असल्याने आणि प्रकरणे लहान लहान असल्याने, सुरुवातीला यात बाधा येते खरी. परंतु पात्रांशी मनाची जुळणी झाली की आपण त्यांच्या सोबतीने प्रवास करीत आहोत, असे वाटत राहते. लेखनात सहजता आहे, विचारांचा ठाशीवपणा आहे आणि त्याला मानसिकतेचे मोठे पाठबळ आहे. त्यामुळे त्याचा जीव लहान असला तरी आवाका मात्र कवेपलीकडचा आहे.

मुखपृष्ठ संजय पाटील यांनी साकारले आहे. भिंतीला असलेल्या दरवाजाचे. त्याची संकल्पना लेखिकेची आहे, हा दरवाजा पार करून जाण्याची. 'स्त्रियांच्या भोवती उभारल्या गेलेल्या भिंती अनेक प्रकारच्या असतात- रुढीच्या, परंपरेच्या, अपेक्षांच्या, उपेक्षेच्या, तडजोडीच्या... त्या भिंती पार करून पलीकडे आनंदाच्या दिशेने जाण्याचा मार्ग म्हणजे हा दरवाजा, चेकपॉईंट चार्ली!'

**मूल्य २५० रु. • सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

एक संपन्न आणि समृद्ध वैवाहिक जीवनाचा प्रवास होतो तो दोघांच्या साथसंगतीने. हा प्रवास कधी आडवळणे घेतो, कधी खडतर होतो, परंतु जिद्द मनाशी असेल तर इच्छित स्थळी नेऊन पोहोचवतो. इच्छित स्थळी पोहोचल्याचे समाधान नेहमीच वाट्याला येते असे नाही, हे ज्याच्या त्याच्या वैयक्तिक आशा-आकांक्षांच्या ऊन-सावलीवर अवलंबून असू शकते. पण झालेला प्रवास आणि परस्परांनी एकमेकांना दिलेली साथसंगत ही नक्कीच समाधान देणारी असते. तिचे सिंहावलोकन म्हणजे आपण आपलेच अंतर्मुख होऊन केलेले आत्मपरीक्षण होय. अशा एका जीवन प्रवासाचे वर्णन करणारे आशा राणे या लेखिकेचे पुस्तक हाती आले, त्याचे नाव आहे 'साथसंगत'.




'तुमचे प्रेमबीम सारे ठीक आहे पण तुमची आमच्याकडून काय अपेक्षा आहे?'

'मला तुमची मुलगी आणि तुमचा आशीर्वाद द्या' अशा तऱ्हेने साथसंगतीचा निर्णय घेतलेले हे उभयंता, आशा आणि मधुकर ऊर्फ जगन्नाथ. स्वतःच्या पायावर उभे राहून हिंमतीने संसाराची नौका या प्रचंड धकाधकीच्या अथांग सागरात उतरवून जीवनप्रवासाला सुरुवात करतात. दोघेही बुद्धीने कुशाग्र, उच्च शिक्षित. आपापल्या क्षेत्रात भरारी घेणारे. जिद्दीने सर्व परिस्थितीवर मात करणारे, सतत पुढेच जाण्याचा ध्यास घेतलेले. त्यामुळे एक प्रथितयश समाजशास्त्रज्ञ म्हणून आशा राणे यांनी स्वतःची ओळख निर्माण केली. महाराष्ट्र शासनाचा समाजकल्याण विभाग, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स, एसएनडीटी, पुणे विद्यापीठ, युनिसेफ अशा विविध मान्यवर संस्थांमध्ये स्वतःचे स्थान निर्माण केले. सामाजिक कार्यातही अग्रेसर राहिल्या. रस्त्यावरील मुलांसोबत काम करणारी संस्था 'हमारा फाउंडेशन' स्थापन झाली ती त्यांच्या प्रयत्नातून. गेली पंचवीस वर्षे त्या ही संस्था समर्थपणे चालवत आहेत. त्यांच्या या एकूणचा सामाजिक कार्यासाठी त्यांचा गौरव करणारे 'प्रियदर्शनी कर्तृत्त्व गौरव पुरस्कार, भास्कर कर्वे पुरस्कार, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार' यांसारखे अनेक पुरस्कारही लाभलेले आहेत. तर मधुकर राणे यांनी, राष्ट्रीय मिल मजदूर संघ, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, कोकण प्रादेशिक निवड मंडळ, महाराष्ट्र दुय्यम सेवा निवड मंडळ, अशा विविध ठिकाणी उच्च पदावर स्वतःच्या कर्तृत्वाची मोहर उमटवली. परंतु तेवढेच नाही, सामाजिक कार्यातही आपल्या पूर्ण क्षमतेचा पूरेपूर उपयोग केला. सहकारी गृहनिर्माण संस्था, कोकण कृषी विद्यापीठ, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या टिळक भवनातील 'ग्रामीण विकास विभाग' आणि सगळ्यात महत्त्वाचे आणि आज दिमाखात उभे उसलेले छेडानगर, चेंबूरचे 'छेडानगर एज्युकेशन सोसायटीचे अद्ययावत विद्यालय.' अशा या कर्तृत्ववान दाम्पत्याची आपसातली एकमेकांना साथ देण्याची, एकमेकांना समजून घेण्याची वृत्तीही तितकीच उदात्त आणि भावपूर्ण आहे, एकमेकांचा पूर्ण आदर राखून. त्यामुळेच त्यांच्या कार्याचा आलेख उंचावत गेलेला दिसतो.

आपल्या जीवनप्रवासाबाबत लिहीत असताना अनेकदा आत्मप्रौढी, स्वकेंद्रितपण डोकावण्याची दाट शक्यता असते. परंतु या लेखनात त्याचा कुठेही लवलेश नाही. उलट हे सारे करीत असताना आपण काही वेगळे करतो आहोत आणि त्यासाठी सारे आयुष्य झोकून दिले आहे, असा डौल न दाखविता, जीवन आनंदाने कसे जगलो, देश विदेशाचे प्रवास कसे केले, त्याचेही वर्णन यात आलेले आहे. पी के सावंत, त्याकाळचे राज्याचे गृहमंत्री, विजय टिपणीस, माजी लोकायुक्त व निवृत्त न्यायाधीश, श्रीमती पार्वती परिहार यांच्यासारख्या अनेकांचे लाभलेले सहकार्य, त्यांचा आदराने उल्लेख केला आहे. असलेल्या व्याधींविषयीसुद्धा तपशीलाने आणि तितक्याच मनमोकळेपणाने लिहिले आहे.

पुस्तकाची कल्पना चरित्रात्मक आहे, परंतु त्यात केवळ आपल्याच मतांना प्राधान्य न देता, आपल्यासोबतच्या इतरांना आपल्याविषयी काय वाटते, त्यांच्या भावना, मते, विचार यांना यात आवर्जून स्थान देण्यात आले आहे. प्रदीर्घ असा साथसंगतीचा प्रवास असला तरी त्याचे वर्णन अतिशय मोजकेपणाने केलेले आहे. ते करीत असताना त्यातला साधेपणा आणि सच्चेपणाही जपलेला आहे. सोबत अनेक रंगीत फोटो दिलेले आहेत.

साथसंगतीच्या हळूवारपणाला साजेसे मुखपृष्ठ सतीश खानविलकर यांनी सजविलेले आहे. त्यांची मुखपृष्ठावरील कलाकृती पाहत राहावी इतकी सुंदर आहे.

**मूल्य १५० रु. • सवलतीत ९० रु.**

# ग्रंथपान




एक संपन्न आणि समृद्ध वैवाहिक जीवनाचा प्रवास होतो तो दोघांच्या साथसंगतीने. हा प्रवास कधी आडवळणे घेतो, कधी खडतर होतो, परंतु जिद्द मनाशी असेल तर इच्छित स्थळी नेऊन पोहोचवतो. इच्छित स्थळी पोहोचल्याचे समाधान नेहमीच वाट्याला येते असे नाही, हे ज्याच्या त्याच्या वैयक्तिक आशा–आकांक्षांच्या ऊन–सावलीवर अवलंबून असू शकते. पण झालेला प्रवास आणि परस्परांनी एकमेकांना दिलेली साथसंगत ही नक्कीच समाधान देणारी असते. तिचे सिंहावलोकन म्हणजे आपण आपलेच अंतर्मुख होऊन केलेले आत्मपरीक्षण होय. अशा एका जीवन प्रवासाचे वर्णन करणारे आशा राणे या लेखिकेचे पुस्तक हाती आले, त्याचे नाव आहे 'साथसंगत'.

'तुमचे प्रेमबीम सारे ठीक आहे पण तुमची आमच्याकडून काय अपेक्षा आहे?'

'मला तुमची मुलगी आणि तुमचा आशीर्वाद द्या' अशा तऱ्हेने साथसंगतीचा निर्णय घेतलेले हे उभयंता, आशा आणि मधुकर ऊर्फ जगन्नाथ. स्वतःच्या पायावर उभे राहून हिंमतीने संसाराची नौका या प्रचंड धकाधकीच्या अथांग सागरात उतरवून जीवनप्रवासाला सुरुवात करतात. दोघेही बुद्धीने कुशाग्र, उच्च शिक्षित. आपापल्या क्षेत्रात भरारी घेणारे. जिद्दीने सर्व परिस्थितीवर मात करणारे, सतत पुढेच जाण्याचा ध्यास घेतलेले. त्यामुळे एक प्रथितयश समाजशास्त्रज्ञ म्हणून आशा राणे यांनी स्वतःची ओळख निर्माण केली. महाराष्ट्र शासनाचा समाजकल्याण विभाग, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स, एसएनडीटी, पुणे विद्यापीठ, युनिसेफ अशा विविध मान्यवर संस्थांमध्ये स्वतःचे स्थान निर्माण केले. सामाजिक कार्यातही अग्रेसर राहिल्या. रस्त्यावरील मुलांसोबत काम करणारी संस्था 'हमारा फाउंडेशन' स्थापन झाली ती त्यांच्या प्रयत्नातून. गेली पंचवीस वर्षे त्या ही संस्था समर्थपणे चालवत आहेत. त्यांच्या या एकूणचा सामाजिक कार्यासाठी त्यांचा गौरव करणारे 'प्रियदर्शनी कर्तृत्त्व गौरव पुरस्कार, भास्कर कर्वे पुरस्कार, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार' यांसारखे अनेक पुरस्कारही लाभलेले आहेत. तर मधुकर राणे यांनी, राष्ट्रीय मिल मजदूर संघ, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, कोकण प्रादेशिक निवड मंडळ, महाराष्ट्र दुय्यम सेवा निवड मंडळ, अशा विविध ठिकाणी उच्च पदावर स्वतःच्या कर्तृत्वाची मोहर उमटवली. परंतु तेवढेच नाही, सामाजिक कार्यातही आपल्या पूर्ण क्षमतेचा पूरेपूर उपयोग केला. सहकारी गृहनिर्माण संस्था, कोकण कृषी विद्यापीठ, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या टिळक भवनातील 'ग्रामीण विकास विभाग' आणि सगळ्यात महत्त्वाचे आणि आज दिमाखात उभे उसलेले छेडानगर, चेंबूरचे 'छेडानगर एज्युकेशन सोसायटीचे अद्ययावत विद्यालय.' अशा या कर्तृत्ववान दाम्पत्याची आपसातली एकमेकांना साथ देण्याची, एकमेकांना समजून घेण्याची वृत्तीही तितकीच उदात्त आणि भावपूर्ण आहे, एकमेकांचा पूर्ण आदर राखून. त्यामुळेच त्यांच्या कार्याचा आलेख उंचावत गेलेला दिसतो.

आपल्या जीवनप्रवासाबाबत लिहीत असताना अनेकदा आत्मप्रौढी, स्वकेंद्रितपण डोकावण्याची दाट शक्यता असते. परंतु या लेखनात त्याचा कुठेही लवलेश नाही. उलट हे सारे करीत असताना आपण काही वेगळे करतो आहोत आणि त्यासाठी सारे आयुष्य झोकून दिले आहे, असा डौल न दाखविता, जीवन आनंदाने कसे जगलो, देश विदेशाचे प्रवास कसे केले, त्याचेही वर्णन यात आलेले आहे. पी के सावंत, त्याकाळचे राज्याचे गृहमंत्री, विजय टिपणीस, माजी लोकायुक्त व निवृत्त न्यायाधीश, श्रीमती पार्वती परिहार यांच्यासारख्या अनेकांचे लाभलेले सहकार्य, त्यांचा आदराने उल्लेख केला आहे. असलेल्या व्याधींविषयीसुद्धा तपशीलाने आणि तितक्याच मनमोकळेपणाने लिहिले आहे.


पुस्तकाची कल्पना चरित्रात्मक आहे, परंतु त्यात केवळ आपल्याच मतांना प्राधान्य न देता, आपल्यासोबतच्या इतरांना आपल्याविषयी काय वाटते, त्यांच्या भावना, मते, विचार यांना यात आवर्जून स्थान देण्यात आले आहे. प्रदीर्घ असा साथसंगतीचा प्रवास असला तरी त्याचे वर्णन अतिशय मोजकेपणाने केलेले आहे. ते करीत असताना त्यातला साधेपणा आणि सच्चेपणाही जपलेला आहे. सोबत अनेक रंगीत फोटो दिलेले आहेत.

साथसंगतीच्या हळूवारपणाला साजेसे मुखपृष्ठ सतीश खानविलकर यांनी सजविलेले आहे. त्यांची मुखपृष्ठावरील कलाकृती पाहत राहावी इतकी सुंदर आहे.

**मूल्य १५० रु. • सवलतीत ९० रु.**

॥ग्रंथाली॥

# प्रकाशन समारंभ क्षणचित्रे



दिनकर गांगल


स्पृहा जोशी


मिलिंद फाटक


वैद्य विनय वेलणकर


डॉ. उल्हास कोल्हटकर


माधव जोशी



'हृदयस्पर्शी माधववाग' पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशन डोंबिवली येथे झाले. त्याप्रसंगी 'ग्रंथाली'च्या धनश्री धारप, शुभदा पटवर्धन, किरण भिडे, वैद्य विनय वेलणकर, डॉ. रोहित साने, दिनकर गांगल, डॉ. उल्हास कोल्हटकर आणि माधव जोशी




लक्ष्मीकांत देशमुख लिखित 'मृगतृष्णा'
या पुस्तक प्रकाशनसमयी
विद्यासागर अध्यापक
मिलिंद जोशी
सुप्रिया विनोद
लेखक लक्ष्मीकांत देशमुख
आणि
अनिल कांबळे



विदुर महाजन सतारवादनाने करताना



उषा मेहता लिखित 'काटेसावर' कवितासंग्रह
प्रकाशनसमयी धनश्री धारप, उषा तांबे,
दिनकर गांगल आणि कवयित्री उषा मेहता